CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २० ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २८१ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



खरे शिक्षण म्हणजे ज्ञान मिळवणेच नव्हे तर ते ज्ञान वापरून आपले व्यक्तिमत्त्व घडविणे होय. शिक्षणाने व्यक्तीची अंतर्गत ताकद वाढते.

**- कुप्प्. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# तुफानी पावसाने हाहाकार

**मोनोरेल बंद पडून लटकल्याने प्रवासी भयभीत; सुखरूप बाहेर काढले**

**मुंबई पूर्णपणे ठप्प; राज्यभर कोसळधार**

**राज्यात १५ लाख एकरवर जमीन पाण्यात, जीवित व वित्तहानी...**



**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १९ ऑगस्ट-**

मुसळधार बरसणाऱ्या पावसाचे रौद्ररूप मंगळवारी देशाची आर्थिक राजधानी मुंबईसह राज्याला पाहावयास मिळाले. तुफानी पाऊस व समुद्रातील भरतीमुळे मुंबई महानगराला जणू बेटाचे स्वरूप आले असून जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले आहे. मुंबईकराची लाईफलाईन समजल्या जाणाऱ्या लोकलच्या तीनही मार्गांवरील रेल्वे रुळावर पाणी साचल्याने पूर्णपणे बंद पडले होते. मेट्रो व मोनो रेल बंद पडल्या तर एक्सप्रेससह अर्धा मुंबईतील रस्त्यावर पाणी भरल्याने दळणवळण व्यवस्था कोलमडली आहे. राज्यात सर्वत्र प्रवास पावसाचे थैमान सुरू असून सुमारे १५ लाख एकरवर शेतजमीन पाण्याखाली बुडाली आहे. या दाणादाणीमुळे जीवित व वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाले असून युद्धस्तरावर बचाव कार्य सुरु करण्यात येत आहे. एनडीआरएफसह राज्य राखीव दलाच्या जवानांना मदतीसाठी पाचारण करण्यात आले. नागरिकांनी घाबरून जाता प्रशासनाला सहकार्य करण्याचे आव्हान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

पावसाचा हा जोर आणखी १२ ते १४ तास कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मिठी नदीनं धोक्याची पातळी गाठल्यामुळं सकाळपासून ६०० वर नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले आहे. त्यामुळे गरज असेल तरच घराबाहेर पडा, असे आवाहन पालिका प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. शुक्रवारपासून मुंबई ठाणे, नवी मुंबई पालघर संपूर्ण राज्यात पावसाचे थैमान सुरू आहे. मात्र गेल्या २४ तासामध्ये तब्बल ठिकाणी ३०० मिमीपर्यंत पाऊस झाला. त्यामुळे अनेक भागात पाणी साचले. समुद्राला भरती आल्यामुळे पाणी बाहेर पडण्यास मार्ग नसल्याने गुडघाभर पाणी साचले होते. पाण्याचा जलदगतीनं निचरा होण्यासाठी २५६ पंप कार्यान्वित करण्यात आले आहे. मात्र मिठी नदीने ३.९ मीटरवर म्हणजेच धोक्याच्या पातळी गाठल्याने पाणी पात्राबाहेर पडून नजिकच्या वस्तीत शिरले. महापालिका आणि पोलिसांनी आतापर्यंत ४०० जणांना जवळच्या ए. एम. या महापालिका शाळेत स्थलांतरीत केलं आहे. त्यांची राहण्याची, खानपानाची व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या मिठीची पातळी नियंत्रणात येत आहे. मात्र, ती आणखी वाढली, मिठी नदी परिसरातील रहिवाशांना स्थलांतरीत करण्यासाठी एनडीआरएफच्या ५ तुकड्या तैनात करण्यात आलेल्या आहेत, अशी माहिती आयुक्तांनी दिली.

**मध्य आणि हार्बर रेल्वे ठप्प** : सततधार सुरु असल्याने दादर, हिंदमाता, सायन, वरळी, परेल, अंधेरी सबवे अशा भागात पाणी साचल्यामुळं रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळं वाहतूक कोंडीही असल्याचं चित्र आहे. तर दुसरीकडं मुंबईची जीवनवाहिनी समजली जाणाऱ्या रेल्वे लोकलवर या पावसाचा परिणाम झालाय. सोमवार रात्रीपासूनच मुंबईतील अनेक रेल्वे स्थानकात पाणी साचलं आहे. **(उर्वरित वृत्त पान ३ वर)**

### मोनोत २०० प्रवासी अडकले

पावसामुळे रस्ते वाहतूक कोलमडल्याबरोबरच तीनही मार्गांवर लोकल सेवा ठप्प झाली. तर मेट्रो स्थानकातही पाणी शिरल्याने ते सकाळी साडेअकरानंतर बंद करण्यात आली.लोकल बंद पडल्याने हार्बर मार्गांवर राहत असलेल्या घराबाहेर पडलेल्या नागरिकांनी मोनो रेलकडे मोर्चा वळविला. मात्र ओव्हरलोड झाल्याने पावणे सहाच्या सुमारास चेंबूर ते भक्ती पार्क मार्गांवरील दोन्ही बाजूने येणाऱ्या मोनोरेल अचानक बंद पडली. काही वेळातच आतील एसी, लाईटही बंद पडली. त्यामुळे आतील प्रवासात एकच हाहाकार उडाला. आरडाओरड सुरू झाली. गर्दीमुळे अनेक महिला व वृद्ध पुरुषांना श्वसनाचा त्रास होऊन चक्कर आली. काहींनी कंट्रोल रूम व आपत्ती निवारण कक्षाला फोन केल्यानंतर त्याठिकाणी अग्निशमन दलाचे जवान पोहचले.शिडीच्या सहाय्याने ते वरती पोहचले. मोनोच्या काचा फोडून एक एक प्रवास्याला बाहेर काढण्यात आले. सुमारे दोन तासानंतर सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात यश आले. अनेकांना नजीकच्या वाडिया रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश, नुकसानीचे तातडीने पंचनामे

### मुख्यमंत्री; मंत्रिमंडळ बैठकीत परिस्थितीचा आढावा

**मुंबई, दि. १९ ऑगस्ट :**

राज्यात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर नियंत्रणासाठी सर्वच यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश दिले आहेत. जीवितहानी, पशूधन आणि घरांचे नुकसानीसाठी तातडीने मदतीसाठी अधिकारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.शेतीच्या नुकसानीचेही तातडीने पंचनामे करावेत आणि एनडीआरएफच्या निकषांप्रमाणे भरपाई देण्याबाबत कार्यवाहीचे निर्देश दिल्याचे मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील परिस्थितीबाबत चर्चा झाल्याची माहिती देऊन फडणवीस म्हणाले,'. राज्यातील सुमारे १२ ते १४ लाख एकरवरील पिकांना फटका बसल्याची माहिती प्रथमदर्शनी हाती आहे. अजूनही पावसाचा जोर ओसरला नाही. त्यामुळे एनडीआरएफ, एसडीआरएफ तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध यंत्रणांना सतर्कतेचे आणि समन्वयाचे निर्देश देण्यात आले आहेत. वेध शाळांकडून मिळणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने राज्यातील नागरिकांना पावसाबाबत दर तीन तासांनी सतर्कतेचे (अलर्ट) देण्यात येत आहेत. नांदेड जिल्ह्यात ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. यात आठ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. राज्यातील सर्व आपत्ती नियंत्रण कक्षांना दक्ष राहण्याचे आणि माहितीचे अदान-प्रदानाबाबत समनव्य राखण्याचे निर्देश देण्यात आले.

**मुंबईतील परिस्थितीवर सातत्यपूर्ण लक्ष** : अतिवृष्टीचा फटका मुंबई महानगराला सर्वाधिक बसला आहे. कालपासून पाऊस सुरूच आहे. त्यातच आज काही तासांत अतिवृष्टीच्या मानकांहून अधिक पाऊस झाला. अनेक सखल भागात पाणी साचले ही वस्तुस्थिती आहे. पण त्यावर मुंबई महापालिकेच्या सर्वच यंत्रणांसह, राज्याच्या यंत्रणा समन्वयाने काम करत आहे. लोकल रेल्वे गाड्यांची सेवा काही तास खोळंबली. या सगळ्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यंत्रणा पराकाष्ठा करत आहेत. मुंबई शहर परिसरात खबरदारी म्हणून कार्यालयांनाही सुटी देण्यात आली. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या पट्ट्यामुळे वसई, पालघर या भागात आधीच रेड अलर्ट देण्यात आला होता. कमी दाबाच्या या पट्ट्यामुळे अतिवृष्टी होणारच. पण त्यावर आपण कुठे, किती पाऊस पडतो आहे. याबाबतचे अलर्ट दर तीन तासांनी पाठविण्याची व्यवस्था उभी केली आहे.

## महत्त्वाचे

### शेअर बाजारांत सलग चौथा दिवस तेजीचा

**मुंबई** : रिलायन्स इंडस्ट्रिज आणि टाटा मोटर्सच्या समभागांमध्ये झालेल्या दणदणीत खरेदीचे बळ मिळाल्याने मंगळवारी शेअर बाजारांत सलग चौथ्या दिवशी तेजी राहिली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३७० अंकांनी वधारून



८१,६४४ या पातळीवर बंद झाला. दिवसभराच्या व्यवहारादरम्यान निर्देशांकाने ४८२ अंकांची उसळी घेतली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १०३ अंकांनी उसळून २४,९८० या पातळीवर बंद झाला. दिवाळीपर्यंत जीएसटीमध्ये होणार असलेल्या सुधारणांच्या वृत्तामुळे शेअर बाजराला बळ मिळाले, असे विश्लेषकांनी सांगितले. आजच्या सत्रात इटर्नल टेक महिंद्रा, कोटक महिंद्रा बँक, हिंदुस्थान युनिलिव्हर आणि मारुतीला सर्वाधिक फायदा झाला. मात्र, बजाज फिनसर्व्ह, पॉवर ग्रिड, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, एचसीएल टेक या कंपन्यांत सर्वाधिक घसरण झाली.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनला जाणार

**नवी दिल्ली** : शांघाय सहकार्य संघटनेच्या आगामी शिखर परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनला जाणार असल्याची माहिती राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांच्यासोबत मंगळवारी झालेल्या बैठकीदरम्यान दिली. सीमा प्रश्नावरील विशेष प्रतिनिधींच्या संवादाच्या नवीन आवृत्तीत दूरदर्शनवर प्रसारित होणाऱ्या



उद्घाटन भाषणात, डोवाल यांनी भारत-चीन संबंधांमधील 'नवीन ऊर्जा आणि गती' तसेच सीमेवर असलेल्या शांततेवरही प्रकाश टाकला. सीमेवर शांतता आहे. दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध आता अधिक महत्त्वपूर्ण झाले आहेत, असे डोवाल यांनी सांगितले. एससीओ शिखर परिषदेसाठी आमचे पंतप्रधान चीनला जाणार आहेत, त्यामुळे आजची चर्चा अतिशय महत्त्वाची होती. चीनमधील तियानजिन शहरात ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या एससीओच्या शिखर परिषदेत नरेंद्र मोदी सहभागी होणार असल्याच्या वृत्ताला पहिल्यांदाच या माध्यमातून अधिकृतपणे दुजोरा मिळाला आहे.



मुंबईत मागील ४८ तासांत संततधार पाऊस सुरू असून यामुळे रस्त्यांना तलावाचे स्वरूप आले. अतिशय वर्दळीचा परिसर असलेल्या कुर्ला भागात साचलेल्या पाण्यामुळे मुख्य रस्त्यावर बसेस आणि वाहने बंद पडली आणि नागरिक जीव वाचविण्यासाठी धडपडत होते.

## औषधींसह टीव्ही-फ्रिज होणार स्वस्त

### जीएसटी सुधारणा : महागाई होणार कमी

**नवी दिल्ली, १९ ऑगस्ट**

केंद्रातील एनडीए सरकार वर्तमान वस्तू आणि सेवाकरात सुधारणा करणार आहे. प्रस्तावित जीएसटी-२ अंतर्गत ०५ आणि १८ टक्क्यांचे दोन टप्पे पाडले जाणार असून विमा, औषधींसह टीव्ही आणि फ्रिज स्वस्त होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळून अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. सरकार जीएसटीचे ०५ आणि १८ टक्के, असे दोन स्लॅब आणण्याच्या विचारात आहे. विमाच्या हप्त्यावर १८ ऐवजी शुन्य किंवा पाच टक्के जीएसटी लागू शकतो. याशिवाय टुथब्रश, केशतेल,औषधी आदी वस्तूंवर शुन्य जीएसटी लागू शकते. सध्या चैनीच्या वस्तू असलेल्या टीव्ही, फ्रिज आदींवर २८ टक्के जीएसटी लावल्या जातो. हे प्रमाण १८ टक्क्यावर येण्याची शक्यता आहे. त्यामुळे ह्या वस्तू स्वस्त होऊन मागणी वाढणार आहे. उत्पादन वाढ होणार असल्याने रोजगार निर्मितीला चालना मिळून बाजारात चैतन्य निर्माण होईल, असे बोलले जात आहे. याशिवाय हस्तशिल्प, कृषी उत्पादने, वस्त्रोद्योग, खते आदी क्षेत्रांनाही दिलासा देण्याकडे सरकारचा कल आहे. पेट्रोल आणि डिझेलवरील लघू श्रेणीतील चारचाकी वाहने १८ टक्क्याच्या श्रेणीत येतील, असा अंदाज आहे. सध्या २८ टक्के जीएसटी लावल्या जाते. नव्या कररचनेत कारच्या विक्रीत १५ ते २० टक्के वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. सुधारित जीएसटीमुळे किरकोळ बाजारातील वस्तूंच्या किंमती कमी होण्यास मदत होणार आहे.

## ऑटो कंपन्यांवरील अरिष्ट टळले

### चीनने रेअर अर्थ मेटलवरील निर्बंध हटविले



### खते, टनेल बोरिंग मशीनचाही समावेश

**नवी दिल्ली, १९ ऑगस्ट**

काही महिन्यांपूर्वी चीनने ऑटोमोबाईल सेक्टरला लागणारे रेअर अर्थ मेटलच्या निर्यातीवर निर्बंध आणले होते. अवघ्या जगाचा पुरवठा थांबला होता. यामुळे भारतीय कंपन्यांवर काम बंद ठेवायची वेळ आली होती. आता अमेरिकेनंतर भारतासाठी चीनने रेअर अर्थमेटलसाठी निर्बंध उठविले आहेत.

रेअर अर्थ मेटलसाठी परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी गेल्याच महिन्यात चीनचे समकक्ष वांग यी यांच्याशी चर्चा केली होती. आता ते भारताच्या दौऱ्यावर आले असताना त्यांनी यावर माहिती दिली आहे. चीनने खते, दुर्मिळ पृथ्वी चुंबकीय/खनिजे आणि टनेल बोरिंग मशीनच्या भारतावरील निर्यातीवरील निर्बंध उठवले आहेत.

या विषयाशी संबंधीत लोकांनी चीनने या वस्तूंच्या शिपमेंट पाठविण्यास सुरुवात केली आहे. सध्या या गोष्टी ट्रान्सपोर्टमध्ये आहेत. रेअर अर्थ मॅग्नेटमध्ये निओडिमियम-लोह-बोरॉन यांचा समावेश आहे. इलेक्ट्रिक वाहनांमध्ये ट्रॅक्शन मोटर आणि इलेक्ट्रिक वाहने आणि पारंपारिक वाहनांमध्ये पॉवर स्टीअरिंग मोटरसाठी याचा वापर केला जातो.

भारतातील अनेक दुचाकी उत्पादक आता दुर्मिळ पृथ्वी चुंबकांना पर्याय शोधत आहेत. टीव्हीएसने देखील याला पर्याय शोधण्यास सुरुवात केली होती. ओला इलेक्ट्रिकने आधीच दुर्मिळ पृथ्वी चुंबकमुक्त तंत्रज्ञानाचा वापर करणारी मोटर डिझाइन केली आहे. आणि डिसेंबर तिमाहीपासून ही मोटर वाहनांमध्ये वापरण्यास सुरुवात करणार आहे. *(वृत्तसंस्था)*

**उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक**

### बी. सुदर्शन रेड्डी इंडिया आघाडीचे उमेदवार

**नवी दिल्ली, १९ ऑगस्ट**

उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी काँग्रेसच्या नेतृत्वातील विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीने सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांची उमेदवारी आज जाहीर केली.



उपराष्ट्रपतिपदाचा उमेदवार ठरवण्याचा अधिकार इंडिया आघाडीच्या बैठकीत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांना देण्यात आला होता. त्यानुसार खडगे यांनी आज आपल्या निवासस्थानी आयोजित संयुक्त पत्रपरिषदेत बी. सुदर्शन रेड्डी यांच्या उमेदवारीची घोषणा केली. *(तभा वृत्तसेवा)*

## राधाकृष्णन् यांना अविरोध निवडून द्या

**● पंतप्रधान मोदींचे सर्व पक्षांना आवाहन ● रालोआ बैठकीत राधाकृष्णन यांचा सत्कार**

**नवी दिल्ली, १९ ऑगस्ट**

विरोधी पक्षांनी रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांच्या उमेदवारीला पाठिंबा देत त्यांची अविरोध निवड करावी, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

रालोआ सांसदीय पक्षाची बैठक आज संसदभवनाच्या ग्रंथालय इमारतीत झाली. या बैठकीत रालोआचे उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन यांच्याबद्दल गौरवोद्गार काढत मोदी यांच्या हस्ते त्यांचा सत्कारही करण्यात आला. सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी त्यांचा परिचय करुन दिला. बैठकीनंतर राधाकृष्णन यांनी रालोआतील मित्रपक्षांचे नेते आणि सदस्यांशी संवाद साधला, या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपाचे आणि रालोआतील मित्रपक्षांचे नेते उपस्थित होते.



उपराष्ट्रपतिपदाचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन् यांचा पंतप्रधान मोदी यांनी सत्कार केला. यावेळी उपस्थित केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, जेपी नड्डा, राजनाथसिंह, अमित शाह, किरेन रिजिजू

राधाकृष्णन ओबीसी समाजाचे आणि जमिनीवरील नेते आहे, ते राजकारण खेळू शकत नाही, असे मोदी म्हणाले. उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक अविरोध व्हावी तसेच राधाकृष्णन यांच्या उमेदवारीला सर्व राजकीय पक्षांनी पाठिंबा द्यावा, यासाठी संरक्षणमंत्री राजनाथसिंह प्रयत्न करत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. *(तभा वृत्तसेवा)*

**आता रेल्वेतही विमानासारखा नियम**

## जादा सामान बाळगल्यास भरावा लागणार दंड

**नवी दिल्ली, १९ ऑगस्ट**

विमानाप्रमाणेच आता रेल्वे प्रवासातही सामानाचे वजन तपासले जाणार आहे. भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि सोयीसाठी सामानाचे वजन नियंत्रित करण्याचा निर्णय घेतला असून, काही प्रमुख स्थानकांवर या नियमाची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार आहे. यामुळे अतिरिक्त सामान घेऊन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दंड भरावा लागू शकतो.

रेल्वेच्या नियमानुसार, प्रत्येक श्रेणीसाठी मोफत सामान वाहून नेण्याची मर्यादा निश्चित केली आहे. मर्यादेपेक्षा जास्त सामान असल्यास... प्रवाशांकडे निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त सामान असेल आणि त्यांनी ते बुक केले नसेल, तर त्यांना दंड भरावा लागेल. रेल्वे प्रवाशांना त्यांच्यासोबत १० किलोपर्यंत अतिरिक्त सामान घेऊन जाण्याची परवानगी असेल, परंतु त्यापेक्षा जास्त वजनासाठी सामान बुक करणे आवश्यक आहे. रेल्वे अधिकाऱ्याचे स्पष्टीकरण रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक प्रवासी जास्त सामान घेऊन प्रवास करतात, ज्यामुळे रेल्वेच्या डब्यात बसताना आणि चालताना अडथळे निर्माण होतात. यामुळे प्रवाशांना आणि इतरांची गैरसोय होते. तसेच, अतिरिक्त सामान सुरक्षेसाठीही धोकादायक ठरू शकते. सध्या उत्तर रेल्वे आणि उत्तर मध्य रेल्वेने लखनौ आणि प्रयागराज प्रमुख स्थानकांवरून ही नवीन प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला. यात प्रयागराज, मिर्झापूर, कानपूर, अलीगढ जंक्शन यांसारख्या मोठ्या स्थानकांचा समावेश आहे. विमानतळांप्रमाणेच, रेल्वे स्थानकांवरही सामान बुक करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

| श्रेणी | प्रथम श्रेणी | एसी सेकंड क्लास | थर्ड एसी आणि स्लीपर | जनरल |
|---|---|---|---|---|
| वजन मर्यादा | ७० किलो | ५० किलो | ४० किलो | ३५ किलो |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## स्वातंत्र्य दिन उत्साहात...



### मनोरमा परिवार

जिल्ह्यातील अग्रगण्य बँक म्हणून ओळख असलेल्या मनोरमा को-ऑपरेटिव्ह बँक तसेच मनोरमा मल्टिस्टेट आणि परिवारातील इतर वित्तीय संस्थांच्या वतीने ध्वजारोहण करून स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. अभिजित वाघचवरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी राष्ट्रपिता म. गांधींसह सर्व राष्ट्रीय पुरुषांना अभिवादन करण्यात आले. चेअरमन श्रीकांत मोरे यांनी सर्व सभासद, कर्जदार, ठेवीदार यांच्यासह जिल्ह्यातील नागरिकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी डॉ. अभिजित वाघचवरे यांनी बँक व्यवस्थापनाचे कौतुक केले. तसेच शारीरिक स्वाथ्यासाठी तणाव, झोप, आहार, व्यायाम या चतुःसूत्रीचा अवलंब करावा. तरच उत्तम आरोग्य लाभेल, असे ते म्हणाले. यावेळी प्रमुख अतिथीचे स्वागत व्हा. चेअरमन संतोष सुरवसे यांनी केले. याप्रसंगी मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड, डॉ. सुमित मोरे, डॉ. ऋचा मोरे पाटील, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड, संचालक दत्तात्रय मुळे, गणपत कदम, शुभांगी भोसले, विकास सक्री, सुहास भोसले, गजेंद्र साळुंके, प्रशांत शहापूरकर, डॉ. सत्यजित वाघचवरे, डॉ. बब्रुवाहन रोंगे, संतोष मोटे, डॉ. मिताली मोरे सी.ई.ओ. शिल्पा कुलकर्णी -मोहिते, नीलकंठ करंडे, कमलाकर पुजारी, कविता कुलकर्णी, अरुंधती नायडू, पुरुषोत्तम साखरे, ॲड. दीपा भोसले उपस्थित होते.




### श्री सरस्वती मंदिर संस्था

श्री सरस्वती मंदिर संस्थेत स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. निवृत्त ग्रुप कॅप्टन वायुसेना प्रतापसिंह परदेशी, पॅथालॉजिस्ट डॉ. राजीव प्रधान यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग देशमुख, उपाध्यक्ष रेवती कुलकर्णी, खजिनदार सुधीर देव, माजी अध्यक्ष रघुनाथजी दामले, सदस्य शिरीष कुलकर्णी, प्रशांत बडवे, श्री जिड्डीमनी, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, जयश्री राठोड,व सोनाली सोनाळे आदी उपस्थित होते. राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीत आणि संविधानवाचन सुचेता पोकळे यांनी केले. संगीत विभागातर्फे संतोष कोथळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचे नव्या दिलाने नव्या युगाचे गाणे,जय हिंद हिंद, उठो जवानो देश की वसुंधरा पुकारे या सामुहिक गीतांचे सादरीकरण झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सामुहिक क्रीडाशिक्षक विरेश अंगडी यांच्या मार्गदर्शनाखाली कवायत केली. नशामुक्त शपथेचे वाचन रोहिणी कुलकर्णी यांनी केले. पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी सूत्रसंचालन केले.



### भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुल

भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलात स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. भारती विद्यापीठ माध्यमिक विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक पवार व वरिष्ठ लेखनिक कोळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलातील अभिजीत कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे डायरेक्टर सावंत, भारती बँकेचे व्यवस्थापक हात्ताळीकर, ग. सा. पवार प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विजया गोळे, मंदिरच्या मुख्याध्यापिका वैशाली मोहोळ हे उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत म्हणून राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. विद्यार्थ्यांनी संचलनाने राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी भाषणे, समूहगीत, देशभक्तीपर नृत्य सादर केले. सूत्रसंचालन माध्यमिक विभागाचे मुठे यांनी केले. कार्यक्रमास बालविकास विभागाच्या ज्येष्ठ शिक्षिका वैशाली शिंदे, संतोषी शेंडे, दीपा तोटद, भाग्यश्री म्हेत्रे, भाग्यश्री शिरसीकर, वृषाली इनामदार तसेच लेखनिक अनिल माने, गौराबाई हलसंगी, प्राजक्ता मोकाशी होते.

### साई व्हिजन स्कूल

साई व्हिजन इंग्लिश मिडियम स्कूल (आहेरवाडी ता. दक्षिण सोलापूर) येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भालचंद्र सुतार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर गोल्ड व्हॅल्यूटरचे अध्यक्ष निलेश धाराशिवशंकर व पुण्याचे पोलीस उपनिरीक्षक बसवराज चिट्टे व वळसंग पोलीस ठाण्याचे संतोष चव्हाण हे होते. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम पार पाडला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी कवायतीचे प्रकार सादर केले. अध्यक्षीय भाषण भालचंद्र सुतार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सधाकर काळे, सलमा पिंजारी, प्रियांका कोणदे, राणी बिराजदार, संगीता कुसबुळे, मोहिनी देशमुख, रेश्मा माशाळे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रियंका कोणदे व राणी बिराजदार यांनी केले. प्रास्ताविक सलमा पिंजारी यांनी केले.

# महाराष्ट्रात ४२ हजार ८९२ कोटींची गुंतवणूक, २६ हजार रोजगाराची निर्मिती

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत १० सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १९ ऑगस्ट-**

महाराष्ट्र डेटा सेंटर कॅपिटल आणि सौरऊर्जा एकत्रीकरण कॅपिटल म्हणून पुढे येत असून उत्पादन क्षेत्रातही मोठी क्रांती घडणार आहे. यूकेसोबत झालेल्या रणनीतिक करारामुळे भारतात अधिक गुंतवणूक होत आहे. आज विविध गुंतवणुकींसाठी महत्त्वपूर्ण असे आठ सामंजस्य करार आणि दोन रणनीतिक करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात तब्बल ४२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन २८ हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी केले.



आज मंत्रालयातील समिती कक्षात आज त्यांच्या उपस्थित १० सामंजस्य करारांचे आदानप्रदान करण्यात आले. त्यावेळी ते गुंतवणूकदारांसमोर बोलत होते. ते म्हणाले की, गुंतवणूकदारांनी अतिशय ठाम आणि सकारात्मक बांधिलकी दाखवली आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक सुरळीत होण्यासाठी शासनाची संपूर्ण टीम सुरुवातीपासून शेवटपर्यंत तुमच्यासोबत काम करेल. याशिवाय हायपरलूप प्रकल्पालाही गती मिळत आता आयआयटी मुंबई व आयआयटी मद्रास यांच्यामुळे प्रकल्पाला गती मिळत आहे. लॉजिस्टिक, वाहतूक आणि मोबिलिटी क्षेत्रात राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात हा प्रकल्प आमूलाग्र बदल घडवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**८ सामंजस्य करार आणि २ रणनीतिक करार :**

* सोलर पॅनेल निर्मितीसाठी ज्युपिटर इंटरनॅशनल लि. या कंपनीसोबत १०९०० कोटी रूपयांची गुंतवणूक करार झाला असून यातून ८३०८ रोजगार निर्मिती
* रोचक सिस्टिम्स प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर करिता २५०८ कोटी रूपयांचा करार. १ हजार रोजगार निर्मिती.
* रोव्हिसन टेक हब प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर या सेक्टरकरिता २५६४ कोटी रूपयांची गुंतवणूक करार. ११०० रोजगार निर्मिती.
* वॉव आयर्न ण्ड स्टिल प्रा.लि. यासाठी पोलाद उद्योगाकरिता ४३०० कोटी रूपयांचा करार. १५०० रोजगार निर्मिती.
* वेबमिंट डिजिटल प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटरकरिता ४८४६ कोटी रूपयांचा गुंतवणूक करार. २०५० रोजगार निर्मिती.
* औद्योगिक उपकरणे क्षेत्राकरिता टलास्ट कॉपको या कंपनीसोबत ५७५ कोटी रूपयांचा करार. ३४०० रोजगार निर्मिती.
* हरित उर्जा क्षेत्रात एलएनके ग्रीन एनर्जी या कंपनीसोबत ४७०० कोटी रूपयांचा गुंतवणूक करार. २५०० रोजगार निर्मिती.
* डेटा सेंटर, लॉजिस्टिक सेंटर रिअल इस्टेट या क्षेत्राकरिता प्रेस्टीज इस्टेट प्रोजेक्ट लि.या कंपनीसोबत १२५०० कोटी रूपयांचा गुंतवणूक करार. ८७०० रोजगार निर्मिती.

याशिवाय, ग्लोबल इंडिया बिझिनेस कॉरिडॉर तर्फे महाराष्ट्रातील युके व युरोपमधील गुंतवणूक आकर्षिक करण्यासाठी सहकार्य करण्याचा सामंजस्य करार आणि टीयूटीआर हायपरलूम प्रा.लि. कंपनीकडून जेएनपीटी व वाढवण बंदरावर अत्याधुनिक वाहतूक व्यवस्था उभारण्यासंदर्भात करार करण्यात आला आहे.

# ग्रामीण फोटोग्राफर असोसिएशनची दिंडी उत्साहात

## पालखीमध्ये कॅमेरा ठेवून केले पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

जागतिक फोटोग्राफर दिनानिमित्त ग्रामीण फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने मंगळवारी फोटोग्राफर दिंडी उत्साही वातावरणात काढण्यात आली. पालखीमध्ये कॅमेरा ठेवून ही दिंडी काढण्यात आली. टाळ मृदंगाच्या निनादात वारकऱ्यांसह फोटोग्राफर्स या दिंडीत सहभागी झाले होते. प्रथमच अशा पद्धतीने अभिनव उपक्रम राबविण्यात आला.



प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि चार हुतात्मा यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पालखी मधील कॅमेऱ्याचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष अध्यक्ष विक्रम खेलबुडे, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, कीर्तनकार ह.भ.प.सूर्या भोसले महाराज पंढरपूर, डिजिटल मीडिया असोसिएशन संघटना अध्यक्ष विजयकुमार बाबर, पत्रकार वैभव गंगणे, अनिकेत गायकवाड, रवी ढोबळे, बालाजी नवले, हरि नगरे, सतीश माने, सिद्धू डिंगणे, किरण कोळपे, योगेश भोसले, सुभाष सन्नके, अशोक सोनकंटले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

टाळ मृदंगांच्या निनादात या दिंडीस चार हुतात्मा पुतळ्यापासून सुरुवात झाली. पुढे सरस्वती चौक मार्गे मेकॅनिक चौक त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर या दिंडीचा समारोप करण्यात आला. सूत्रसंचालन पत्रकार वैभव गंगणे यांनी केले. अशोक सोनकंटले यांनी आभार मानले. यात सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील फोटोग्राफर्स आणि पालखी भजनी मंडळाचा यात समावेश होता.



# जननायक विचार मंचतर्फे मंत्री रामनाथ ठाकूर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

जननायक कर्पूरी ठाकूर यांचे चिरंजीव व केंद्रीय कृषी व किसान कल्याण राज्यमंत्री, जननायक विचार मंचाचे मार्गदर्शक रामनाथ ठाकूर यांची जननायक विचार मंचच्या पदाधिकाऱ्यांसोबत कृषी भवनात शिष्टाचार भेट झाली. यावेळी जननायक विचार मंचतर्फे रामनाथ ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला.संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष साथी नितीन कांबळे यांनी संघटनेच्या उद्दीष्टांबद्दल माहिती दिली. यावेळी नितीन कांबळे यांनी रामनाथ ठाकूर यांना महात्मा फुले यांचा शाल-पगडी व रक्ताने तयार केलेली जननायक कर्पूरी ठाकूर यांची प्रतिमा भेट देवून सत्कार करण्यात आला. या शिष्टमंडळात मुरलीधर देशपांडे, ॲड. अशोक कुमार, प्रेमानंद जगताप, ॲड. संजय गायकवाड, अनिल भिंगारे, बालाजी भिंगारे, इंद्रजीत भिंगारे, सचिन कांबळे, अनिल सुटे आदींचा समावेश होता.

# दहावी व बारावी खासगी परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

बोर्डाने दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना खासगी १७ नंबर फॉर्म भरून परीक्षेला बसण्याची संधी दिली आहे. जे शाळेत जाऊ शकत नाहीत, नियमित शिक्षण घेऊ शकत नाहीत अथवा शिक्षण अर्धवट राहिलेल्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे.

त्यासाठी शाळा सोडल्याचा दाखला मूळ प्रत, नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञापत्र, आधारकार्ड, स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो ही कागदपत्रे आवश्यक आहेत. दहावी आणि बारावीसाठी नोंदणी शुल्क १ हजार ११० रुपये, प्रक्रिया शुल्क १०० तसेच विलंब शुल्क १०० रुपये आहे. विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व नियमित शुल्क ऑनलाइन भरून अर्जाची प्रिंटआउट, ऑनलाइन नावनोंदणी शुल्क जमा केल्याची पोचपावतीची प्रिंटआउट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत किंवा कनिष्ठ महाविद्यालयात जमा करण्याची मुदत ३१ ऑगस्ट आहे. शिक्षण मंडळाचे संकेतस्थळावर http://www.mahahsscboard.in वर ऑनलाइन नोंदणी करा. त्यापूर्वी ज्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातून परीक्षा द्यायची आहे. तेथे जाऊन त्यांचा सांकेतिक क्रमांक, विषय योजना, माध्यम, शाखा व इतर आवश्यक माहिती घ्या. संकेतस्थळावरील स्टुडंट कॉर्नरवरील सूचनांची अंमलबजावणी करा. आवश्यक कागदपत्रे स्कॅनर, मोबाइलद्वारे पीडीएफ काढून अपलोड करा. दिलेल्या पत्त्यानुसार सर्व जिल्हा, तालुका निवडलेल्या माध्यमानुसार येणाऱ्या शाळांच्या यादीतून एका शाळेची निवड करावी लागणार आहे .

# युवक-युवतींनी वागण्यात सतत विनयता बाळगावी

## सामाजिक कार्यकर्त्या स्मिता डमामे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

आई वडिलांनी दिलेले संस्कार जतन करुन विद्या विनयेन शोभते या उक्तीनुसार युवक युवतींनी आपल्या वागण्यात सतत विनयता बाळगावी.तसेच आपण सर्वांनी अपयशाला न डगमगता अविरत परिश्रम करीत राहिल्यास निश्चित यशाचे शिखर गाठता येते असे प्रतिपादन नवी मुंबई येथील सामाजिक कार्यकर्त्या स्मिता डमामे यांनी केले.




श्री मल्लिरशैव शिवसांप्रदायक शिवशिंपी समाजाच्या गुणवंत विद्यार्थी व मान्यवरांच्या सत्कार सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून सौ. डमामे बोलत होत्या. सौ.स्मिता डमामे या मूळच्या सोलापूरच्या कन्या असून सध्या ते नवी मुंबई येथे शिवसेना(उभाठा) चे महिला आघाडीच्या क्रियाशील सदस्या व ख्यातनाम निवेदिका आहेत.

या कार्यक्रमास रोजगार विनिमय कार्यालयातील निवृत्त अधिकारी रमेश हुम नाबादकर, शिवशिंपी समाजाचे विश्वस्त दयानंद विजापूरे, शिवशंकर चोळळे,पशुपती माशाळ, सिद्रामप्पा नरोणे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर समाज अध्यक्ष शिवानंद नसली,सचिव प्रकाश अतनूर,महिला अध्यक्ष पौर्णिमा तोटद शिक्षण समिती चेअरमन विशाल अनगिरे,शिवशंकर डमामी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी श्री. हुम नाबादकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नवनवीन ज्ञान मिळवत चिकाटी बाळगावी व सतत परिश्रम करावे असे सांगितले.

समाज अध्यक्ष श्री.नसली यांनी समाजाच्या शिवदासमय सांस्कृतिक भवनाच्या प्रगतीची माहिती देऊन समाजबांधवांनी शिवदासमय सांस्कृतिक भवनाच्या लवकर पूर्ततेसाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात समाजातील विविध ठिकाणी सेवेतून निवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी,सेवेतील बढती व विशेष प्राविण्य मिळविलेले तसेच दहावी ते पदवी पर्यंत यश संपादन केलेले ७५ व्यक्ती व विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला.सत्कार मूर्तीच्या वतीने प्रतीक डमामे व संदेश चोळळे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी गणेशोत्सव अध्यक्ष संतोष तोटद व उपाध्यक्ष चेतन विजापूरे यांचाही सत्कार करण्यात आला.तसेच सांस्कृतिक भवनचे १४ सीसी कॅमेरा यंत्रणेचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे आभार प्रा.विशाल अनगिरे यांनी मानले तर सूत्रसंचलन रवींद्र आमणे यांनी केले.

# स्वातंत्र्यसेनानी शिवदारे यांच्या जयंतीनिमित्त कवी संमेलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १९ ऑगस्ट -**

महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर, सिद्ध संघ प्रतिष्ठान आणि सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि किरकोळ ग्राहक भांडार सोलापूर यांच्या वतीने स्वातंत्र्यसेनानी वि. गु. शिवदारे यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ कवी माधव पवार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कवी संमेलनाचे आयोजन केले होते.

यावेळी ॲड. आर. एस. पाटील, महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे, संस्थेचे विश्वस्त भीमाशंकर शेटे, अंजली तिवारी, प्राचार्य डी. एस. सूत्रावे, प्राचार्य डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी डॉ. श्रीकांत येळेगावकर, कैलास माणिकशेटे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जगन्नाथ शिंदे यांनी केले




**तुझ्या स्वर्गाहून मला माझी झोपडीच बरी...**

या कवी संमेलनात ज्येष्ठ कवी माधव पवार यांनी माझा वाद नेहमी..ईश्वराशी असतो.. तुझ्या स्वर्गाहून मला माझी झोपडीच बरी..तीच्या काळजात नांदे.. गाथा आणि ज्ञानेश्वरी... तुझे ऐश्वर्याचे जिणे त्यात रंभेचे नर्तन....माझ्या झोपडीत चाले सार्या संतांचे कीर्तन..सादर करून त्यांनी वडील रा. ना. पवार यांची लेकीची लावणी सादर केली त्यावेळेला संपूर्ण सभागृह भावुक झाला होता.

**आई म्हणजे फक्त जन्म देणारी नव्हे...**

श्री. कुलकर्णी यांनी आई म्हणजे फक्त जन्म देणारी नव्हे..ती माझ्या प्रत्येक पावलातली सावली.. कष्टांनी बांधलेली प्रार्थना... ही आईवरची कविता म्हटली. मारुती कटकधोंड यांनी. तू पावसात भिजताना..पाऊस तुझ्या अंगावर उतरतो... ही प्रेम कविता सादर केली. डॉ. शिवाजी शिंदे, मह्या बापाची..कोणा येईना सर ..बाप नसतो जेव्हा..सुने वाटते घर ही बापावरची कविता म्हटली तर गिरीश दुनाखे यांनी अरे पावसा पावसा, किती आला रे जोरात, तुझी होताच भेट, धरती न्हाली आनंदात ही कविता सादर केली. बद्दीउजमा बिराजदार, यांनी प्रणाम तुजला प्रणाम आई!.. मुखी तुझे फक्त नाम आई ही गझल सादर केली. राजेंद्र भोसले यांनी.. माझ्यासारखे प्रेम तुझ्यावर दुसरे कोणी करणार नाही ही एक प्रेमाची उपमा देणारे कविता सादर केली. डॉ. माधुरी भोसले यांनी जन्मभर साथ देईल.. अशी साथ हवी.., हीमैत्र नावाची कविता सादर केली.डॉ. रामचंद्र धर्मसाले यांनी संसाराची झाली होळी.. तरीही दारू सुटेना..काय करु मी सांगा भावांनो!.. झाली माझी दैना...बद्दीउजमा बिराजदार, यांनी प्रणाम तुजला प्रणाम आई!.. मुखी तुझे फक्त नाम आई ही गझल सादर केली. राजेंद्र भोसले माझ्यासारखे प्रेम तुझ्यावर दुसरे कोणी करणार नाही ही एक प्रेमाची उपमा देणारे कविता सादर केले आणि डॉ. माधुरी भोसले यांनी जन्मभर साथ देईल अशी साथ हवी, मैत्र नावाची कविता सादर केली.



# रॅगिंगने विद्यार्थ्यांचे आयुष्य उध्वस्त होते : ॲड. सरोजिनी तमशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

रॅगिंग हा तरुण पिढीमध्ये निर्माण झालेला एक दोष आहे. आपल्या तात्कालिक आनंदासाठी म्हणून केले जाणारे हे रॅगिंग विद्यार्थ्यांचे आयुष्य उध्वस्त करते. ज्याचे रॅगिंग केले गेले तो विद्यार्थी अनेकदा नैराश्यात जाऊन आत्महत्येपर्यंत पोहोचतो आणि ज्याने रॅगिंग केलेले आहे तो कायद्याने दोषी ठरुन दोन वर्षापासून ते दहा वर्षापर्यंतच्या शिक्षेस व दंडास पात्र ठरतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी रॅगिंग पासून दूर राहावे, असे प्रतिपादन ॲड सरोजिनी तमशेट्टी यांनी केले.

वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयात अँटी रॅगिंग सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती घडवून आणण्याच्या उद्देशाने त्या विद्याार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संतोष कोटी होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. विजया महाजन यांनी केले वक्त्याच्या परिचय प्रा.डॉ. गोविंद तोडकरी यांनी करून दिला. प्रा डॉ चंद्रकांत चव्हाण यांनी आभार प्रदर्शन मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. स्मिता ढावरे यांनी केले. कार्यक्रमास प्रा. डॉ. मेघा मुळुजकर, प्रा. डॉ. नागनाथ धायगोडे, प्रा. डॉ. महादेव आसबे, प्रा. डॉ. अमोल शिंदे, प्रा. डॉ. दिपाली पाटील, प्रा. डॉ. मनिषा चौरे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

पान १ वरुन...

## तुफानी पावसाने हाहाकार

यामध्ये दादर, कुर्ला, सायन, ठाणे, उल्हासनगर, बदलापूर, कल्याण, डोंबिवली या रेल्वे स्थानकातील ट्रॅकमध्ये पाणी साचलं आहे. त्यामुळं अप आणि डाऊन मार्गाच्या दोन्हीकडील रेल्वे सेवा ठप्प झाली आहे, अशी माहिती रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील निला यांनी दिली. मुंबई आणि उपनगरात जोरदार पाऊस बरसत आहे. त्यामुळं मुंबई आणि ठाण्यात शाळा-कॉलेज, सरकारी व निमशासकीय कार्यालयांना यांना सुट्टी देण्यात आली.

तर मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. तसेच पुढील सूचना येईपर्यंत रेल्वेनं कोणीही प्रवास करू नका, असं रेल्वेकडून वारंवार सांगण्यात आले मुंबईची मध्य रेल्वे आणि हार्बर रेल्वे या दोन्ही मार्गावरील रेल्वे लोकल सेवा ठप्प झाली असून, पश्चिम रेल्वेही अर्ध्या तास, ४५ मिनटाच्या फरकाने धावत होती. मात्र मुंबईत समुद्राला मोठी भरती असल्यानं मुंबईची तुंबई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. परंतु जे चाकरमानी कार्यालयात जाण्यासाठी सकाळी घराबाहेर पडलेत, ते रेल्वे बंद झाल्यामुळं अडकून पडले. बहुतांश रेल्वे स्थानकावर मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी झाली होती. अनेकानी रेल्वे रुळावरून चालत जाण्याचा मार्ग पत्करला. रेल्वेसेवा पूर्णपणे सुरू झाली नव्हती.

महत्त्वाचे...

## उपाशी पोटी ठेवून विवाहितेचा छळ; पतीसह चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

लग्नात मानपान केला नाही,माहेरहून पैसे आणुन दे म्हणत विवाहितेस उपाशी पोटी ठेवून तिचा छळ केला याप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांवर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे .याबाबत सुप्रिया प्रकाश बेलभंडारे वय ३० (रा. आंबेडकर नगर, होटगी रोड मजरेवाडी सोलापूर सध्या सैफुल विजापूर रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती प्रकाश, सासू सुरेखा व सासरे गजेंद्र व नणंद ज्योती (सर्व रा.सोलापूर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ मे २०२५ ते ३० जून २०२५ रोजी विवाहिता ही आंबेडकर नगर, होटगी रोड मजरेवाडी येथे सासरी नांदत होत्या. तरी संशयित आरोपींनी विवाहितेस माहेरच्या लोकांनी लग्नात मानपान केला नाही. पतीस फिरण्यासाठी दुचाकी घेवून दे, तसेच खर्च झाला असून माहेरकडून पैसे आणुन दे असे म्हणून विवाहितेस उपाशी पोटी ठेवले. शारिरीक व मानसिक छळ करून जाचहाट केला. यावरून पतीसह चौघांवर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे या प्रकरणाचा तपास हवालदार गायकवाड करीत आहे.




## फॅबटेक पब्लिक स्कूलचे डान्स स्पर्धेत यश

**सांगोला, दि. १९ ऑगस्ट -**

सांगोल्यातील रोटरी क्लब व इनरव्हील क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या डान्स स्पर्धेत फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु.कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी पहिली ते चौथी गटात तृतीय, पाचवी ते सातवी गटात तृतीय तर आठवी ते दहावी गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, रोख स्वरूपात बक्षिस व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. सदर विद्यार्थ्यांना शिक्षक अतिश बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे फॅबटेक टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, सचिव डॉ.अमित रूपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, इस्टेट डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा.प्राजक्ता रूपनर, स्कूलच्या सीईओ सारिका रूपनर, प्राचार्य सिकंदर पाटील आदींसह स्कूल मधील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



## महात्मा फुले शाळेमध्ये सेवानिवृत्त शिक्षक शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

महात्मा फुले विद्यामंदिर शाळेमध्ये भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सामूहिक गीत व डान्स सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राधा गायकवाड यांनी केले व आभार शाळेचे मुख्याध्यापक पाटील यांनी मांडले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक सेवक व पालक वर्ग उपस्थित होते. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## सावित्रीबाई फुले विद्यामंदिरात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

सावित्रीबाई फुले विद्यामंदिर येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी शिवगंगा भाग ४ परिसरातील नगरसेविका परवीन इनामदार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेच्या मुख्याध्यापिका मंगल सरवदे यांनी केले. नगरसेविका परवीन इनामदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच परिसरातील अनेक महिला या कार्यक्रमास उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सौ शारदा पाखरे मॅडम यांनी केले खाऊ वाटपा नंतर कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# कोन्हाळी आश्रमशाळा मान्यता रद्दचे आदेश

### व्हीजेएनटी समितीने मुख्याध्यापकांनाही केले निलंबीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा सोलापूर दौरा मंगळवार पासून सुरु झाला आहे. समितीच्या सदस्यांनी पहिल्याच दिवशी अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील कै. परशुराम जाधव आश्रमशाळेस भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाच्या सुविधा मिळत असल्याचे दिसून आल्याने शाळेच्या मुख्याध्यापकास निलंबीत करुन शाळेची मान्यता रद्द करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती समितीचे प्रमुख तथा अध्यक्ष आमदार सुहास कांदे यांनी दिली.

मंगळवारी सकाळी समितीच्या सदस्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर समितीच्या सदस्यांनी ग्रामीण भागातील पाहणी दौऱ्यास सुरुवात केली.



समितीचे प्रमुख आमदार कादे यांच्यासह अन्य सदस्यांनी अक्कलकोट तालुक्यातील विविध शाळा व शासकीय संस्थांची पाहणी केली. यावेळी कोन्हाळी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या निकृष्ट सुविधा पाहून समितीच्या सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

**समितीचा तीन दिवसातील कार्यक्रम निश्चित**

सोलापूर जिल्ह्यात महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा सोलापूर दौरा २० ऑगस्ट पर्यंत असणार आहे. समितीचे प्रमुख अध्यक्ष आमदार सुहास कांदे असून समितीचे सदस्य आमदार रत्नाकर गुट्टे, किर्तीकुमार भांगडिया, उमेश यावलकर, देवेंद्र कोठे, शंकर जगताप, संतोष बांगर, राजू कारेमोरे, मनोज कायंदे, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, अमोल मिटकरी, धीरज लिंगाडे, सचिन अहिर आहेत.

बुधवार, २० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते २ पर्यंत विविध स्थळांना समिती सदस्य भेट देणार आहे. दुपारी ३ ते ५ वाजता पोलीस अधीक्षक कार्यालय, महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायती, प्रादेशिक परिवहन कार्यालय, औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, कृषी अधीक्षक कार्यालय, पशुसंवर्धन कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी व मेंढी विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग येथील आस्थापनेतील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, आरक्षण व अनुशेष तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ याबाबत बैठक होणार आहे.

गुरुवार २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, जिल्हाधिकारी कार्यालय, जात पडताळणी समिती तसेच जिल्हा परिषद कार्यालय आदी ठिकाणी आढावा बैठक होईल.

दुपारी ३ ते ४.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे समितीने विविध प्रकल्प व कामांच्या केलेल्या पाहणी दरम्यान समितीच्या निदर्शनास आलेल्या काही प्रमुख बाबींसदर्भात संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

## सामाजिक उपक्रमाद्वारे गणेशोत्सव करा

### पोलिस निरीक्षक विकास दिंडोरे : पोलीस प्रशासनाचे सहकार्य राहील

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील विश्रामगृहाम ध्ये आज सोमवार दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी आगामी गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिलीव गावातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाच्या वतीने माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे साहेब यांच्या उपस्थितीत पिलीव येथील विश्रामगृहामध्ये गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती,



या बैठकीस पिलीव परिसरातील विविध गणेश मंडळांचे अध्यक्ष,सचिव व पदाधिकारी उपस्थित होते. विसर्जन मिरवणूक मार्ग, डीजे व ध्वनिक्षेपक वापराचे नियम, पार्किंग व्यवस्था, आपत्कालीन सेवांची उपलब्धता, वीज पुरवठा तसेच स्वच्छतेसंबंधी विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा झाली. पोलीस निरीक्षक दिंडोरे यांच्याकडून सर्व मंडळांना कायद्याचे पालन करण्याचे आणि उत्सव शांततेत पार पाडण्याचे आवाहन करण्यात आले. पारंपारिक व सांस्कृतिक पद्धतीने मिरवणूक काढणाऱ्या मंडळाचा पोलीस प्रशासनाच्या वतीने सन्मान केला जाईल असेही यावेळी दिंडोरी यांनी सांगितले. काही मंडळांनी आपापल्या समस्या आणि सूचना यांची मांडणी केली. पोलीस प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला.कायदा व सुव्यवस्थेचा भंग होईल अशांवर कडक कारवाई केली जाईल असेही सहाय्यक पोलीस निरीक्षक जानकर यांनी सांगितले. यावेळी पिलीव औट पोस्टचे हवालदार पंडित मिसाळ, शंकर मरळे, अमित जाधव यांसह परिसरातील पोलीस पाटील उपस्थित होते. पत्रकार दामोदर लोखंडे यांनी आभार मानले.

## मोहोळमध्ये दोन मोबाईल दुकानात चोरी

**मोहोळ, दि.१९ ऑगस्ट-**

मोहोळ शहरातील मुख्य रस्त्यावरील आणि जुन्या पोलिस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या दोन मोबाईल दुकानातून धाडसी चोरी करून मोबाईल, लॅपटॉप आणि इतर वस्तूंसह १ लाख ८३ हजारांचा ऐवज लंपास केला. त्यामुळे मोहोळमध्ये घबराट पसरली आहे.

याबाबत शशिकांत दादाराव सादिगले (वय ४७ वर्षे, रा. गवत्या मारुती चौक, मोहोळ) यांनी आणि प्रदीप बाळसाहेब शिंगाडे (रा. मोहोळ) यांनी फिर्याद दिली आहे. हा गुन्हा दि. १८ ऑगस्ट रोजी रात्री १० वा. ते दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वा.च्या दरम्यान संभाजी राजे चौक, मेन रोड, मोहोळ येथे घडला. याची पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, शशिकांत दादाराव सादिगले व प्रदीप बाळासाहेब शिंगाडे यांचा मोबाईल शॉपीचा व्यवसाय आहे. त्यांनी दि. १८ ऑगस्ट रोजी नेहमीप्रमाणे दिवसभर शिवानी मोबाईल दुकान सुरू होते. रात्री १० वाजता दुकान बंद करून ते नेहम ीप्रमाणे घरी गेले. दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता त्यांनी दुकान उघडले असता आतमध्ये साहित्य अस्ताव्यस्त दिसून आले. काही मोबाईल दिसले नाहीत. त्यांनी दुकानाची पाहणी केली असता मागील बाजूस पत्रा उचकटलेला आढळला. तसेच दुकानातील मोबाईल, स्मार्टवॉच, एअरबड्स व चार्जर्स चोरीस गेलेले दिसले. त्यामुळे त्यांना खात्री झाली की, कोणीतरी अज्ञात चोरट्याने दुकानाच्या मागील बाजूचा पत्रा उचकडून दुकानात प्रवेश केला. आणि १लाख ४९ हजार माल चोरून नेला आहे. यानंतर त्या अज्ञात चोरट्याने त्यांच्या शेजारीच असलेले प्रदीप शिंगाडे यांचे दुकानात असाच प्रवेश करून तिथला ३३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. सीसीटीव्ही फुटेज मध्ये चोरी करून हा चोरटा निर्धास्तपणे जात असल्याचे दिसले. मोहोळ पोलीस ठाण्यात याची नोंद झाली असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल हेंबाडे आणि ढवळे हे करीत आहेत.



## दै.तरूण भारतच्या वृत्तामुळे प्रशासन ॲक्शन मोडवर; लसीकरणास सुरूवात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१९ ऑगस्ट-**

तालुक्यातील चपळगाववाडी येथे लसीकरणाअभावी कोरोना सारखा पीपी साथीचा रोग मोठ्या प्रमाणात पसराल्याने चार दिवसात २० शेळ्या मृत्यूमुखी पडलेबाबत दैनिक सोलापूर तरुण भारत मध्ये बातमी प्रसिद्ध होताच जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाकडून तात्काळ दखल घेऊन जनावरांना लसीकरण करण्यात आले.

तालुक्यात साथीच्या रोगाचा प्रसार झपाट्याने वाढत असल्याने पशू पालकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. मंगळवारी बातमी प्रसिद्ध होताच डॉ. वसंत फुले आणि सर्जन यांनी मंगळवारी चपळगांव वाडी येथे लसीकरण मोहीम राबवली. यावेळी शेळयांना पी.पी.आर. लस, म्हशींना घटसर्फ लस, गाय- बैल यांना लम्पी लस देण्यात आली. चपळगाव मंडलात बहुतेक गावात जनावरांना नियमित लसीकरण केलेले नाही. लसीकरण मोहीम राबविल्याने अनेक मुक्या जनावरांना जीवदान मिळणार आहे. चपळगाववाडीत वनमाला वंगे यांच्या २० शेळ्यांना पीपी रोग झाला तीन शेळ्यांचा मृत्यू झाला. रासदबी नदाफ यांच्या २५ शेळयांना लागण झाली असून १२ शेळ्यांचा मृत्यू झाला. अंदव्वाबाई कारंडे यांच्या चार शेळ्यांना लागण झाली तर दोन शेळ्यांचा मृत्यू झाला. शासनाकडून आर्थिक मदत देण्याची मागणी वंगे यांनी केली आहे.

## 'सिंहगड'मध्ये 'परदेशी उच्च शिक्षणाच्या संधी'वर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ ऑगस्ट -**

येथील सिंहगड महाविद्यालयात परदेशात उच्च शिक्षणासाठी उपलब्ध विविध संधी यावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. के. जे. करांडे यांनी दिली.

या व्याख्यानाचे प्रमुख पाहुणे म्हणून अशीराज ओव्हरसीज एज्युकेशनचे डायरेक्टर अमोल उनुने उपस्थित होते. त्यांनी राज्य शासन आणि केंद्र शासनाकडून परदेशातील उच्च शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध शिष्यवृत्ती तसेच कमी खर्चात विविध देशांमध्ये उच्च शिक्षण घेण्याच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.

अमोल उनुने यांनी विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या विविध पात्रता परीक्षा, त्यांचे स्वरूप आणि तयारी कशी करावी याबाबतही सखोल माहिती दिली. त्यांनी विद्याथींना त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी मार्गदर्शन करताना प्रोत्साहित केले. या कार्यक्रमात तृतीय वर्षातील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमाचे आयोजन सिंहगड महाविदयालयातील आय.आय.सी., एन. डी. एल., रोट्रॅक्ट क्लब आणि अशीराज ओव्हरसीज एज्युकेशन कन्सल्टंट प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर, प्रा. अजित करांडे, प्रा. अभिजीत सवासे, प्रा. नागनाथ खांडेकर, प्रा. अमोल गोडसे, प्रा. पूनम गवळी तसेच महाविदयालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## सांगोला नगरपालिकेचे नव्या प्रभाग रचनेनुसार होणार २० चे २३ कारभारी

### सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ ऑगस्ट-**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर प्रारूप प्रभाग रचनेची भौगोलिक सीमा निश्चित करण्यात आलेली असून नागरिकांच्या माहितीसाठी आज दि.१८ ऑगस्ट रोजी नगरपरिषद कार्यालय व तहसील कार्यालय, सांगोला येथे नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे अशी माहिती सांगोला नगरपरिषदचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी प्रशासकीय अधिकारी सचिन पाडे, रचना सहाय्यक आकाश गोडसे, कर निरीक्षक रोहित गाडे उपस्थित होते.

> सदर प्रभाग रचनेवर सूचना किंवा हरकती असल्यास दि.३१ ऑगस्ट रोजी दु.३ वा. पर्यंत नोंदवाव्यात. त्यावर जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून सुनावणी होऊन अंतिम प्रभाग रचना ही दि.२६ सप्टेंबर रोजी पहावयास मिळेल. **-डॉ.सुधीर गवळी, मुख्याधिकारी, नगरपरिषद सांगोला.**

सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी सन २०११ ची जनगणना प्रमाणभूत मानून त्याच्यावर प्रभाग रचना तयार करण्यात आली आहे. यामध्ये एकूण २३ सदस्य निवडून येणार आहेत. प्रभाग क्रमांक १ ते १० हे द्वि सदस्य असणार आहेत. तसेच विषम संख्या असल्यामुळे प्रभाग क्रमांक ११ हा त्रि सदस्य असणार आहे. यामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी सहा तर अनुसूचित जातीच्या प्रवर्गासाठी तीन जागा आरक्षित असणार आहेत. प्रभाग क्रमांक १ ते १० साठी ३ हजार तर प्रभाग क्रमांक ११ साठी ४ हजार ५०० सरासरी लोकसंख्या असणार आहे. सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०१६ साठी एकूण १० प्रभाग संख्या व २० सदस्य संख्या होती. मात्र सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी एकूण ११ प्रभाग संख्या व २३ सदस्य संख्या असणार आहे. त्यामुळे सांगोला नगरपालिकेचे नव्या प्रभाग रचनेनुसार २० चे २३ कारभारी होणार आहेत.

## स्वेरीचा '२७ वा वर्धापन दिन' उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ ऑगस्ट -**

आपल्या भूतकाळात सहकाऱ्यांनी आपल्याला केलेल्या मदतीची जाणीव ठेवणारा व शिरपेचावर यशाचा मुकुट असताना पायाखालच्या दगडांची जाणीव ठेवणारा माणूस मला इथे पाहता आल्याचे प्रतिपादन हिंदवी परिवाराचे संस्थापक, शिवसह्याद्री आरोग्य धामचे प्रमुख, इतिहासकार डॉ.शिवरत्न शेटे यांनी केले.

स्वेरीच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. त्यांनी शिवविचार, भीमविचार, नातेसंबंध, विद्यार्थी जीवन, स्वेरीची वाटचाल, आरोग्य आणि डॉ. रोंगे यांचे शैक्षणिक योगदान या विषयांवर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी हिंगोलीचे माजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.आबासाहेब डख होते. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर संस्थापक व



प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी सर्वांचे स्वागत केले. स्वेरीच्या २७ वर्षांच्या यशस्वी वाटचालीची रूपरेषा सांगितली. त्यांनी स्व.सुधाकरपंत परिचारक, तत्कालीन शिक्षणमंत्री दत्ताजी राणे, पंढरपूर अर्बन बँकेचे कै. देविदास भिंगे, कै. श्रीपाद थिटे, प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. एन. बी. पाटील, शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू कै. डॉ. द.ना.धनागरे, डॉ. रामगौडा, ह.भ.प. तनपुरे महाराज तसेच स्वेरीसाठी योगदान देणाऱ्या व मदत केलेल्या मान्यवरांची जाणीव ठेवून कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षस्थानावरून डॉ. डख यांनी रोंगे सर हे शिक्षणाचे चालते बोलते विद्यापीठ असल्याचे सांगितले. सायंकाळी लहू ढगे व राम पवार यांच्या गायनाच्या कार्यक्रमाची रंगत वाढली. स्वादिष्ट भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. स्वेरीची मुख्य इमारत, फार्मसी इमारत व नवीन इमारतीवर विविध रंगांच्या लाईट माळांच्या रोषणाईने आकर्षकता वाढवली होती. या कार्यक्रमाला गोपाळपूरचे सरपंच प्रतिनिधी अरुण बनसोडे, पंढरपूरचे माजी नगराध्यक्ष अरविंद जाधव, विठ्ठल प्रशालेचे माजी प्राचार्य डॉ.आर. डी. पवार, श्री. नरसाळे, डॉ. पडवळ, शिवाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे बार्शीचे प्राचार्य डॉ. सुब्राव गोरे, संभाजी शिंदे, पोपट पाटील, अशोक पाटील, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त प्रेमलता रोंगे, पंढरपूरच्या प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्नेहा रोंगे, पालक संघाचे आबासाहेब दैठणकर, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन. एस. कागदे, माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, माजी अध्यक्ष व विश्वस्त दादासाहेब रोंगे, विश्वस्त एच एम बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे, आर. पी.आय.चे सागर गायकवाड, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते. प्रथम वर्ष इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# ...असाच आक्रोश करीत राहणार काय?

पावसाळ्यात काय खावे आणि काय-काय करावे, याबद्दलचा रोमँटिसिज्म बराच प्रसिद्ध असला, तरी आताशः पाऊस तितका रोमँटिक राहिलेला नाही, हेच परवा पुन्हा एकदा सिद्ध झाले. पावसात गरम भजी खावीत, वाफाळलेला चहा घ्यावा किंवा आपल्या प्रियजनांसोबत लाँग ड्राईव्हला जावे वगैरे कविकल्पनेत ठिकाय. पण, असा मुसळधार पाऊस येतो तेव्हा तो सारेच वाहून नेतो आणि मागे उरतात दुःखाचे कढ. विदर्भ, मराठवाडा, कोकण, मुंबईसह अर्ध्याअधिक महाराष्ट्राला परवा पावसाने प्रचंड झोडपले. इतका प्रचंड पाऊस आला की, अनेक ठिकाणी लष्कराची मदत घ्यावी लागली. माणसं-प्राणी वाहून गेले. घरे-झाडे पडली. बरेच लोक बेपत्ता झाले. शेतीचे नुकसान झाले. अद्याप पावसाळा संपलेला नाही. तसाही आजकाल पाऊस कधीही येतो. त्याला पावसाळ्याचाच मोसम हवा असे नाही. माणसाने निसर्गाची लय तोडली. आता जणू निसर्ग माणसांचे कंबरडे मोडायला निघालेला आहे. त्यामुळे पाऊस हा पावसाळ्यातच पडेल, असे आता राहिलेले नाही. उन्हाळा लांबत चालला आहे, थंडीतली गुलाबी रंगत आणि उबदारपणा हरपत चालला आहे आणि पावसाशी पिढ्यान्‌पिढ्यांनी केलेला रोमांस हळूहळू काळाच्या पडद्याआड जाऊ लागला आहे. पाऊस नसेल तर उकाडा, दमट वातावरण आणि आला तर असे प्रचंड नुकसान. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, औरंगाबाद अशा सर्व शहरांनी ताल सोडला. अनधिकृत बांधकामे वाढली. पाण्याचा निचरा होण्याचे मार्ग बंद झाले. गाव-खेड्यांतही फारशी वेगळी परिस्थिती नाही. प्लॅस्टिकसारख्या पदार्थांनी, कचऱ्याने अनेक ओढ्यांचा, नाल्यांचा गळा घोटला आहे. जमिनीचा कस संपलेला आहे. त्यामुळे पाऊस आला तरी पाणी थांबत नाही, जमिनीत मुरत नाही. असा पाऊस थैमान माजवणारच आणि तसे झाले की नुकसान ठरलेले.

महाराष्ट्राच्या उत्पन्नात शेतीचा वाटा १०-१२ टक्केच असला, तरी अर्धी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. यावेळी चार-पाच लाख हेक्टरवरील पिकांची नासाडी झाली, असा प्राथमिक अंदाज असेल तर ग्रामीण भागातील किमान दोन ते अडीच लाख कुटुंबांना पावसाचा फटका बसला असणार. त्यांची सर्वेक्षणे होतील आणि भरपाईही मिळेल. पण, भरपाई देणे हा पावसाच्या अशा तडाख्यांवरचा कायमस्वरूपी ईलाज नाही. महाराष्ट्रातील किमान अर्धे शेतकरी अल्पभूधारक आहेत, हे वास्तव ध्यानात घेतले तर अशा पावसाने किंवा पाणीटंचाईने अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या संसाराचे काय होत असेल, याची कल्पना करता येते. एकीकडे सिंचनाची सोय फक्त १५ टक्के तर दुसरीकडे अशा मुसळधार पावसाने होणारे नुकसान! शेतकरी फक्त शासनाकडेच आशेने पाहू शकतात. पीक विमा वगैरेत तसाही दम नाही. परवाच्या पावसाने शेती, रस्ते, गल्लीबोळ, शाळा, रुग्णालये, सरकारी कार्यालये असे सगळीकडे पाणी शिरले. शेकडो गावांचा संपर्क तुटला. अनेक ठिकाणी पाणीपुरवठा खंडित झाला, विजेचे ट्रान्सफॉर्मर कोसळले तर काही ठिकाणी पूल वाहून गेले. शहरी भागांत चिखलाच्या घसरणी तयार झाल्या तर मुंबईच्या उपनगरांमध्ये रेल्वे ट्रॅकवरच पाण्याच्या नद्या वाहू लागल्या. यात सर्वांत जास्त फटका बसला शेतकऱ्यांना आणि गरिबांना. डोळ्यांदेखत लाखो शेतकऱ्यांच्या शेतीतले पीक वाहून गेले. अर्धवट विटांची घरे किंवा पत्र्याच्या छपराखाली जगणाऱ्या कुटुंबांना एका रात्रीत बेघर व्हावे लागले. कुणाची भांडी-कुंडी वाहून गेली, कुणाचे संसारोपयोगी सामान पाण्यात बुडाले. शेतकऱ्यांची अवस्था तर अधिकच बिकट झाली. ज्या शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली होती, त्यांचे मनोबलही पिकासकट वाहून गेले. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतात पाण्याची डबकी साचली. शिल्लक राहिलेले पीक कुजून जाणार हे स्पष्ट आहे. एकीकडे ग्लोबल वॉर्मिंगसारखी समस्या आणि दुसरीकडे मानवी चुका आणि त्यातही मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप ही अशा घटनांची प्रमुख कारणे आहेत. पृथ्वीचे तापमान सतत वाढत आहे. दरवर्षी तापमानातील सूक्ष्म वाढ पावसाच्या स्वरूपात प्रचंड बदल घडवून आणते. वायुमंडलात बाष्पीभवनाची तीव्रता वाढते. त्यामुळे एकाच वेळी ढग दाटतात आणि अचानक मुसळधार पाऊस कोसळतो. पारंपरिक 'पावसाळ्याची लय' मोडून गेली आहे की मानवाने मोडली आहे...? पूर्वी जूनमध्ये पावसाळा सुरू झाला की सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत थोड्या-थोड्या अंतराने पाऊस पडत राहायचा. आता मात्र दोन-तीन दिवसांतच महिनाभराचा पाऊस कोसळतो आणि मग पुन्हा कोरडे दिवस येतात. हा बदल केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही; तो सर्वत्र जाणवू लागला आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात त्याचे परिणाम अधिक तीव्रतेने दिसतात. कारण शेती आणि लोकसंख्या दोन्हींचे हवामानावरील अवलंबित्व मोठे आहे. गेल्या दोन दशकांत महाराष्ट्रातील लाखो एकर जंगल नष्ट झाले. पावसाचे पाणी मुरवण्यासाठी जंगले मदतीची ठरतात. जंगल नाहीसे झाले की पावसाचे पाणी सरळ पुरासारखे इतस्ततः वाहते. आपण नद्या अरुंद केल्या. नाल्यांवर बांधकामे केली. पाणी वाहून जाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झाले. शहरांमध्ये अनियंत्रित बांधकामे झाली. पावसाचे पाणी झिरपून जाण्यासाठी मोकळी जमीनच उरली नाही. त्यामुळे मुसळधार पाऊस झाला की रस्ते-गल्ल्यांची तळी बनतात. प्रत्येक वर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी नदी-नाल्यांची सफाई झालीच पाहिजे, असे सरकार सांगते. पण नगरपालिका, महापालिका, ग्रामपंचायती याकडे दुर्लक्ष करतात. गटारे साफ होत नाहीत, नाले बुजलेले राहतात, कचरा साचतो. मुसळधार पाऊस आला की सगळ्या शहरांवर गटाराच्या पाण्याचे लोट. तिकडे ग्रामीण भागात जाऊन पाहाल तर कृषी खाते शेतकऱ्यांना वेळेवर मदत करत नाही. पंचनामे करण्यासाठी कित्येक महिने लागतात. भरपाई उशिरा मिळते. मग शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबून आत्महत्या करतो. एका बाजूला अन्नधान्याच्या सुरक्षेची जबाबदारी शेतकऱ्याच्या खांद्यावर टाकलेली आहे, तर दुसऱ्या बाजूला हवामानाच्या तडाख्याने तो पुन्हा-पुन्हा उद्ध्वस्त होतो. आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे पशुधनाचा प्रश्न. पूर आल्यावर गाई-म्हशी वाहून जातात, गोठ्यांमध्ये चिखल साचतो, चारा खराब होतो. शेतकऱ्यांसाठी जनावरे म्हणजे संपत्ती असते. त्याकडेही कुणाचे लक्ष नाही. नगरपालिका-महापालिका दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून 'नालेसफाई झाली' असा दावा करतात. पण पहिला पाऊस पडला की, संपूर्ण सत्य बाहेर येते. साचलेला कचरा, प्लॅस्टिक, बांधकामांच्या कचऱ्याचे ढिग यामुळे नदी-नाल्यांच्या प्रवाहाला अडथळे येतात. परिणामी पाणी रस्त्यावर येते किंवा घरात घुसते. पावसाचा जोर थोडासाही वाढला की पुलांना तडे जातात, रस्त्यांवर खड्डे पडतात. कित्येक ठिकाणी तर अख्खे पूल वाहून जातात. आपली बांधकामे किती निकृष्ट दर्जाची असतात, याची साक्ष पटविणाऱ्या घटना दरवर्षी पावसाळ्यात घडतात. परंतु, कधी तरी कुठल्या कंत्राटदारावर किंवा अधिकाऱ्यावर कारवाई झाल्याचे ऐकले आहे काय...? नाही. कारण अळीमिळी गुपचिळी असाच सारा प्रकार असतो. पावसाळा संपला की, पावसाळ्याच्या फायली बंद होतात आणि नव्या फायली सुरू होतात. नवे टेन्डर्स निघतात. इकडे पावसाळ्याने रोगराईचा प्रादुर्भाव मागे सोडलेला असतो. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या आजारांचा फैलाव सुरू होतो. दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रो, अतिसार, टायफॉईड यांसारखे आजार डोके वर काढतात. आजारांची हाताळणीही पावसाळ्यासारखीच असते. कसाबसा हिवाळाही संपतो आणि मग उन्हाळ्यातील टंचाईवर मात करण्यासाठी नवे टेन्डर्स निघतात. पावसामुळे झालेले नुकसान आणि रोगराईचे वाईट परिणाम त्या-त्या घरांपुरते मर्यादित राहतात. समाज दोषी आहेच. लोक कचऱ्याची नीट विल्हेवाट लावत नाहीत. बांधकामाचे नियम पाळत नाहीत. पण, त्यांच्यावर नजर ठेवणारे सरकारी अधिकारी काय हस्तक्षेप करतात...? काहीही नाही. सारेच एका माळेचे मणी. त्यामुळे अतिवृष्टीच्या किंवा दुष्काळाच्या चक्रव्यूहात आपण सारे फसतो. तडाखा बसला की विव्हळतो, शासनाच्या नावाने गळे काढतो. पण, एकेक मोसम मागे पडत गेला की मागचे सारेच विस्मरणात जाते. आज महाराष्ट्रासमोरचा प्रश्न असा आहे की, आपण दरवर्षी पूर-दुष्काळाबद्दल असाच आक्रोश करत राहणार की आता तरी शाश्वत बदल घडवणार? शेतकरी पुन्हा-पुन्हा आत्महत्या करणार की त्याला त्या गर्तेतून बाहेर काढणार? शहरे दरवर्षी पाण्यात बुजणार की सुस्थितीतील व मजबूत पायाभूत सुविधा उभ्या राहणार? ▌

## विशेष

# सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता

प्रा. सुखदेव बखळे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना देश सेमीकंडक्टरच्या जगात पुढे जात आहे, असे सांगितले. देशात सहा सेमीकंडक्टर युनिट्स आधीच कार्यरत आहेत तर इतर चार मंजूर झाले आहेत. २०२५ च्या अखेरीस 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप्स बाजारात येतील. सेमीकंडक्टर चिप्ससाठी देशांमध्ये अनेकदा संघर्ष होतो. अशा परिस्थितीत सेमीकंडक्टर चिप म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हा एक सिलिकॉन-आधारित इलेक्ट्रॉनिक घटक आहे, जो कोणत्याही उपकरणाच्या प्रक्रियेत आणि मेमरी स्टोरेजमध्ये वापरला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर फोनमध्ये स्थापित केलेली मेमरी चिप त्याचाच एक प्रकार आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सेमीकंडक्टर चिप्स लहान असूनही उपयुक्त आहेत. त्याशिवाय कोणतेही गॅझेट काम करू शकत नाही. ते मोबाईल, लॅपटॉपपासून वाहन, संरक्षण आणि उपग्रह क्षेत्रात वापरले जाते. तैवान जगात सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स बनवतो. मेमरी चिप्स बनवणारी दक्षिण कोरिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. चीनदेखील हळूहळू या क्षेत्रात प्रगती करीत आहे. 'मीडिया रिपोर्टस'नुसार सेमीकंडक्टर चिप्सच्या एकूण उत्पादनात चीनचा वाटा सुमारे १५-२० टक्के आहे. चिपचा शोध अमेरिकेने लावला होता; परंतु आजकाल बहुतेक आशियाई देश त्याचे उत्पादन करीत आहेत. अशा परिस्थितीत अमेरिका या क्षेत्रात सतत गुंतवणूक करीत असून इंटेल, मायक्रोनसारख्या कंपन्या महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स खरेदी करणाऱ्या देशांच्या यादीत पहिले नाव चीनचे आहे. जे त्याच्या इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेसाठी एकूण जागतिक खरेदीपैकी एक तृतीयांश खरेदी करते, तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत त्याच्या गरजेनुसार इतर देशांकडून लागणारे १०० टक्के सेमीकंडक्टर खरेदी करतो. एका अहवालानुसार भारत स्वतः सेमीकंडक्टर निर्यात करतो. २०२४-२५ दरम्यान भारत अमेरिकेला चिप्स निर्यात करणारा चौथा देश आहे.

सरकारने 'सेमीकॉन इंडिया प्रोग्राम' अंतर्गत या क्षेत्रात सुमारे ७६ हजार कोटी रुपये जारी केले आहेत. आतापर्यंत देशात १० प्रमुख अर्धवाहक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, जिथे सहा प्लांटवर काम सुरू आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स, एचसीएल-फॉक्सकॉन, मायक्रॉन, वेदांत-फॉक्सकॉन आणि अनेक जागतिक तंत्रज्ञान कंपन्या यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारत २०२५ च्या अखेरीस 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप्स लाँच करण्याची तयारी करीत आहे. २०३२ पर्यंत 'व्हेरी लार्ज स्केल इंटिग्रेशन' (व्हीएलएसआय) चिप डिझाईन क्षेत्रात अंदाजे २ लाख ७५ हजार अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. आवश्यकतेच्या तुलनेत, देशात कुशल कामगारांची



उपलब्धता आणि तयारीची गती खूपच कमी आहे. हे लक्षात घेता कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने 'इंडिया सेमीकंडक्टर इकोसिस्टिम वर्कफोर्स डेव्हलपमेंट स्ट्रॅटेजी रिपोर्ट' तयार केला आहे. त्यात विविध शिफारशींसह एक रोडमॅप सुचवण्यात आला आहे, ज्याची अंमलबजावणी करण्यास सरकार तयार आहे. दरवर्षी १५ लाखांहून अधिक अभियंत्यांना प्रशिक्षण दिले जाते.

भारतीय अर्धवाहक उद्योगाची सद्यस्थिती आणि भविष्यातील शक्यतांवरील हा अहवाल अलिकडेच कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लाँच केला. भारतात दरवर्षी १.५ दशलक्षाहून अधिक अभियंते प्रशिक्षित केले जातात. त्यापैकी तीन टक्क्यांपेक्षा कमी अर्धवाहक उद्योगासाठी कुशल मानले जातात. तथापि, गेल्या काही वर्षांमध्ये भारताने चिप डिझाईनमध्ये बरीच प्रगती केली आहे. परिणामी सव्वा लाखांहून अधिक अभियंते डिझाईन सेवांमध्ये गुंतले आहेत, तरीही फॅब ऑपरेटर, प्रक्रिया तंत्रज्ञ आणि एटीएमपी अभियंत्यांची मोठी कमतरता आहे. भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि अर्धवाहक उद्योग त्यात खूप मोठी भूमिका बजावू शकतो. इलेक्ट्रॉनिक्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या वाढत्या मागणीमुळे भारतातील सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२१ मध्ये २७ अब्ज डॉलर्सवरून २०२६ पर्यंत ६४ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. हे लक्षात घेता, सरकारने सेमीकंडक्टर डिझाईन, उत्पादन आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ७६ हजार कोटी रुपयांच्या बजेटसह 'सेमीकॉन इंडिया' कार्यक्रम सुरू केला आहे. सेमीकंडक्टर उद्योगातील ही भरभराट आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), रोबोटिक्स आणि ५जी सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा व्यापक अवलंब आणि वाढीव डेटा प्रोसेसिंग, स्टोरेज आणि ट्रान्समिशन क्षमतेच्या मागणीमुळे झाली आहे.

भारतीय सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२० मध्ये १५ अब्ज डॉलर्स होती. २०२५ पर्यंत ती ६४ अब्ज डॉलर्स तर २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. ती जागतिक मागणीच्या सुमारे १० टक्के आहे. कौशल्य विकास तज्ज्ञांनी अहवालात म्हटले आहे की, सेमीकंडक्टर उद्योगासाठी कोणालाही तयार करण्यासाठी विविध विषयांमध्ये मजबूत पाया आवश्यक आहे. या धोरण अहवालात, तज्ज्ञांनी शालेय स्तरावरूनच काही तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे सुचविले आहे. हे विविध मंत्रालयांशी संबंधित असल्याने कौशल्य विकास मंत्रालय या सर्व मंत्रालयांच्या सहकार्याने या धोरणावर आणि रोडमॅपवर पुढे जाण्यासाठी पुढाकार घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी सेमीकंडक्टर आहेत आणि चिप्सची जागतिक मागणी गगनाला भिडत आहे; परंतु काही मर्यादित भौगोलिक क्षेत्रांमध्ये उद्योगाचे केंद्रीकरण झाल्यामुळे पुरवठा साखळी खूपच नाजूक आहे. त्याच वेळी उत्पादनाच्या जागतिक विविधीकरणाची मोठी आवश्यकता आहे. भारत या संदर्भात एक प्रमुख खेळाडू म्हणून उदयास येत आहे. जागतिक सेमीकंडक्टर (सेमीकंडक्टर इनोव्हेशन इंडिया) बाजारपेठ २०३० पर्यंत एक ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्यात भारताच्या बाजारपेठेचा मोठा वाटा असेल. नोएडा आणि बेंगळुरू येथे दोन अत्याधुनिक सेमीकंडक्टर डिझाईन सुविधा केंद्रांचे उद्‌घाटन झाले आहे. ही भारतातील पहिली केंद्रे प्रगत तीन नॅनोमीटर चिप डिझाईनवर लक्ष केंद्रित करतात. देशाच्या सेमीकंडक्टर इनोव्हेशन प्रवासात हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. मंत्रालयाच्या 'डिझाईन लिंक्ड इन्सेंटिव्ह' (डीएलआय) योजनेंतर्गत समर्थित स्टार्टअप्स आणि त्यांच्या 'चिप्स टू स्टार्टअप्स' (सी २ एस) कार्यक्रमात लक्षणीय वाढ होत आहे. अलिकडेच 'स्मार्ट व्हिजन', सीसीटीव्ही कॅमेरे आणि 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'सारख्या अनुप्रयोगांसाठी चिप्स बनवणाऱ्या नेत्रासेमी या स्टार्टअप कंपनीला सरकारच्या चिप डिझाईन योजनेंतर्गत १०७ कोटी रुपयांची व्हेंचर कॅपिटल गुंतवणूक मिळाली. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार २०२२ मध्ये 'डीएलआय' योजना सुरू झाल्यापासून सरकारने २२ कंपन्यांना चिप डिझाईन प्रकल्पांसाठी २३४ कोटी रुपयांची मदत देण्याचे वचन दिले होते. त्याचा एकूण प्रकल्प खर्च ६९० कोटी रुपये आहे. एकत्रितपणे या स्टार्टअप्सनी व्हेंचर कॅपिटल गुंतवणूकदारांकडून ३८० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला आहे. याव्यतिरिक्त पाच स्टार्टअप्सनी जागतिक चिप उत्पादकांसह त्यांचे चिप डिझाईन आधीच तयार केले असून त्यांची चाचणी केली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार ७२ हून अधिक कंपन्यांना चिप्स डिझाईन करण्यास मदत करण्यासाठी प्रगत सॉफ्टवेअर साधनांची उपलब्धता प्रदान करण्यात आली. ▌

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

विजय कुळकर्णी

# पर्यावरण संवर्धनाकडे गांभीर्याने लक्ष द्या

पर्यावरणाचा समतोल ढासळला आहे. याचा अनुभव आपण दररोज घेत आहोत. काल बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहर व तालुक्यात आणि अकोला जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस झाला. तर, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यातील इतर भागात झालेल्या पावसाचे प्रमाण कमी होते. अकोला जिल्ह्यातील ६० हजार हेक्टर शेती पुराच्या पाण्याने खरडून गेली. पिकांचे अतोनात नुकसान झाले. असा पाऊस बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, मेहकर, सिंदखेड राजा, लोणार या तालुक्यात गेल्या आठवडाभरापासून पडत आहे. तर, बुलढाणा जिल्ह्यातील इतर तालुक्यात मात्र अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. याला पर्यावरणाचा ढासळलेला समतोल हेच एकमेव कारण आहे.

पूर्वी पावसाळ्यात व विशेषतः श्रावणात दोन दोन-तीन तीन दिवसांची पावसाची झडी लागायची. तशी झडी गेल्या काही वर्षांपासून बघायला मिळतच नाही. पाऊस आला की, एकदाम रपरप नुसता कोसळतो. अर्धातास, एकतास पाऊस पडतो आणि सर्वत्र पाणीच पाणी होते. नदी-नाले एक होऊन पूर येतो. शेती, पिके वाहून जातात. घरात पुराचे पाणी शिरते. असा पावसाचा पॅटर्न आता बदललेला दिसून येत आहे. पूर्वी पोळा झाल्यावर पावसाचे प्रमाण कमी होत असे. भर पावसाळ्यात पाऊस कुठे धो धो कोसळतो तर कुठे एक थेंब पडत नाही. अशी परिस्थिती असते. मे महिन्यात कडक ऊन्ह तापण्याऐवजी धो धो पाऊस पडतो. याचा अनुभव या वर्षीच्या मे महिन्यात आपण अनुभवला. तर, जूनमध्ये कडक ऊन्ह तापले. हे सर्व पर्यावरणाचा समतोल ढासळल्यामुळे झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तेव्हा पर्यावरणाचा



समतोल राखण्यासाठी मानव म्हणजे आपण प्रयत्न करणे व तेही जोमाने करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळण्याला मानवच जबाबदार आहे. आज लोकसंख्या प्रचंड वाढली. त्यामुळे प्रत्येक कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढली. त्यांना लागणाऱ्या अन्नधान्याची मागणी वाढली. ती पूर्ण करण्यासाठी कृषी उत्पादन वाढविण्याची गरज निर्माण झाली. म्हणून कृषी क्षेत्र वाढविण्यासाठी जंगल कटाई झाली. तसेच, गाव-शहरांचा आकार वाढला. घरांची मागणी पूर्ण करण्यासाठी शहर व गावाशेजारील शेती अकृषक करण्याचे प्रमाण वाढले. पिकावू जमीन कमी झाली. उपलब्ध शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. संकरीत बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर वाढला. नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा ओढा असल्याने चारा टंचाई निर्माण झाली. त्यामुळे कोठ्यातील गायी, म्हशींची संख्या कमी झाली. परिणामी पर्यावरणाला पोषक शेणखताची निर्मिती घटली. पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहू लागू नये म्हणून शेतात कूपनलिका खोदणे सुरू झाले. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खोल गेली. शहरात काँक्रीटची जंगले वाढली. फ्लॅट स्किममुळे घरासमोरील अंगण नाहीसे झाले. त्यामुळे घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता नालीतून वाहून जाऊ लागले. त्यामुळे पाणी टंचाई निर्माण होऊ लागली. गावातील विहिरी आटल्या. हे दुष्टचक्र गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. याकडे आपण कधी फार गांभीर्याने लक्षच दिले नाही. त्यामुळे आज सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात आपल्याला पर्यावरणाचा समतोल राखणे का आवश्यक आहे, ते लक्षात येत आहे. कोणत्याही ठिकाणी घर, रस्ते किंवा कोणत्याही वास्तूचे बांधकाम करण्यासाठी त्या ठिकाणी असलेली झाडे तोडली जातात. तोडलेल्या झाडांच्या काही पट झाडे लावली पाहिजेत, असा शासनाचा नियम आहे. पण, त्याची अंमलबजावणी करण्याकडे कोणाचेच लक्ष नसल्याचे निदर्शनास येते. पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षारोपण व संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. या सर्वांचा विचार करून यावर्षी रा. स्व. संघाने शताब्दी वर्षानिमित्त हाती घेतलेल्या पंचसूत्री कार्यक्रमांतर्गत पर्यावरण हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'तरुण भारत'देखील शताब्दी वर्ष साजरे करीत असून पर्यावरण संवर्धन हा उपक्रम सध्या राबवित आहे. या उपक्रमांतर्गत तरुण भारतने 'बीज अंकुरे अंकुरे' हा उपक्रम राबविला. वटवृक्षाची रोपे वितरित केली. तर, आता मंदिर स्वच्छता व तुळस रोपण उपक्रम सुरू आहे. त्याला विदर्भातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. तेव्हा, प्रत्येकाने आपल्या परसबागेत, शेतात किंवा आपल्या घराच्या परिसरातील मोकळ्या जागेत वृक्षारोपण व तुळस रोपण करून त्याचे संवर्धन करून पर्यावरण रक्षण व संवर्धनात आपला खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन यानिमित्ताने करावेसे वाटते. पर्यावरणाचा समोतल राखणे किती आवश्यक व गंभीर बाब आहे, हे आपल्या लक्षात आलेच असावे. चला तर मग वेळ न दवडता आपल्या घरासमोर वृक्षारोपण करू या! ▌

८८०६००६१४९

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता : कर्मसंन्यास योग

प्रा. दिलीप जोशी

श्रीमद्भगवद्गीतेच्या पाचव्या अध्यायाला 'कर्मसंन्यास योग' म्हणून ओळखतात. श्रीगीतेचा चौथा अध्याय 'ज्ञानकर्मसंन्यास योग' सांगत असेल तर त्यातील ज्ञान शब्द काढून या पाचव्या अध्यायात केवळ कर्मसंन्यास योग भगवंतांनी वेगळा का सांगितला असेल? हा प्रश्न पडणे साहजिकच आहे. चौथ्या अध्यायात 'ज्ञानाग्नी सर्व कर्मानी' म्हणजे 'ज्ञानाच्या अग्नीत सर्व कर्म भस्म कर' हे सांगतानाच शेवटचा सल्ला तंनी 'कर्म कर' असे सांगितले. 'योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत' म्हणजे कर्म अनुष्ठानानुसार कर्म योगात स्थिर होण्याचा आदेश भगवंतांनी देऊन अर्जुनाला कर्म प्रवृत्त केले. त्यावरच आजचे चिंतन आहे. आपण सामान्य माणसांचा विचार केला तर कर्मयोग आणि ज्ञानपूर्ण होऊन कर्मसंन्यास हे दोन टोकेच आहेत. कर्मयोग आणि त्याचवेळी कर्मसंन्यास हे आपल्याला एकाच वेळी साधणे केवळ अशक्य. हं! कर्मयोग करताना हळूहळू कर्मसंन्यास कदाचित हे तरी जमू शकेल, पण दोन्ही एकाच वेळी कसे साधता येईल? हाच प्रश्न अर्जुनाला पडला. कर्मसंन्यास हा ज्ञानी माणसासाठी नाहीच तर तो आपल्या सामान्य साधकांसाठी आहे. कारण आपल्या मागचा संसार सुटत नाही. अशा स्थितीत विषयामध्ये राहूनच कर्मयोगी वृत्ती ठेवायची. संसारात राहून कर्मयोग साधतो म्हणजे आपले नित्यकर्म ईमानदारीने करतो. असा मनुष्य संन्यास न घेताही नित्य संन्यासी आहे. म्हणून इथे ज्ञान शब्द काढून फक्त कर्मसंन्यास योग म्हटले आहे.

**'संन्यासं कर्मणाम् कृष्ण पुनर्योगं च शंससि ।**
**यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥'**

अर्जुन म्हणतात की, हे भगवंता एकीकडे तुम्ही सर्वकर्मसंन्यास सांगता आणि दुसरीकडे निष्काम कर्मयोग सांगता. या दोहोंमध्ये हितकारक असेल ते मला सांगा.

**'सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पण्डिताः ।**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥'**

हे अर्जुना, कर्मसंन्यास आणि निष्काम कर्मयोग हे भिन्न आहेत, असे अज्ञानी लोकांना वाटते. पण जे ज्ञानी आहेत ते कोणत्याही एकाच मार्गावर चालत असले, तरी दोन्ही मार्गांची फळप्राप्ती म्हणजे परमात्म स्वरूपाची प्राप्ती समजतो आणि त्यानुसारच तो वागतो. जे फळ सर्वकर्म संन्यास्याला तेच फळ निष्काम कर्मयोग्याला आहे. अशा विद्वान पुरुषाविषयी भगवान सांगतात-

**'योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ।**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥'**

ज्याने आपल्या शरीराला आपल्या अधीन करून इंद्रियांवर विजय मिळविला, ज्याचे मन शुद्ध आहे तो मनुष्य कर्म करीत असला, तरी तो कर्मापासून अलिप्त असतो. हे झाले ज्ञानिजनांसाठी; पण आपल्यासारख्या अज्ञान्यांना वाऱ्यावर सोडले का, असा प्रश्न उपस्थित होतो.

कर्मानुष्ठान आणि कर्मसंन्यास या बाबी तशा भिन्नच आहेत. आपल्या पातळीवर विचार केला तर कर्मानुष्ठान म्हणजे आपली संसारिक सर्व कर्मे अनुष्ठानासारखी करायची. कर्मसंन्यास म्हणजे संसारिक कर्माचा त्याग. आपल्या दृष्टीने ही दोन टोके आहेत. ज्ञानी लोक ज्ञानपूर्वक कर्म संन्यास स्थिती प्राप्त करू शकतात. आपण अज्ञानी पुरुषसुद्धा कर्म संन्यासी होऊ शकतो, पण त्यासाठी आपल्याला पहिले कर्मानुष्ठान मार्ग महत्त्वाचा आहे. म्हणजे केवळ कर्मयोगाचे आचरण केले पाहिजे. आपण अज्ञान्यांनी कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोग अनुष्ठान आधी आचरावे. त्यानंतर अज्ञान आणि अज्ञानजन्य कर्म याचा लोप करीत अज्ञानाचा विध्वंस करीत निष्क्रिय भावाने आत्मस्वरूपाकडे जाण्याचा प्रयास म्हणजे कर्म संन्यासाकडे हळूहळू जाणे होय. हेच या अध्यायात भगवंत म्हणतात. अज्ञानी पुरुषाला समोर ठेवूनच कल्याणकारी मार्ग भगवान कृष्णाने इथे सांगितला आहे-

**'अज्ञानेनावृत्तं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ।'**

अज्ञानामुळे जिवांच्या ज्ञानावर आवरण आल्यामुळे जीव मोहित होतात.

**'ज्ञानेन तु तद्ज्ञानं येषामब नाशितमात्मनः ।'**

अंतःकरणातील अज्ञान आवरण पुढे ज्ञानाने नष्ट करायचे. हे अज्ञान फक्त आणि फक्त ज्ञानानेच नाश पावते, हे भगवंत सांगतात. इथे आपल्यासारख्या सामान्य लोकांना कर्मसंन्यास सोपा व्हावा म्हणून ज्ञानाची विकसनशील उकल केली आहे. या अध्यायात कर्मयोग, कर्मसंन्यास, सर्वकर्मसंन्यास यांचे प्रतिपादन आहे. आपण सामान्य लोकांनी आपले विहित कार्य निष्काम भावाने केले तर आपले अज्ञान हळूहळू गळत जाते. त्याचवेळी आपण हळूहळू ज्ञानप्राप्तीकडे गेले पाहिजे, असा त्याचा मथितार्थ आहे. संसारी माणसांच्या जीवनात अनेक सुख-दुःखाचे प्रसंग असतात. ते आपण टाळू शकत नाही. सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही. हेच ते प्रसंग आहेत, ज्यात आपण सुखाकडे आणि दुःखाकडेही समदृष्टीने, द्वंद्वरहित राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कठीण आहे, पण अशक्य नाही. हाच कर्म योग आहे. सगुण साकाराकडून निर्गुण निराकाराकडे जाणे. बहिरंगाकडून अंतरंगाकडे जाणे. संसार सांभाळून संसारमुक्त होणे. आपल्या संसारासाठी बऱ्यापैकी सोपे आहे.

**'स्पर्शांकृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ।**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥'**

बाह्य विषय बाहेरच राहू द्यायचे. प्राण आणि अपानावर लक्ष केंद्रित करून हळूहळू इंद्रिये ताब्यात ठेवण्याचा आपला आपणच प्रयास करायचा.


**'न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।**
**न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥१४॥'**

परमेश्वर कोणाचा कर्तेपणा आणि कर्म उत्पन्न करीत नाही तसेच कर्माचे फळही कोणाला देत नाही. ही सर्व कर्मे प्रकृतीच्या गुणांद्वारेच केली जातात. हा भाव दृढ झाला की हाच कर्मसंन्यास आहे. थोडक्यात; या अध्यायात आपण अज्ञानांसाठी मार्ग सोपान सांगताना कर्म, कर्मयोग आणि कर्मसंन्यास यातील अंतर स्पष्ट केले आहे. कर्मयोग म्हणजे कर्म करीत करीत फलत्याग तर कर्मसंन्यास म्हणजे कर्मत्याग. इथे संन्यास म्हणजे पारमार्थिक संन्यास नसून तो नैष्कर्म होऊन कर्म त्याग अवस्था होय. आपण कर्मयोगाला प्राधान्य दिले पाहिजे, नव्हे तेच आपल्यासाठी सुकर आहे. असे अनेक कर्म आपण फलासक्ती न ठेवता करतो. जसे आजोबांनी आंब्याचे झाड लावताना फळासक्ती ठेवलीच नाही. हीच आजोबांची अनासक्ती सर्व बाबतीत ठेवण्याचा प्रयत्न करायचा. हाच कर्म संन्यास योग आहे. ▌

९८२२२६२७३५

### डीजेचा दणदणाट थांबला पाहिजे

सध्या आपल्याकडे कोणताही उत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या आवाजात केल्याशिवाय तो साजरा झाला आहे, असे वाटत नाही. वाढदिवस असो, लग्नाची वरात, गणेशोत्सव मिरवणुकीत किंवा दहीहंडीचा कार्यक्रम असो डीजेच का लावता? यावेळी आपले पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम पथक तयार करावेत. नुकतेच मुंबईमध्ये केवळ सराव करताना एक गोविंदा मृत्यू पावला याला जबाबदार कोण? जर सरकार मदत करते, पण गेलेला जीव परत येतो काय? केवळ मुंबईला डीजे बंदी करण्यापेक्षा राज्यात बंदी केली पाहिजेत. साताऱ्यात काही वर्षांपूर्वी डीजेच्या आवाजाने भिंत कोसळली. त्यामुळे दोन जणांचा मृत्यू झाला. अशा घटना अनेक जिल्ह्यात घडल्या आहेत. ध्वनिप्रदूषणाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. प्रशासन केवळ बघ्याच्या भूमिकेत होते, असेच म्हणावे लागेल. विविध ठिकाणी डीजेच्या कर्णकर्कश आवाजाच्या भिंती, मोठमोठे ढोल-ताशे, लाऊड स्पीकरवर वाजणारी गाणी यामुळे अनेकांना त्रास सहन करावा लागतो. पारंपरिक वाद्यांचा विसर पडला आहे. आपल्या परिसरात शाळा, दवाखाने असतात, याचे भान कोणी राखायचे? नुकतीच जन्मलेली मुले असतात.



डीजे, ढोलच्या आवाजाने किती त्रास सहन करणार? गेल्या वर्षी मिरवणुकीत पुणे शहरामध्ये लक्ष्मी रस्ता आणि दहा प्रमुख चौकांतील सरासरी ९० डेसिबलपेक्षा जास्त नोंदवली गेली. राज्यातील विविध शहरातही डीजेच्या आवाजाने अनेकांना त्रास सहन करावा लागला आहे. सध्या आपल्याला कोणतेही नियम आणि अटी नको झाल्या आहेत तर त्याचे पालन करणेही अवघड वाटू लागले आहे. डीजे पुढे बेभान होऊन नाचून काही जणांना हृदयविकाराचा झटकाही आला आहे तसेच लेझरच्या लाईटमुळे कोल्हापूरमधील तरुणाला डोळ्याला मोठ्या प्रमाणात इजाही झाली आहे. आपले पारंपरिक वाद्याचा विसर पडला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आपले लेझिम, झांज पथक विविध खेळांच्या माध्यमातून मिरवणुकीत स्थान मिळायला हवे. वारंवार सांगूनही आपण त्याकडे का डोळेझाक करतो समजत नाही. गेल्या वर्षांत राज्यात या मिरवणुकीत घडलेल्या घटनात सुमारे २१ जणांना आपला जीव गमवावा लागला उत्सव असला तरी समाजातील दुर्बल आजारी, दवाखाना परिसर याचे भान कधी येणार?

**संतोष राऊत**/ ९९६०१०४३४५

## वाचक पत्रे

### ज्येष्ठांचाही विचार व्हावा

'आईसारखे दैवत नाही' हे वाक्य आता खोटे वाटायला लागले. ज्या आईच्या वेदनेतून तुमचा जन्म झाला; जिच्या कष्टामुळे तुम्ही स्वतःच्या पायावर उभे आहात; ती आई आज तुम्हाला जड झाली. तुमच्या सुंदर घरात तिची अडगळ वाटते. तशी काही मुले स्वतःच्या पोटाला पीळ देऊन, स्वतःच्या भावना मारून आईला जपतात. काही मुलांना इच्छा असते, परंतु आर्थिक परिस्थिती नाजूक असते तर काही मुले आईने वाढविले, ती जगात आहे हे सुद्धा विसरतात. स्वतःच्या संसारात मग्न असतात. काही मुलांना पैसे पाठवून कर्तव्य निभावले असे वाटते. आज समाजात अगदी क्लास वन ऑफिसरच्या बायकोपासून सर्वसाधारण महिलांची स्थिती अत्यंत नाजूक आहे. ज्यांना पेन्शन आहे त्यांचे ठीक. पूर्वी व्याजाचे दर खूप होते म्हणून लोकांनी पेन्शन न घेता फंड घेतला.

आज व्याजाचे दर कमी झाले. व्याजाच्या पैशांत दोन वेळेचा चहा-ब्रेड मिळणे कठीण झाले तर औषधे कुठून आणणार! म्हातारपण म्हणजे रोगांचे माहेरघर! मोठ्या आजारासाठी पाच लाख मिळतात, परंतु रोजच्या औषधांचे काय? शुगर-बीपी वगैरे बहुतेकांना असतो. तेव्हा ज्येष्ठ नागरिकांना ही औषधे फुकट मिळावी. त्यात जेनेरिक औषधांचा समावेश असावा. पैसे नको औषधे द्या व म्हातारपण काही अंशी सुखकर करा. ज्येष्ठ नागरिक म्हणजे राष्ट्रीय संपत्ती व मार्गदर्शक वगैरे फुकटचे सन्मान नको. आमच्याजवळ आंदोलन करण्याची ताकद नाही. एकत्र येणे शक्य नाही. तेव्हा इच्छामरणाचा कायदा करून आमची सुटका करा किंवा औषधे द्या. आज बहुतेक माता वाऱ्यावर सोडल्याप्रमाणे जीवन जगत आहेत. त्यांना आधार द्या ही सरकारला विनंती.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### नासुप्रमध्ये हवी ज्येष्ठ नागरिकांना बसण्याची सुविधा

नागपूर सुधार प्रन्यासमध्ये कामानिमित्त बरेचशे नागरिक येतात. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकसुद्धा असतात. मला नेहमी माझ्या प्लॉटच्या कामाकरिता जावे लागते. ठरलेली भेटायची भेट झाल्यावर लोक आत जायला गर्दी करतात. पहिल्या मजल्यावर 'गुंठेवारी' विभागात सध्या बरीच गर्दी असते. तिथे ज्येष्ठ नागरिकांना बसायची मुळीच सोय नाही. पायऱ्यांवरही बसता येत नाही. तसे तिथे बसायला कुणालाच बसण्यात स्वारस्य नसते.

नाईलाज म्हणून बसावे लागते. बहुतेक 'नासुप्र'कडे याकरिता निधी नसावा म्हणून त्यांचाही सोय करण्यासाठी नाईलाज आहे. माझी धर्मादाय संस्थांना विनंती की, त्यांनी चार-पाच बेंच नासुप्रला दान करावेत; जेणेकरून ज्येष्ठ लोकांची तात्पुरती बसण्याची सोय होईल. ▌

**गणेश हजारे**/८६९८८१५५५९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### कोन्हाळी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाच्या सुविधा

**व्हीजीएनटी समितीकडून मुख्याध्यपक निलंबीत**

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा सोलापूर दौरा मंगळवार पासून सुरु झाला आहे . समितीच्या सदस्यांनी पहिल्याच दिवशी अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील कै. परशुराम जाधव आश्रमशाळेस भेट दिली. यावेळी विध्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाच्या सुविधा मिळत असल्याचे दिसून आल्याने शाळेच्या मुख्याध्यापकास निलंबीत करुन शाळेची मान्यता रद्द करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती समितीचे प्रमुख तथा अध्यक्ष आ. सुहास कांदे यांनी दिली. मंगळवारी सकाळी समितीच्या सदस्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासकीय अधिकार्यांची बैठक घेतली. त्यानंतर समितीच्या सदस्यांनी ग्रामीण भागातील पाहणी दौर्यास सुरुवात केली. समितीचे प्रमुख आ. सुहास कादे यांच्यासह अन्य सदस्यांनी अक्कलकोट तालुक्यातील विविध शाळा व शासकीय संस्थांची पाहणी केली. यावेळी कोन्हाळी आश्रमशाळेतील विध्यार्थ्यांना मिळणार्या निकृष्ट सुविधा पाहून समितीच्या सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

### निराधारांसाठी थेट डी.बी.टी. साठी आधार नोंदणी; २३ ऑगस्टपर्यंत विशेष शिबीर

**सोलापूर दि.१६ ऑगस्ट-**

संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजनेच्या सर्व लाभार्थ्यांसाठी डीबीटी पोर्टलवर आधार नोंदणी न झालेल्या लाभार्थ्यांसाठी संजय गांधी निराधार योजना शहर कार्यालय यांचे वतीने २३ ऑगस्ट पर्यंत विशेष शिबिराचे आयोजन केले आहे. शिबिरामध्ये संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्यांनी बँक पासबुक, आधार कार्ड, मोबाईल नंबर इ. आवश्यक कागदपत्रांसह खालील नमूद ठिकाणी सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत उपस्थित राहून लाभार्थी यांनी आपले आधार नोंदणी व प्रमाणीकरण करुन घ्यावे, असे आवाहन तहसिलदार शिल्पा पाटील यांनी केले आहे. **शिबिराचे ठिकाण व कालावधी** २० ऑगस्ट. - विरलिगेश्वर समाज मंदीर घोंगडे वस्ती, सोलापूर, व महानगरपालिका कॅम्प शाळा, लष्कर, २१ ऑगस्ट- विरलिंगेश्वर समाज मंदीर घोंगडे वस्ती, सोलापूर, व सिध्दगणेश हनुमान मंदीर, भारतरत्न इंदीरा नगर, २२ ऑगस्ट.- मडिवाळेश्वर माचदेव परीट जाती मंडळ ट्रस्ट कन्ना चौक, व अष्टभुजा देवी मंदीर मोदीखाना.

# समाजास उपयोगी पडणाऱ्या संशोधनावर भर द्या : डॉ. महानवर

## सोलापूर विद्यापीठात 'सामाजिकशास्त्रे संशोधनातील नवे प्रवाह'वर कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑग़स्ट-**

समाजातील शेवटच्या घटकापर्यंतच्या समस्यांचा अभ्यास करून व त्यांच्या गरजा ओळखून उपयोगी व विकासाभिमुख संशोधनावर शिक्षक व संशोधकांनी भर द्यावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

मंगळवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलाच्यावतीने पीएम उषा विभागाच्या सहकार्याने सामाजिकशास्त्रे संशोधनातील नवे प्रवाह या विषयावरील आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. महानवर हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल वावरे, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, पीएम उषा विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. ऋषिकेश मंडलिक, प्रा. सचिन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ, महानवर म्हणाले की, समाजाशी निगडित संशोधनाला विशेष महत्व राहते. संशोधन झाल्यानंतर त्याचा सम ाजाला किती उपयोग होतो, हे फार महत्वाचे आहे. भारतात संशोधन व पेटंट वाढत आहे, ही चांगली बाब आहे. विद्यार्थी व नव संशोधकांनी समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांवर संशोधन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

डॉ. वावरे म्हणाले की, संविधानिक मूल्यांची जाणीव संशोधकांना हवी. सामाजिक बदल वेगाने होत आहेत. त्याचा अभ्यास व संशोधन सामाजिकशास्त्रे विभागातील विद्यार्थी व अभ्यासकांनी करणे आवश्यक आहे. नवतंत्रज्ञानामुळे आज समाजात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. एआयमुळे रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने गुणवत्तापूर्ण संशोधन विद्यार्थी व शिक्षकांनी करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी डॉ. गौतम कांबळे व डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी सामाजिकशास्त्रे संकुलाच्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंबादास भास्के

# विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळ अध्यक्षपदी रविराज भोपळे

**कार्याध्यक्षपदी किरण पुजारी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑग़स्ट-**

विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी रविराज भोपळे तर कार्याध्यक्षपदी किरण पुजारी यांची एकमताने निवड झाली.

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या बैठकीत माजी आमदार व संस्थापक सदस्य शिवशरण पाटील बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी ट्रस्ट अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष डॉ.मल्लिकार्जुन तरनळी, सदस्य श्याम धुरी, माजी अध्यक्ष महेश घाडगे, महेश देवकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. उत्सव सचिव प्रसाद गाजरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. मावळते अध्यक्ष अण्णाप्पा सत्तुबर यांनी मागील वर्षी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने राबविण्यात आलेले उपक्रमांची माहिती दिली. संस्थापक सदस्य विजय शाबादी यांनी मंडळाच्या वाटचाली संबंधीची माहिती दिली. डॉ.मल्लिकार्जुन तरनळी यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी शाम धुरी, रवींद्र आम णे आदींनी मनोगत व्यक्त केले.

**इतर पदाधिकारी याप्रमाणे :** सचिवः प्रसाद गाजरे व ॲड. संदीप बेंद्रे, उपाध्यक्ष : शिरीष सोनटक्के व सुजाता म्हेत्रे, सहसचिवः किरण पाटील व पवन मोरे, कोषाध्यक्षः राचप्पा कटारे, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख : राजेंद्र मुलगे व मल्लिनाथ अतनुरे, मिरवणूक प्रमुखः सागर पुकाळे, महिला आघाडी प्रमुख : प्रीती उडाणशिव, मधुमती चाटे, मीना गायकवाड, सुरेखा गोब्बूर, स्वाती पुंजाळ, वैशाली माशाळ, माधुरी भोसले, ज्योती केगावकर, निर्मला भांजे, सुजाता आमणे. निवेदिकाः प्रांजली मोहीकर, कार्यकारणी सदस्य : संगमेश्वर मुचांडे, रेवणसिद्ध कुसगल, बळवंत बिराजदार, मल्लिनाथ भुशेट्टी, सल्लागार प्रशांत जोशी, उमेश कदम, प्रमिला चोरगी, तात्यासाहेब पवार, पद्माकर कुलकर्णी, बसवराज हळळी, आण्णापा सत्तुबर, संतोष पुजारी.


## श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, बार्शी

२६३२, रुई ओळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

### ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

श्री भगवंत सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, बार्शी या संस्थेची **४३ वी** वार्षिक सर्वसाधारण सभा **दि. ०३/०९/२०२५ वार बुधवार सकाळी ११.३० वाजता** मातृमंदिर, श्री भगवंत सहकारी गृहनिर्माण संस्था, दिनदयाळ नगर, ढगे मळा, कुर्डूवाडी रोड, बार्शी येथे होणार आहे. सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१) दि. ०५/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
२) दि. ३१/०३/२०२५ अखेर संपलेल्या वार्षिक हिशोब पत्रकांना मंजुरी देणे. त्या मुदतीच्या कामकाजावर संचालक मंडळाचे वतीने मा. सभापती यांचे अहवालास मान्यता देणे.
३) सन २०२४-२०२५ या वर्षी संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता व लाभांश जाहीर करणे
४) सन २०२४-२०२५ या वर्षाचे लेखापरीक्षण व अहवाल वाचून नोंद घेणे.
५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) मधील तरतुदीनुसार संचालकांना व त्यांचे कुटुंबियांना दिलेली कर्जे व त्याचे वसुली पत्रकाची नोंद घेणे.
६) सन २०२५-२०२६ या वर्षाचे संचालक मंडळाने केलेले अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७) संस्थेने उभारावयाची कर्ज मर्यादा ठरविणे.
८) सन २०२४-२०२५ साठी तडजोडीने केलेली वसुली/व्याजात सूट व निर्लेखनास मान्यता देणे.
९) सन २०२५-२०२६ सालासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची व अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
१०) सन २०२५-२०२६ करीता कर्ज तडजोड समिती व तक्रार निवारण समिती निर्मितीस मान्यता देणे.
११) सन २०२३-२०२४ चे दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
१२) सुधारीत आदर्श उपविधी २०२५ लागू करणेबाबत/स्वीकारणेबाबत मान्यता देणे.
१३) मा. अध्यक्षांच्या संमतीने येणाऱ्या आयत्या वेळेच्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाचे आदेशावरुन
**श्री. अ. रा. बनसोडे**
जनरल मॅनेजर

ठिकाण :- बार्शी
दिनांक :- १९/०८/२०२५

**टीप :-** १) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही. २) यासंबंधी कोणास काही माहिती अथवा प्रश्न विचारायाचे असतील त्यांनी लेखी प्रश्न दि. २८/०८/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत कार्यालयाकडे कळवावेत. वेळेत न आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. ३) सभासदांना देण्यात येणाऱ्या लाभांशाची रक्कम सभासदांचे सेव्हींग्ज खातेस जमा देण्यात येईल. त्याकरीता ज्या सभासदांचे सेव्हींग्ज खाते नसेल त्यांनी त्वरीत आपले सेव्हींग्ज खाते उघडून घ्यावे. ४) ज्या सभासदांची के.वाय.सी. पूर्ण करावयाची राहिली असेल त्यांनी आपली के.वाय.सी. पूर्ण करुन घ्यावी.


# मोकाट जनावरप्रश्नी महापालिकेतर्फे कठोर कारवाई

**दंडापासून ते कायम स्वरूपी जप्तीचा निर्णय**

**जनावरांचे इअर टॅगिंग करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

शहरातील मोकाट जनावरांच्या वाढत्या समस्येमुळे सोलापूर म हापालिकेने कठोर भूमिका घेतली आहे. या अंतर्गत आता दंडापासून ते जनावरांची कायमस्वरूपी जप्ती करण्यात येणार आहे.

शहरात मोकाट जनावरांचा प्रश्न गत अनेक वर्षांपासून ऐरणीवर आहे. यासंदर्भात नागरिकांच्या तक्रारींचा विचार करून आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई अधिक तीव्र करण्याचा प्रशासक ठराव मंजूर करण्यात आला आहे. दि. ११ जुलै रोजी महापालिकेत जनावरे म ालक व पोलीस निरीक्षक यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत सर्व जनावरांना इअर टॅगिंग करणे बंधनकारक करण्यात आले होते. यासाठी म ालकांना एका महिन्यापेक्षा अधिक मुदत देण्यात आली होती. आता ही मुदत संपल्याने महापालिका थेट कारवाई करणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉक्टर सचिन ओम्बासे यांनी दिली. जनावरांचे इअर टॅगिंग करून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे

### जनावरे सोडवून घेण्याची प्रक्रिया

जप्त झालेली इअर टॅगिंग असलेली जनावरे सोडवून घेण्यासाठी मालकाने दंड भरल्याची पावती, १०० च्या बॉण्ड पेपरवरील स्वयंघोषणापत्र (२ साक्षीदारांच्या स्वाक्षरीसह) सादर करावे लागेल. ही प्रक्रिया १० दिवसांच्या आत पूर्ण केल्यासच जनावरे परत मिळतील. महापालिकेने सर्व जनावर मालकांना आवाहन केले आहे की, त्यांनी तात्काळ आपल्या जनावरांचे इअर टॅगिंग करून घ्यावे व जनावरे मोकाट सोडू नयेत, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिला आहे.

### असे राहणार कारवाईचे स्वरूप

इअर टॅगिंग असलेली जनावरे पहिल्यांदा मोकाट आढळल्यास मोठ्या जनावरांना १० हजार तर लहान जनावरांना ५ हजार रुपये दंड करण्यात येणार आहे. ही जनावरे दुसऱ्यांदा मोकाट आढळल्यास दंड अनुक्रमे २० हजार व १० हजार राहणार आहे. अशी जनावरे तिसऱ्यांदा पुन्हा मोकाट आढळल्यास अशी जनावरे कायमस्वरूपी जप्त करून गोशाळेत ठेवण्यात येईल. इअर टॅगिंग नसलेली जनावरे थेट कायमस्वरूपी जप्त करून गोशाळेत ठेवण्यात येणार आहे. यासाठी कोणताही दंड आकारला जाणार नाही.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस सोलापूर जिल्ह्यातील व विशेषतः मौजे मैंदर्गी ता. अक्कलकोट जि. सोलापूर तसेच सोलापूर जिल्ह्यातील लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि तालुका अक्कलकोट मौजे मैंदर्गी (न.प.) ता.अक्कलकोट येथील म्यु.प. नविन घर नं. अ १८१ व जुना घर नं. १८६ यांसी एकूण क्षेत्र १२२५ चौ. फुट इतकी असुन त्यापैकी उत्तर दिशेची पुर्व-पश्चिम ५० फुट व दक्षिणोत्तर १२.५ फुट इतकी जागा दिलेली असून त्यात जुने बांधकाम असलेल्या ३ खोल्या असलेली जागा आहे. त्यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - कट्टीमनी यांची जागा, पश्मिचेस - रस्ता, दक्षिणेस - म्यु.प. घर नं. १८१ पैकी व उत्तरेस - गुत्तेदार यांची जागा व आतील दगड, माती तंदगभूत वस्तूसह व वहिवाटीचे इजमेंटचे सर्व हक्कासहची जागा ही नागय्या सिध्दय्या मठपती यांचे कब्जे वहिवाटीची होती ते दि. २२/११/२०20 रोजी मयत झाले आहेत. वारस पत्नी या नात्याने सदर मिळकत ही त्यांनी आमचे अशील रेवणय्या सिध्दय्या मठपती यांना कब्जा पावती करारपत्राने दिलेली आहे. सदरहू मिळकत हि निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास त्यांनी आमच्या अशीलांना दिलेली आहे.

तरी वर नमुद मिळकतीवर इतर कोणाचाही अग्रहक्क, मालकी, साठेखत, लिज, जप्ती, टाच, गहाण, कर्ज, दान, खरेदीखत, बक्षीस, पोटगी, बोजा, कब्जा व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध असल्यास हि जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रे पुराव्यानिशी लेखी हरकत मा. मुख्याधिकारी न.प. मैंदर्गी यांचेकडे नोंदवावी. मुदतीनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत आमच्या अशिलावर अथवा वर नमुद जागेवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हि जाहिर नोटीस दिली असे. ता. १९/०८/२०२५.

**सही/-**
**ॲड. ए.डी. नाईकवाडी**
**नोटरी भारत सरकार**
**रा. १८८६/४ विणकर वसाहत, मैंदर्गी**
**ता. अक्कलकोट मो.नं. ९८८१५२२९०७**
**अशिल - रेवणय्या सिध्दय्या मठपती**



## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे**

### जाहीर फेरलिलाव व विक्री नोटीस

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक ०४/०३/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार केदार महादेव हदरे प्रोप्रा. केदार महादेव हदरे रा.१) मु.पो. संगदरी ता. दक्षिण सोलापूर २) आय. १५४, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर व जामीनदार १) श्रीशैल शरणप्पा माळी रा.फ्लॅट नं.२, गौरी अपार्टमेंट, बलदवा नगर, शेळगी, सोलापूर २) विजय दौलप्प्पा बिराजदार रा.११, मित्र नगर, शेळगी, सोलपुर यांना पाठवून रक्कम रुपये २५,३६,३३२/- या वर दिनांक ०१/०८/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम ची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव **''जेथे आहेत व जैसे आहेत''** अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| अ. नं. | कर्जदार / जामीनदार यांचे नाव व पत्ता | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | ३१/०३/२०२५ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :** **केदार महादेव हदरे** **प्रोप्रा केदार महादेव हदरे** रा.१) मु.पो. संगदरी ता. दक्षिण सोलापूर २) आय.१५४, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर **जामीनदार** **१. श्रीशैल शरणप्पा माळी** रा. फ्लॅट नं. २, गौरी अपार्टमेंट, शेळगी, सोलापूर **२. विजय दौलप्पा बिराजदार** रा.११, मित्र नगर, शेळगी, सोलापूर | केदार महादेव हदरे यांचे मालकी व वहिवाटीची मौजे बोरामणी ता. दक्षिण सोलापूर येथील गट क्र. ४४२ क्षेत्र ००.७९ हे. आर व पो.ख. ०.०१ हे.आर. | रु. ३०,८४,७६२/- | रु. ३८,११,७३८/- दि. ०१/०४/२०२५ पासून पुढील व्याज, दंडव्याज व इतर खर्च |
| | **लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ** | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक : २४/०९/२०२५ वेळ : सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत **निविदा उघडण्याची दिनांक २५/०९/२०२५ सायं. ४:०० वाजता** | | |

**टिप -**
१. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि.२२/०९/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर आर.टी.जी.एस ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक : १८/०८/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**



## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**परिशिष्ट- ४ (ए), ८(६) ची तरतूद**

### जाहिर फेरलिलाव

ज्याअर्थी बँकेने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माध्यमाद्वारे सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड इंफोर्समेंट ऑफ सिक्युरीटरी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (SARFASI) च्या कलम १३(४) अंतर्गत वसुलीसाठी कर्जदार व जामीनदार यांच्या खालील तपशीलातील तारण मालमतेचा पुढील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विक्रीसाठी बंद पाकिटात (बयाणा रक्कमेसह) निविदा/प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**विक्रीच्या अटी व शर्ती : १)** निविदा ही बयाणा रकमेसाहित बंद पाकिटात प्राधिकृत अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि. सोलापूर यांचे नावाने जमा करावी. **२)** राखीव किंमतीपेक्षा कमी रक्कम आणि/किंवा कमी बयाणा रकमेची कोणताही निविदा विचारांत घेतली जाणार नाही **३)** शेड्यूलमध्ये नमूद केल्यानुसार बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर / RTGS / NEFT लिलावांत सहभागी होण्यासाठी Authorized Officer, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur यांच्या नावे काढलेली असावी. **४)** यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्याबरोबर विक्री किंमतीच्या २५% रक्कम (पंचवीस टक्के) त्यातून बयाणा रकमेपोटी भरलेली रक्कम वजा करून डीडी/पे ऑर्डर /RTGS / NEFT द्वारे लगेच भरावी लागेल व उर्वरित रक्कम बँकेद्वारे विक्रीची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत किंवा बँकेने दिलेल्या मुदतवाढीच्या तारखेच्या आंत भरावी लागेल **५)** विक्री 'जसे आहे, जेथे आहे व आधार विरहीत' तत्वावर केली जात आहे. **६)** इतर अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील,

**शेड्युलमधीत मालमत्तेची विक्री बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे खालील निर्धारित तपशिलानुसार जाहिर लिलावाद्वारे केली जाईल.**

| मालमत्ता पाहणी तारीख व वेळा | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा सादर करण्याचे व उघडण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| दि. २०/०९/२०२५ स. ११.०० ते दु. ३.०० पर्यंत | दि. २२/०९/२०२५ स. ११.०० ते ५.०० पर्यंत | दि. २४/०९/२०२५ सं.५.०० वा. | श्री. महावीर अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर |

| क्र. | कर्जदार व जामीनदार नाव नोटीस दिनांक व रक्कम | तारण स्थावर मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत / बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू (एचयूएफ) कलम १३(२) नोटीस दि. ०१/०२/२०२२ १३(४) नोटिस दि. ०१/०६/२०२२ दि. ३१/०१/२०२२ अखेर येणेबाकी रु.३,८७,१६,२१०/- (दि. ३०/०४/२०२५ अखेर येणेबाकी रु.६,७२,२२,५१५/- + पुढील होणारे व्याज व खर्च) मा. जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या मा. मंडल अधिकारी मंद्रूप, ता. दक्षिण सोलापूर यांचे मार्फत प्रत्यक्ष ताबा दि. ०४/०४/२०२४ **जामीनदार -** १. दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू २. शिवरुद्रप्पा सिध्दाराम कल्याणी ३. श्रीमंत निंगप्पा पाच्चापुरे ४. संजय अण्णाप्पा संगोळगी ५. विश्वजित अप्पासाहेब बिराजदार ६. सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू | दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू यांचे नांवावरील जिल्हा सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे टाकळी हद्दीतील गट नं. ५७/१/ब यांसी क्षेत्र ०.६५.३७ आर.चौ.मी. यावरील सध्या असलेले व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे- **पूर्व -** सोलापूर विजयपूर रस्ता, **पश्चिम -** गट नं. ५७/अ/१ ५७/अ/३ **दक्षिण -** गट नं. ५७अ/३ **उत्तरेस -** ५७/अ/१ | २,३६,३४,५००/- २४,००,०००/- |

बँकेस ज्ञात असलेल्या बोजाचा तपशील नाही. मालमत्तेबाबत कोणताही दावा कोणी केला असल्यास किंवा त्या स्वरूपाचा व मूल्याचा कोणताही अन्य ज्ञात तपशील नाही.

**दिनांक : १८/०८/२०२५**
**स्थळ : सोलापूर**
**(टिप :- स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य.)**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**




### मोडनिंब येथे रोटरीच्या वतीने वृक्षारोपण

**मोडनिंब, दि. १९ ऑगस्ट-**

रोटरी क्लब ऑफ मोडनिंब यांच्या वतीने भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून उजनी कॉलनी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम ानंतर सर्वांनी एकत्र येऊन मिठाई वाटप उत्साहात साजरा करण्यात आला. वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमास रोटरी क्लबचे अध्यक्ष निलेश गिड्डे, संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत कोल्हे, डॉ. वागज, नागनाथ कोरडे, दीपक सुर्वे, सुनील रेपाळ, कृषी अधिकारी संतोष सुर्वे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष हनुमंत कुंभार, सुरवसे गुरुजी, जाडकर, विराण कुलकर्णी, पत्रकार प्रथमेश पवार, युवराज रणसिंग, प्रकाश सुरवसे, डॉ. सुहास खडके, तानाजी इंगळे, महेश पवार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.


**मध्य रेल्वे**
सोलापूर विभाग
सिग्नलिंगचे काम

**निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-15 तारीखः 18/08/2025** DRM(ST) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर त्यांच्या वतीने भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/ठेकेदारांकडून खालील कामासाठी ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे: कामाचे नाव त्याच्या परिसरासह : सोलापूर विभागातील कुर्डुवाडी-मिरज विभागातील विविध ठिकाणी विविध स्थानांचे जंक्शन बॉक्स, मुख्य सहाय्यक सिग्नल पोस्ट, ईसी पोल आणि सॉकेट्स इत्यादींचे रंगकाम आणि इतर सुधारणा कामे. कामाची अंदाजे किंमतः रु. 63,54,014.35. निविदा फॉर्मची किंमतः शून्य. जमा करावयाची बयाणा रक्कमः रु. 1,27,100/-. काम पूर्ण करण्याचा कालावधीः 06 महिने. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः 10/09/2025 15.30 तासानंतर. तपशील आयरेप्स वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग खखख डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी पेमेंट (EMD) नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in

DRM/S&T शाखा
मध्य रेल्वे, सोलापूर
APEX-65

रेल्वे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है

## महत्त्वाचे

### राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक कायदा झाला



**नवी दिल्ली** : भारताच्या क्रीडा प्रशासनाचे पुनरुज्जीवन करण्याचे आश्वासन देणाऱ्या ऐतिहासिक कायद्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मान्यता दिल्यानंतर राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक कायदा झाला आहे. राष्ट्रपतींची संमती सोमवारी आली, असे केंद्र सरकारने जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेत म्हटले आहे. संसदेच्या खालील कायद्याला १८ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली आणि सामान्य माहितीसाठी येथे प्रकाशित करण्यात येत आहे- राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा, २०२५, असे त्यात म्हटले आहे. गत एक वर्षापासून प्रलंबित असलेले क्रीडा विधेयक गत एक वर्षापासून विविध भागधारकांशी व्यापक सल्लामसलत केल्यानंतर मंजूर करण्यात आले. ते २३ जुलै रोजी लोकसभेत सादर करण्यात आले आणि त्यानंतर ११ ऑगस्ट रोजी मंजूर करण्यात आले. त्यानंतर एका दिवसानंतर राज्यसभेने दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या चर्चेनंतर ते मंजूर केले. नवीन कायदा केवळ प्रशासनाचे निकष ठरवत नाही तर जलद विवाद निराकरणासाठी राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाची निर्मिती देखील अनिवार्य करतो. याशिवाय अनेकदा वादात अडकलेल्या निवडणुकांवर देखरेख करण्यासाठी राष्ट्रीय क्रीडा निवडणूक पॅनेलची निर्मिती करण्याची देखील मागणी करतो.

### स्मृती मंधाना सहा वर्षांनंतर वन-डे क्रमवारीत अव्वल

**दुबई** : भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार आणि स्टार सलामीवीर स्मृती मंधाना हिने आयसीसी एकदिवसीय



फलंदाजांच्या क्रमवारीत पुन्हा अव्वल स्थान पटकावले आहे. मंगळवारी आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीनुसार, सहा वर्षांच्या अंतरानंतर स्मृती पुन्हा एकदा जगातील अव्वल क्रमांकाची एकदिवसीय फलंदाज बनली आहे. स्मृतीने दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा वोल्वार्ड्टला मागे टाकले. लॉराने वेस्ट इंडीजविरुद्ध्या अलिकडच्या वन-डे मालिकेत केवळ २७ व २८ धावा काढल्यानंतर तिस्ऱ्या स्थानावर घसरली. परिणामी वोल्वार्ड्टचे १९ रेटिंग गुण कमी झाले. स्मृती मंधाना आता ७२७ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर आहे, तर इंग्लंडची कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंट ७१९ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. वोल्वार्ड्टकडे ७१९ गुण आहेत, परंतु टायब्रेकिंग निकषांमुळे ती तिसऱ्या स्थानावर आहे. २०१९ नंतर पहिल्यांदाच स्मृती मंधानाने अव्वल मानांकन राखले आहे. कोलंबो येथे झालेल्या श्रीलंका आणि दक्षिण आफ्रिका विरुद्धच्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात तिने झळकावलेल्या शानदार शतकानंतर तिचा उदय झाला आहे.

# आशिया चषकासाठी भारतीय संघ जाहीर

**सूर्यकुमार कर्णधार, शुभमन गिल उपकर्णधारपदी**
**जितेश शर्मा, बुमराहची निवड**
**श्रेयस, यशस्वी जयस्वालला स्थान नाही**




टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव



टी-२० उपकर्णधार शुभमन गिल



जसप्रीत बुमराह



जितेश शर्मा

◆ **मुंबई, १९ ऑगस्ट**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मंगळवारी आगामी ९ सप्टेंबरपासून संयुक्त अरब अमिरातमध्ये (यूएई) होणाऱ्या आशिया चषकक्रिकेट स्पर्धेसाठी भारताच्या १५ सदस्यीय टी-२० संघाची घोषणा केली. यात कसोटी कर्णधार शुभमन गिलची उपकर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली, तर वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहचाही संघात समावेश करण्यात आला. श्रेयस अय्यर व यशस्वी जयस्वालला मात्र संघात स्थान मिळाले नाही. विदर्भाच्या जितेश शर्माला पर्यायी यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून स्थान मिळाले आहे.

आशिया चषक २०२५ पुरुष टी-२० क्रिकेट स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर दरम्यान संयुक्त अरब अमिरातमध्ये होणार आहे. सामने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्वरूपात होतील.

गिलचा शेवटचा टी-२० सामना २०२४ मध्ये पल्लेकेले येथे श्रीलंकेविरुद्ध खेळला होता आणि आता त्याची अक्षर पटेलच्या जागी उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.

इंग्लंडमध्ये गिलने जबरदस्त फॉर्म दाखवला, त्याने अपेक्षेपेक्षा जास्त कामगिरी केली, असे मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांनी संघ घोषणा पत्रकार परिषदेत सांगितले.

ऑक्टोबरमध्ये वेस्ट इंडीजविरुद्ध्या घरच्या कसोटी मालिकेच्या जवळ असल्याने बुमराहच्या उपलब्धतेबद्दल काही शंका होत्या, परंतु निवडकर्त्यांनी निवड करण्याचा निर्णय घेतला आणि गत वर्षीच्या विश्वचषकानंतर बुमराहची ही पहिलीच टी-२० स्पर्धा असेल.

डावखुरा मनगटाचा फिरकी गोलंदाज कुलदीप यादवलाही संघात स्थान देण्यात आले आहे, तर जितेश शर्मा पर्यायी यष्टिरक्षक-फलंदाज असेल.

निवडकर्त्यांनी निवडलेल्या पाच राखीव खेळाडूंमध्ये यशस्वी जयस्वालचा समावेश होता. जयस्वालला वगळणे दुर्दैवी आहे, पण त्याला प्रतीक्षा करावी लागेल, असे आगरकर म्हणाले.

**अभिषेक गिल किंवा संजूसोबत डावाची सुरुवात करणार**

अभिषेक शर्मा आणि गिल किंवा संजू सॅमसन यांच्यातील सलामीची जोडी भारताच्या डावाची सुरुवात करेल. भारत त्यांच्या टॉप ऑर्डरमध्ये शक्ती आणि स्थिरता संतुलित करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. ◀(वृत्तसंस्था)

**भारत-पाकिस्तान सामना १४ सप्टेंबर रोजी**

भारताला आशिया चषकाच्या गट अ मध्ये पाकिस्तान, ओमान आणि युएईसह स्थान देण्यात आले आहे. १० सप्टेंबर अ गटाच्या सामन्यांना सुरुवात होणार आहे. भारत विरुद्ध पाकिस्तान हा सर्वात प्रतीक्षित सामन्यांपैकी एक सामना असेल. १४ सप्टेंबर रोजी भारत आणि पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तान यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे.

**आशिया चषक २०२५ स्पर्धेसाठी भारताचा संघ असा**

सूर्य कुमार यादव (कर्णधार) शुभमन गिल (उपकर्णधार) अभिषेक शर्मा, तिलक वर्मा हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टिरक्षक), जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव व संजू सॅमसन (यष्टिरक्षक), हर्षित राणा व रिंकू सिंग.

# संघातून वगळले ५ दिग्गज खेळाडू

१. २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारतासाठी शेवटचा टी-२० सामना खेळणारा श्रेयस अय्यर सध्याच्या योजनेत नव्हता. तथापि, या वर्षीच्या आयपीएलमध्ये त्याने केलेल्या कामगिरीनंतर अनेकांना तो पुनरागमन करेल अशी अपेक्षा होती. त्याने ५०.३३ च्या सरासरीने आणि १७५ च्या स्ट्राइक रेटने ६०४ धावा केल्या आणि त्याचा संघ अंतिम फेरीत पोहोचला.

२. यशस्वी जयस्वाल हा आणखी एक उल्लेखनीय वगळला गेला. त्याला सलामीवीर म्हणून एक मजबूत दावेदार म्हणून पाहिले जात होते आणि तो राखीव सलामीवीर म्हणून भारताच्या गेल्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग होता. जयस्वालचा आयपीएल हंगाम प्रभावी राहिला, त्याने ४३.०० च्या सरासरीने आणि १५९.७१ च्या स्ट्राइक रेटने ५५९ धावा करून राजस्थान रॉयल्सचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून कामगिरी केली.

३. आपल्या ऑफ-स्पिनमुळे एक महत्त्वाचा पर्याय मानला जाणारा अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदर देखील या स्पर्धेतून बाहेर पडला. त्याने अलिकडेच इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत प्रभाव पाडला होता, ज्यामुळे त्याला वगळण्यात आले होते.

४. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत खेळणारा आणि या वर्षीच्या आयपीएलमध्ये १५ सामन्यांत २५ बळी घेऊन पर्पल कॅप विजेता प्रसिध कृष्णा यालाही संघातून वगळण्यात आले आहे.

५. इंग्लंडविरुद्धच्या भारताच्या मालिका विजयाचा नायक मोहम्मद सिराज हे आणखी एक मोठे नाव आहे, जे वगळले आहे. त्या मालिकेतील शेवटच्या कसोटीत भारताच्या विजयात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली आणि या वर्षीच्या आयपीएलमध्ये १६ बळी घेतले.

# मनू भाकरने आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत जिंकले १० मीटर एअर पिस्तूलचे कांस्यपदक

◆ **श्यामकेंट, १९ ऑगस्ट**

कझाकस्तानमधील श्यामकेंट येथे सुरु असलेल्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत मंगळवारी भारताची दुहेरी ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकर हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदक जिंकले.

मनू भाकरने आठ महिलांच्या अंतिम फेरीत २१९.७ गुणांसह तिसरे स्थान मिळवले. चीनच्या कियानके माने २४३.२ गुणांसह सुवर्णपदक जिंकले, कोरियन जिइन यांगला २४१.६ गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

२३ वर्षीय मनू भाकरने पात्रता फेरीत ५८३ गुणांसह तिसरे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. कोरियाची येजिन ओहने पात्रता फेरीत ५८५ गुणांसह अव्वल स्थान मिळवले, परंतु ती केवळ रँकिंग गुणांसाठी सहभागी झाली होती, त्यामुळे चीनची कियानक्सुन याओ अव्वल स्थानावर असलेली नेमबाज म्हणून अंतिम फेरीत पोहोचली.



मनू भाकर कांस्यपदकाची मानकरी

या स्पर्धेत केवळ रँकिंग गुणांसाठी भाग घेणारी ईशा सिंग ५७७ गुणांसह नवव्या स्थानावर होती, तर सुरुची सिंग ५७४ गुणांसह १२ व्या स्थानावर होती. पलक ५७३ गुणांसह १७ व्या स्थानावर होती, तर सुरभी राव (आरपीओ) ५७० गुणांसह २५ व्या स्थानावर होती.

भाकर, सुरुची सिंग आणि पलक या त्रिकुटाने एकूण १७३० गुणांसह सांघिक स्पर्धेत तिसरे स्थान पटकावले. ◀(वृत्तसंस्था)

# भारताच्या विश्वचषक संघात रेणुका, अमनजोत

**शेफालीला संधी नाही**

◆ **मुंबई, १९ ऑगस्ट**

वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूर आणि अष्टपैलू अमनजोत कौर दुखापतीमधून सावरल्या असून त्यांना भारताच्या महिला विश्वचषक संघात स्थान देण्यात आले आहे.

गत वर्षी एकदिवसीय संघात स्थान न मिळालेली शेफाली वर्मा अजूनही निवडीपासून वंचित आहे, तर इंग्लंडविरुद्धच्या अलीकडील एकदिवसीय मालिकेचा भाग असलेल्या तेजल हसनबीस व प्रतिका रावल सलामी सतघरेला १५ सदस्यीय संघातून वगळण्यात आले आहे.

तथापि, विश्वचषकापूर्वी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी अमनजोतला विश्रांती देण्यात आली होती.

मी बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये "काही लहान त्रुटींवर काम करत आहे, असे भारताची कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली.

१४ सप्टेंबरपासून नवीन चंदीगडमध्ये सुरू होणाऱ्या मालिकेसाठी रेणुकाला या संघात स्थान देण्यात आले आहे. सतघरे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामने देखील खेळेल



रेणुका सिंग ठाकूर





अमनजोत कौर

आणि विश्वचषकासाठी अमनजोत तिच्या जागी येईल.

भारताच्या प्रमुख अष्टपैलू खेळाडूंपैकी एक असलेल्या अमनजोतला गत महिन्यात इंग्लंडविरुद्ध्या शेवटच्या दोन वन-डे सामन्यांमध्ये पाठीच्या दुखापतीमुळे खेळता आले नाही. दरम्यान, रेणुका डिसेंबर २०२४ पासून स्ट्रेस फ्रॅक्चरमुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून बाहेर आहे.

रेणुका आमच्यासाठी एक मौल्यवान खेळाडू आहे. तिला दुखापत झाली होती आणि ती खेळाबाहेर होती, पण ती उपलब्ध आहे, असे मुख्य निवडकर्ता नीतू डेव्हिड म्हणाल्या.

भारताचा महिला विश्वचषक संघ :- हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना, प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, रेणुका सिंग ठाकूर, अरुंधती रेड्डी, ऋचा घोष, क्रांती गौड, अमनजोत कौर, राधा यादव, एन. श्री चरणी, यस्तिका भाटिया, स्नेह राणा.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध्या वन-डे मालिकेसाठी भारतीय महिला संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना, प्रतिका रावल, हरलीन देओल, दीप्ती शर्मा, जेमिमाह रॉड्रिग्स, रेणुका सिंग ठाकूर,अरुंधती रेड्डी, ऋचा घोष, क्रांती गौड, सायली सातघरे, राधा यादव, एन. श्री चरणी, यस्तिका भाटिया, स्नेह राणा. ◀(वृत्तसंस्था)

# पाकिस्तान, ओमानच्या जागी बांगलादेश, कझाकस्तानला स्थान

**आशिया चषक पुरुष हॉकी**

◆ **नवी दिल्ली, १९ ऑगस्ट**

मंगळवारी जाहीर झालेल्या वेळापत्रकानुसार २९ ऑगस्टपासून राजगीर, बिहार येथे होणाऱ्या पुरुषांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत पाकिस्तान आणि ओमानची जागा बांगलादेश आणि कझाकस्तानने घेतली आहे.

यजमान भारताने गट अ मध्ये चीन, जपान व कझाकस्तानला स्थान दिले आहे, तर गट ब मध्ये मलेशिया, कोरिया, चीन तैपेई व बांगलादेशचा समावेश आहे.

मलेशिया आणि बांगलादेश २९ ऑगस्ट रोजी आपल्या पहिल्या सामन्यासह खंडीय स्पर्धेला सुरुवात करतील, त्यानंतर भारत पहिल्या दिवसाचा शेवटचा सामना चीनशी खेळेल. अंतिम, तिसऱ्या स्थानाचा सामना आणि ५/६ व्या स्थानाचे वर्गीकरण सामने ७ सप्टेंबर रोजी होणार आहेत.

भारत सरकारने या स्पर्धेसाठी पाकिस्तानी खेळाडूंना व्हिसा देण्याचे सांगितले होते, परंतु पाकिस्तान हॉकी महासंघाने (पीएचएफ) सुरक्षेच्या कारणास्तव प्रवास करण्यास नकार दिला आहे.

आठ संघांच्या स्पर्धेत पाकिस्तानचे स्थान भरण्यासाठी आयोजकांनी बांगलादेशशी आगाऊ संपर्क साधला होता.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतासोबत झालेल्या लष्करी संघर्षानंतर २०२६ च्या विश्वचषकासाठी पात्रता स्पर्धा असलेल्या आशिया चषकामध्ये पाकिस्तानचा सहभाग अनिश्चित झाला होता.

२६ जणांचा बळी घेणाऱ्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू केले होते. ◀(वृत्तसंस्था)

**भारत नेपाळविरुद्धच्या सलामी सामन्यासाठी सज्ज**

◆ **थिम्पू, १९ ऑगस्ट**

बुधवारपासून भूतानमधील थिम्पू येथील चांगलिमिथांग स्टेडियमवर १७ वर्षांखालील महिलांच्या दक्षिण आशियाई फुटबॉल स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. भारतीय महिला फुटबॉल संघ नेपाळविरुद्धच्या सामन्याने आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. नवीन स्पर्धेच्या स्वरूपात, चार संघ - बांगलादेश आणि भूतान हे इतर दोन संघ - डबल राऊंड-रॉबिन लीगमध्ये एकमेकांविरुद्ध खेळतील, म्हणजेच प्रत्येक संघ सहा सामने खेळेल. ३१ ऑगस्ट रोजी अंतिम सामन्यानंतर जो संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहील तो विजेता घोषित केला जाईल. ◀(वृत्तसंस्था)

# केशव महाराजचे प्रथमच ५ बळी

**दक्षिण आफ्रिकेचा ऑस्ट्रेलियावर ९८ धावांनी विजय**

◆ **केर्न्स, १९ ऑगस्ट**

डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराजने कारकिर्दीत प्रथमच डावात पाच बळी टिपण्याची किमया केली. एडन मार्करम (८२), टेम्बा बावुमा (६५) व ब्रीट्झकेची (५७) अर्धशतके आणि केशवने टिपलेल्या पाच बळींच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या एकदिवसीय सामन्यात ९८ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच दक्षिण आफ्रिकेने तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाने प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेने मर्यादित ५० षटकांत ८ बाद २९६ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तर देताना ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ ४०.५ षटकांत १९८ धावांतच गारद झाला. मार्शने तेवढी ८८ धावांची खेळी केली, परंतु उर्वरित फलंदाज दक्षिण आफ्रिकेच्या केशव महाराजच्या प्रभावी माऱ्यापुढे टिकाव धरू शकले नाहीत. केशवने ३३ धावांत तब्बल ५ फलंदाजांना बाद केले व ऑस्ट्रेलियाच्या आशा धुळीस मिळविल्या. केशव महाराजने आपल्या कारकिर्दीत प्रथमच व



केशव महाराजचा प्रभावी मारा

या मैदानावरील सर्वोच्च धावसंख्या २९६ चा बचाव करताना, दक्षिण आफ्रिकेने आठ ते १७ व्या षटकात २९ धावांत ६ बळी घेत सामना जिंकला. ◀(वृत्तसंस्था)

# बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ बॅडमिंटन स्पर्धेत तन्वी, उन्नती, भार्गव भारताचे नेतृत्व करणार



तन्वी शर्मा



उन्नती हुडा

◆ **नवी दिल्ली, १९ ऑगस्ट**

वेगाने प्रगतीच्या वाटेवर झेपावणारे बॅडमिंटनपटू तन्वी शर्मा आणि उन्नती हुडा, भार्गव राम अरिगेला आणि विश्व तेज गोबबूरू या मुलांच्या दुहेरी जोडीसह आगामी ६ ते १९ ऑक्टोबर दरम्यान गुवाहाटी येथे होणाऱ्या बीडब्ल्यूएफजागतिक कनिष्ठ गट बॅडमिंटन स्पर्धेत २५ सदस्यीय भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे.

भारतीय संघात आशियाई कनिष्ठ स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या वेन्नाला कलागोटला व रक्षिता श्री यांचाही समावेश आहे. त्यांच्या समावेशामुळे या जागतिक कनिष्ठ स्पर्धेसाठी सर्वात मजबूत भारतीय संघापैकी एक झाला आहे.

सुहंदीनाता चषक (मिश्र संघ स्पर्धा) ६ ते ११ ऑक्टोबर दरम्यान खेळला जाईल आणि त्यानंतर १३ ते १९ ऑक्टोबर दरम्यान नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स येथे वैयक्तिक स्पर्धा होतील.

भारत जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेसाठी घरच्या मैदानावर उतरणार आहे याबद्दल आम्हाला खूप आनंद आहे, असे बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाचे सचिव संजय मिश्रा यांनी म्हटले आहे.

आमच्या संघात दोन जागतिक ज्युनियर क्रमांक १ व क्रमांक २ चा खेळाडू आहेत, ज्यांनी आधीच वरिष्ठ सर्किटवर आपला ठसा उमटवला आहे. यावेळी आम्ही भारतीय खेळाडूंनापदक व्यासपीठावर पाहणार आहोत याचा मला विश्वास आहे, असेही ते म्हणाले.

भारताने शेवटचे २००८ मध्ये या स्पर्धेचे आयोजन केले होते, तेव्हा सायना नेहवाल सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय बॅडमिंटनपटू ठरली होती, तर आरएमव्ही गुरु साई दत्तने मुलांच्या एकेरीत कांस्यपदक जिंकले होते. देशाने आतापर्यंत या स्पर्धेत ११ पदके जिंकली आहेत, ज्यात चार रौप्य आणि सहा कांस्यपदक आहेत.

सध्याची ज्युनियर जागतिक क्रमांक १ व यूएस ओपन सुपर ३०० उपविजेती तन्वी आणि २०२२ ओडिशा मास्टर्स व २०२३ अबू धाबी मास्टर्समध्ये सुपर १०० जेतेपद जिंकणारी उन्नती, तसेच अलिकडच्या चीन ओपनमध्ये पी. व्ही. सिंधूला पराभूत करणारी उन्नती यांच्याकडून भारताला पदके मिळण्याची पूर्ण आशा आहे.

भारतीय संघ : मुलांचे एकेरी (१९ वर्षांखालील)- रौनक चौहान, ज्ञाना दत्तू टी. टी., लालथाझुआला एच, सूर्याक्ष रावत. मुली एकेरी (१९ वर्षांखालील)- तन्वी शर्मा, वेण्णाला कलागोटला, उन्नती हुडा, रक्षिता श्री एस. मुलांचे दुहेरी (१९ वर्षांखालील)- सुमित ए.आर.-भव्य छाबरा, भार्गव राम अरिगेला-विश्व तेज गोबबूरू, विष्णू केधर कोडे-मिथिलेश पी. कृष्णन . मुलींचे दुहेरी (१९ वर्षांखालील)- वेण्णाला कलागोटला-रेशिका यू., गायत्री रावत-मानसा रावत, आन्या बिश्त-एंजल पुणेरा. मिश्र दुहेरी (१९ वर्षांखालील)- भव्य छाबरा-विशाखा टोप्पो, लालरामसांगा सी.-तारिणी सुरी, विष्णू केधर कोडे-कीर्ती मंचला, वंश देव-दियंका वाल्दिया. ◀(वृत्तसंस्था)

# जागतिक पात्रता मिळविण्याचा मुरली श्रीशंकरला विश्वास

**चेन्नई** : येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर बुधवारी राष्ट्रीय आंतरराज्य वरिष्ठ ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा सुरू होणार आहे. ही स्पर्धा जागतिक स्पर्धेसाठी अंतिम निवड चाचणी आहे. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी (१३ ते २१ सप्टेंबर टोकियो) पात्रता गुण ८.२७ मीटर असले तरी, २०२२ च्या हॅंगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेत्या लांब उडीपटू मुरली श्रीशंकरला पात्रता सिद्ध करण्याचा पूर्ण विश्वास आहे. गत वर्षी एप्रिलमध्ये सरावादरम्यान झालेल्या गुडघ्याच्या दुखापतीतून आणि त्यानंतर कतारमध्ये झालेल्या शस्त्रक्रियेतून परतल्यानंतर, भारताचा अव्वल लांब उडीपटू मुरली श्रीशंकर चांगली कामगिरी करत आहे. केरळच्या २६ वर्षीय खेळाडूने जुलैपासून सहभागी झालेल्या तीन आंतरराष्ट्रीय स्पर्धांसह सर्व चारही स्पर्धा जिंकल्या आहेत. भुवनेश्वरमध्ये १० ऑगस्ट रोजी झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर कांस्य स्पर्धेत ८.१३ मीटर उडी ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे.

# योगा स्पर्धेत सरगुले राज्यात प्रथम

**राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड**

**करकंब, दि.१९ ऑगस्ट-**

संगमनेर येथे झालेल्या राज्य योगा स्पर्धेमध्ये करकंब (ता. पंढरपूर) येथील युगंधर आखाड्याची अमृता सरगुले हिने सोलापूर जिल्ह्याचे नेतृत्व करत महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिचे आखाड्याचे संचालक राजू अनवते, येथील युगंधर गुरुकुल यांनी अभिनंदन केले. या अगोदर तिने कोल्हापूर येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय योगा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करताना वैयक्तिक



व सांघिक अशा दोन्ही प्रकारात सुवर्णपदक पटकावले होते. तसेच अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लीग योगा स्पर्धेमध्ये अमृताने आठवा क्रमांक प्राप्त केला होता.

**निवासी गुरुकुलमध्ये सर्व प्रकारचे प्रशिक्षण**

करकंब व परिसरातील पालकांनी आपली मुले निरोगी राहावे, त्यांचा शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकास योग्यरीतीने व्हावा यासाठी त्यांना दररोज युगंधर आखाड्यामध्ये पाठवावे. युगंधर आखाड्याच्यावतीने नूतन निवासी गुरुकुलमध्ये त्यांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**- राजू अनवते, संचालक युगंधर आखाडा, करकंब.**

# राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत बार्शीच्या राजवर्धन तिवारीस कांस्य

**राज्य स्पर्धेतही सुवर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत बार्शीच्या राजवर्धन तिवारी याने कांस्य पदक संपादिले. गुजरात बडोदा येथे झालेल्या राष्ट्रीय मानांकित स्पर्धेत राजवर्धनने ११ वर्षांखालील मुलांच्या गटात ही कामगिरी केली. त्याचा भारताचा आंतरराष्ट्रीय खेळाडू व कर्णधार कमलेश मेहता यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर नागपूर येथे सुरु असलेल्या राज्य मानांकित स्पर्धेतही राजवर्धनने सुवर्ण पदक पटकाविले. त्याबद्दल त्याचे व प्रशिक्षक गणेश स्वामी याचे सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजीव प्रधान व सचिव झेड. एम. पुणेकर यांनी अभिनंदन केले आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### भक्तांना एकाच क्षताखाली सर्व सोयी सुविधा: आढळराव-पाटील यांचे प्रतिपादन

**अक्कलकोट, दि. १९ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या धार्मिक क्षेत्रातील महाप्रसादालयात भक्तांना एकाच क्षताखाली सर्व त्या सोयीसुविधा देण्यामध्ये श्री क्षेत्र अक्कलकोटातील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व श्री क्षेत्र शेगाव येथील महाप्रसादालय या दोन्ही संस्थानचे कार्य हे एका नाण्यांचे दोन बाजू असल्याचे मनोगत माजी खासदार व महाराष्ट्र गृहनिर्माण विकास मंडळाचे पुणे विभागाचे अध्यक्ष व श्री क्षेत्र भिमाशंकर देवस्थानचे विश्वस्त शिवाजीराव आढळराव-पाटील यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे बाळासाहेब गाडगे, स्वराज घाडगे, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### अकलूजमध्ये सलग दुसऱ्या दिवशीही सूर्यदर्शन नाही; पावसाने रस्ते चिखलमय

**अकलूज, दि.१९ ऑगस्ट-**

अकलूज परिसरात सलग दुसऱ्या दिवशीही सूर्यदर्शन झाले नाही. पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून रस्ते चिखलमय झाल्याने आठवडा बाजारही तुरळक भरला. बाजार तळालगत शेतकऱ्यांना भाजीपाला विक्रीसाठी बसावे लागले. रस्त्यावर चिखल झाल्याने वाहनांना अडचणीचा सामना करावा लागला. अनेक मोटरसायकलस्वार घसरून पडले. शासकीय कामासाठी खोदून ठेवलेले रस्ते न बुजवल्याने खड्डे पडले आहेत. रस्त्याची दुर्दशा झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. खरीप पिकासाठी हा पाऊस जीवदान ठरला आहे. खरीप हंगामातील मका, सोयाबीन, तूर, बाजरी सध्या फुलोऱ्यात असून त्यांना पाण्याची गरज होती. या पावसाने शेतीमध्ये तण मोठ्या प्रमाणात वाढले असून रोगराईचे प्रमाण वाढले आहे. तालुक्यातील ओढे, नाले वाहू लागले आहेत.

### पिलीव परीसरात दोन दिवसांपासून पावसाची संततधार

**पिलीव, दि. १९ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात गेल्या दोन दिवसापासून पावसाची संततधार सुरु आहे. पिलीव परीसरात गेल्या दोन दिवसांपासून सुर्यदर्शनही नाही. यामुळे मात्र जनजिवन पुर्णपणे विस्कळीत झाले आहे. पिलीव परीसरातील रस्ते यामुळे चिखलमय झाले आहे. रस्त्यात चिखल की चिखलात रस्ता अशी अवस्था पिलीव परीसरातील अनेक गावात झाली आहे. जरी या भागात पावसाची दोन दिवसापासून संततधार सुरु असली तरी या भागात जोरदार पावसाची अपेक्षा आहे. मे महीन्यात पडलेल्या पावसानंतर या भागात अद्यापही जोरदार पाऊस झालाच नाही. अश्या संततधार पावसामुळे ओढे ,नाले ,तलाव ,बंधारे कधी भरणार यासाठी जोरदार पाऊस अपेक्षीत आहे. मात्र या पावसामुळे दुषकाळी पटटयातील सुळेवाडी, बचेरी ,शिंगोर्णी या भागातील पिकांना मात्र जिवदान मिळाले आहे. सध्या या भागात बाजरी ,मका व इतर पिके जोमदार आहेत. तशीच ही पिके महीनाभरात कापणीला येतील अशी परिस्थिती आहे.

## निधन वृत्त...

### बाळकृष्ण जगताप



**बार्शी, दि. १९ ऑगस्ट-**

सावळे गल्ली येथील बाळकृष्ण (राजाभाऊ) भगवंतराव जगताप (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने शनिवारी दि. १६ ऑगस्ट रोजी रात्री निधन झाले. त्यांच्यावर रविवारी मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### मथुराबाई गाडे



**पंढरपूर, दि. १९ ऑगस्ट -**

अजनसोंड (ता. पंढरपूर) येथील मथुराबाई शिवाजी गाडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्या मेजर जयद्रथ मच्छिंद्र बंगाळे यांच्या आत्या होत्या.

### सुरेश ठक्कर



**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

चंडक बगीचा येथील रहिवासी सुरेश अमरसी ठक्कर (वय ७५) यांचे मंगळवार १९ ऑगस्ट रोजी दुपारी ३च्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, सुना, एक विवाहीत मुलगी, जावई, नातू सह चार भाऊ , वाहिनी असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा बुधवार २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले आहे.

# पंढरपूर नगरपरिषद निवडणुक; १८ प्रभाग रचना जाहीर

### सूचना व हरकतींसाठी १५ दिवसांची मुदत


**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ ऑगस्ट -**

पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने आगामी नगरपालिका निवडणूकीसाठी शहरातील प्रारुप प्रभागांची रचना सोमवारी (ता.१८) जाहीर झालेली आहे. या प्रभाग रचने नुसार नगरपालिका निवडणूकीसाठी एकुण १८ प्रभाग असून प्रत्येक प्रभागा मध्ये दोन सदस्य असे एकुण ३६ सदस्य असणार आहेत. दरम्यान यावर नागरिकांच्या हरकती किंवा सूचना मागविण्यासाठी १५ दिवसांची मुदत देखील देण्यात आली आहे. त्यानंतर आलेल्या हरकती आणि सुचनांवर सुनावणी होवून अंतिम प्रभाग रचना तयार होवून त्यानुसार पालिका निवडणूक घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे येत्या पंधरा दिवसां मध्ये नागरिकांकडून काय हरकती किंवा सूचनां येतात याकडे सर्वांचे आता लक्ष लागले आहे. दरम्यान प्रभाग क्रमांक, त्या प्रभागा मध्ये समाविष्ट शहरातील भागाचे नाव तसेच चौकटी मध्ये प्रभागातील लोकसंख्या, अनु.जाती आणि अनु.जमातींची संख्या पुढील प्रमाणे दिलेली आहे.

**प्रभाग १ :** यामध्ये अनिलनगर, भगवती देवी मंदिर, कैकाडी महाराज मठ, नामानंद झोपडपट्टी, कडबे गल्ली, जुनी वडार गल्ली, कुंभार गल्ली, शिंदेनाईक नगर या भागाचा समावेश करण्यात आला आहे.
**लोकसंख्या एकूण - ५,०७३,**
**अ.जाती - २३१, अ.जमाती - ८२**

**प्रभाग २ :** दाळे गल्ली, डोंबे गल्ली परिसर, कोर्टसमोरील लोकमान्य विद्यालय, डोंबे पुतळा, वाघूले बिल्डिंग परिसर, दाळे गल्ली तालिम
**एकूण लोकसंख्या - ५,०४६,**
**अ.जाती- ११७, अ.जमाती - १८५.**

**प्रभाग 3 :** अनिलनगर, संसर्गजन्य रुग्णालय, उपजिल्हा रूग्णालाय, व्यास नारायण झोपडपट्टी, काशीकापडी गल्ली
**एकूण लोकसंख्या - ५,५३९,**
**अ.जाती - ४१२, अ.जमाती - ५८९**



**प्रभाग ४ :** १९७ ब, मेहतर कॉलनी, अंबाबाई पटांगण, अंबाबाई झोपडपट्टी, रामटेकडी समोरील झोपडपट्टी, लखुबाई झोपडपट्टी, थोरात चौक परिसर, गुर्जर वाडा, कोळ्याचा मारुती परिसर.
**एकूण लोकसंख्या - ५,४४३,**
**अ.जाती - १,०६५ , अ.जमाती - १,८७६**

**प्रभाग ५ :** अरुण टाकीज परिसर, मसादेवी पिछाडी, आपटे शाळा, तांबडा मारुती,हरिदासवेस परीसर, कवठेकर गल्ली, विठ्ठल मंदिर सात मजली पिछाडी, दत्त घाट, कुंभार घाट परिसर, महाद्वार घाट, कासार घाट
**एकूण लोकसंख्या - ५,११६,**
**अ.जाती - १७६ , अ.जमाती - २९९**

**प्रभाग ६ :** चंद्रभागा घाट परिसर, धोंडोपंत दादा मठ, सारडा भवन परिसर, विप्रदत्त घाट परिसर, कालिका देवी चौक, रोहिदास चौक, विठ्ठल नगर झोपडपट्टी, आंबेडकर नगर झोपडपट्टी, इंदिरा कुष्ठ रोगी वसाहत, कर्नाटक मठ.
**एकूण लोकसंख्या - ५,६७६,**
**अ.जाती - २,१२०, अ.जमाती - ५६**

**प्रभाग ७ :** इंदिरा गांधी भाजी मंडई, विठ्ठल रुक्मिणी मंदिर उत्तर बाजू परिसर, दगडी पाण्याचा हौद , तानाजी चौक, संभाजी चौक परिसर, उमदी पटांगण, काळा मारुती, शाळा नंबर ६ परिसर.
**एकूण लोकसंख्या - ५९१५,**
**अ.जाती - १०२, अ.जमाती - ४१.**

**प्रभाग ८ :** सोमाणी व बोहरी पेट्रोलपंप परिसर, शामियाना हॉटेल पिछाडी, जिजामाता उद्यान परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, लोणारगल्ली, सनगर गल्ली,न्यु अकबर टॉकीज परिसर, कबाडे वाडा, कटेकर डेअरी परिसर, चौफाळा ते पश्चिमव्दार, श्यामसुंदर दुकान ते विठ्ठल मंदिर.
**एकूण लोकसंख्या - ५,०१९,**
**अ.जाती - ६७२, अ.जमाती - ६७.**

**प्रभाग ९ :** सेंट्रल नाका परिसर, नवीपेठ भाजी मार्केट परिसर, कोंबडेगल्ली परिसर, खवाबाजार परिसर, जुनीपेठ मटन मार्केट परिसर, कोळेगल्ली, संत ज्ञानेश्वर मंडप परिसर, चिंचबन तालीम, जयभवानी चौक परिसर, बुरुड गल्ली परिसर.
**एकूण लोकसंख्या - ५,०६७,**
**अ.जाती- ३८१, अ.जमाती - ८५५**

**प्रभाग १० :** फत्तेपूरकर नगर परिसर, अकबर अली नगर परिसर, वीर सागरनगर, द.ह.कवठेकर प्रशाला परिसर, डीव्हीपी मॉल पिछाडी, सरगम टॉकीज पिछाडी, भोसले आँईस फॅक्टरी परिसर, ज्ञानेश्वर नगर , महावीर नगर जैन मंदिर, ऐश्वर्या हॉटेल पिछाडी.
**एकूण लोकसंख्या - ५,९८७,**
**अ.जाती- ७३६, अ.जमाती - ११९.**

**प्रभाग ११ :** साबळे नगर, वाल्मीकी नगर, स्वामी समर्थ नगर, पुनर्वसन गावठाण, इसबावी गावठाण, अक्षत बंगलोज, शिवकिर्ती नगर, विठ्ठल हॉस्पीटल परिसर.
**एकूण लोकसंख्या - ५,५८५,**
**अ.जाती - ९३६, अ.जमाती - ४०३.**

**प्रभाग १२ :** विठ्ठल मंदिर विसावा परिसर, वैभव आँईल मिल परिसर, उमानगर परिसर, वांगीकर नगर परिसर, दूधडेअरी पिछाडी, कंडरेज जीम पिछाडी, समता नगर, देशमुख पंप परिसर, शासकीय वसाहत परिसर, गोकूळ नगर.
**एकूण लोकसंख्या - ५,८४४,**
**अ.जाती- ३९७, अ.जमाती - १५३.**

**प्रभाग 13 :** पंतनगर, एकतानगर, हरिहर रेसिडन्सी, प्रशांत परिचारक नगर, गेंडवस्ती, जिजाऊनगर, वसंतनगर, नागालँड हॉटेल पिछाडी, कर्मयोगी शाळा, जलशुध्दीकरण केंद्र , विठ्ठल नगर, शहापूर हॉस्पीटल परिसर, भीमा पाटबंधारे वसाहत.
**एकूण लोकसंख्या - ५,९७१,**
**अ.जाती- ५१५, अ.जमाती - २५३.**

**प्रभाग १४ :** डॉ.टकले दवाखाना परिसर, लाईफलाईन हॉस्पीटल परिसर, गाताडे प्लॉट परिसर, तालुका पोलिस स्टेशन परिसर,
**एकूण लोकसंख्या - ५,३५७,**
**अ.जाती- ८७३, अ.जमाती - ९७.**

**प्रभाग १५ :** फत्तेपूरकर घर परिसर, माळीवस्ती, ओंकार नगर, वृंदावननगर, परदेशीनगर, गणेशनगर, रेल्वेस्टेशन परिसर, पद्मावती झोपडपट्टी, विस्थापित नगर.
**एकूण लोकसंख्या - ५,४४१,**
**अ.जाती- ३६४, अ.जमाती- ६७.**

**प्रभाग १६ :** तनपुरे महाराज मठ परिसर, जनकल्याण हॉस्पीटल परिसर, बडवेचर झोपडपट्टी, घनश्याम सोसायटी, खादीग्रामोद्योग परिसर, संत गजानन महाराज मठ परिसर, संतपेठ सावता माळी पिछाडी, लक्ष्मीनगर झोपडपट्टी.
**एकूण लोकसंख्या - ५,५२५,**
**अ.जाती - ७७४, अ.जमाती - ८६.**

**प्रभाग १७ :** महात्मा फुले पुतळा, गुजराथी कॉलनी, जगदंबा वसाहत, ढोरगल्ली परिसर, ककय्या समाज मठ, शाळा नं. ७ पिछाडी, सुडके गल्ली, सातपुते दवाखाना परिसर, ओतारी गल्ली परिसर, महापूर चाळ, बडवेचर झोपडपट्टी काही भाग.
**एकूण लोकसंख्या - ५,७५७,**
**अ.जाती- १७९८, अ.जमाती - २७.**

**प्रभाग १८ :** यमाईतलाव परिसर, उंच विठोबा पिछाडी, भगवान नगर, बागवान मेहल्ला परिसर, रमाईनगर झोपडपट्टी, डोकेमळा, सांगोलानाका, गुरुदेव नगर, देवकते मळा, बनसोडे मळा, एम.एस.ई.बी. पिछाडी, आय.टी.आय. कॉलेज परिसर.
**एकूण लोकसंख्या - ५,५५४,**
**अ.जाती-५४२, अ.जमाती- १५५.**

# गणेशोत्सवानिमित्त बार्शीत शांतता कमिटीची बैठक



### नियमांचे पालन करण्यासाठी मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, १९ ऑगस्ट-**

बार्शी शहरात यंदाचा गणेशोत्सव शांतता, सुसंवाद आणि सुरक्षिततेने साजरा व्हावा यासाठी , सोमवारी सायंकाळी यशवंतराव चव्हाण सभागृहात बार्शी शहर पोलीस आणि सोलापूर ग्रामीण पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने शांतता कमिटीची महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत गणेश मंडळांना उत्सवाच्या नियोजनासाठी आणि नियमांचे पालन करण्यासाठी प्रशासनाकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीला बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, उपविभागीय अधिकारी अशोक सायकर, तहसीलदार एफ. आर. शेख, नगरपालिकेचे अधिकारी, महावितरणचे प्रतिनिधी, शांतता कमिटीचे सदस्य, गणेश मंडळांचे अध्यक्ष, मूर्तिकार, बँड पथकांचे प्रतिनिधी, तसेच डीजे आणि ध्वनिक्षेपक मालक उपस्थित होते. पोलीस निरीक्षक कुकडे यांनी गणेश मंडळांना ध्वनिप्रदूषण टाळणे, मिरवणुकीसाठी ठरलेल्या मार्गांचे पालन करणे आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करण्याचे आवाहन केले. उपविभागीय अधिकारी सायकर यांनी वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षिततेवर भर देत मंडळांनी स्वयंसेवक नियुक्त करण्याचे निर्देश दिले. तहसीलदार शेख यांनी पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देत विसर्जन प्रक्रियेत प्रशासनाशी समन्वय ठेवण्याचे सांगितले. गणेशोत्सव कालावधीत बार्शी शहरात कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

मिरवणूक मार्ग, विसर्जन स्थळे आणि गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष दिले जाणार आहे. शहरात सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनद्वारे निगराणी ठेवली जाईल. आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवली जाणार आहेत. नगरपालिकेने स्वच्छता आणि महावितरणने अखंडित वीजपुरवठ्याची हमी दिली आहे. प्रशासनाने गणेश मंडळांना पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर, सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिप्रदूषण मार्गदर्शक सूचनांचे पालन आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मिरवणूक मार्गांचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश दिले. विसर्जन प्रक्रियेत पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहनही करण्यात आले. यामुळे उत्सव शांततेने आणि पर्यावरण स्नेही पद्धतीने साजरा होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला.



### लक्ष्मी ऑटोमोबाईल्स येथे Hero HF Deluxe Pro या नव्या बाईकचे लाँचिंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

या सोहळ्याचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच लक्ष्मी ऑटोमोबाईल्सचे संचालक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. याप्रसंगी अनेक मान्यवर, ग्राहक व वाहनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन हिरो एच एफ डिलक्स प्रो ही बाईक ग्राहकांच्या दैनंदिन गरजांना अनुसरून तयार करण्यात आली आहे. अधिक आकर्षक डिझाईन, दमदार मायलेज, प्रगत तंत्रज्ञान व आरामदायी राइडिंग अनुभव ही या बाईकची वैशिष्ट्ये आहेत. कमी खर्चात उत्कृष्ट प्रवासाचा अनुभव देणारी हीरोची ही नवी बाईक लाँचिंगच्या पहिल्याच दिवशी सोलापूरकरांच्या पसंतीस उतरली आहे. या प्रसंगी बोलताना दीपक पाटील म्हणाले की, लक्ष्मी ऑटोमोबाईल्स नेहमीच ग्राहक समाधानाला प्राधान्य देत आले आहे.हिरो एच एफ डिलक्स प्रो , हीरोची विश्वासार्हता आणि दर्जा यांचा उत्तम संगम आहे. ही बाईक सोलापूरकरांच्या रोजच्या प्रवासाला अधिक सोयीस्कर आणि किफायतशीर बनवेल. गेल्या ४० वर्षा पासून लक्ष्मी ऑटोमोबाईल्स, सोलापूर हे शहरातील विश्वासार्ह डीलरशिप असून विक्री, सेवा व ग्राहकसंतुष्टी यामध्ये त्यांनी नेहमीच आपले वेगळेपण जपले आहे. नवीन हिरो एच एफ डिलक्स प्रो आता लक्ष्मी ऑटोमोबाईल्स, येथे विक्रीसाठी उपलब्ध असून ग्राहकांनी गाडी बुक करावी, असे आवाहन करण्यात आले.

# बलात्कार, अॅट्रॉसिटी, पोक्सोप्रकरणी एकास जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ ऑगस्ट-**

दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी बार्शी तालुका पोलीस स्टेशन येथे पिडीतेच्या चुलत बहिणीने दिलेल्या तक्रारीवरुन बार्शी तालुका पोलीस स्टेशन येथे दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेला होता. यातील फिर्यादीचे म्हणणे असे की, फेब्रुवारी २०२४ ते जानेवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्या दरम्यान माझी चुलत बहिण निर्भया ही अल्पवयीन असल्याचे माहीत असताना तिच्या सोबत आरोपी नं. १ याने त्याच्याच राहत्या घरी कोणी नसताना जबरदस्ती करुन तिच्यासोबत वेळोवेळी शारिरीक संबंध केले असून त्याबद्दल कोणाला सांगितले तर जिवे मारीन अशी धमकी दिली होती. सदर आरोपी नं. १ याने केलेल्या कृत्याला या गुन्हयामधील आरोपी नं. २ हिने प्रोत्साहन दिले म्हणून वगैरे बाबतचा बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला होता. सदर दोन्ही आरोपीविरुध्द अनुसुचित जातीच्या अल्पवयीन मुलींवरवेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्याचे आरोपावरुन गुन्हा दाखल झालेला होता. सदर आरोपीच्यावतीने बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांच्या कोर्टात अॅड. योगीराज पुरवंत यांनी दाखल केलेल्या जामीन अर्जावर युक्तिवाद करताना, पिडीत अनुसुचित जातीची असली तरी पिडीता ही केवळ अनुसुचित जातीची आहे या उद्देशाने गुन्हा घडला नसल्याने अॅट्रॉसिटीचे कलम लागु होत नाही. त्याचप्रमाणे पिडीतेच्या वैद्यकीय अहवालातील जखमा या बलात्काराशिवाय इतरही कारणांमुळे शक्य असल्याने त्या बलात्कारामुळेच घडले असे निश्चीतपणे सांगता येणार नाही, असे सांगितले. सदर प्रकरणी आरोपींच्या वकिलांचा व सरकारी वकिलांचा दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकुन मे. कोर्टाने आरोपी क्रं. २ यांना जामीन मंजुर केला. सदर प्रकरणी आरोपीच्यावतीने अॅड. योगीराज ब. पुरवंत, अॅड. गणेश अंधारे, अॅड. सुदर्शन सोनवणे, अॅड. जयश्री व्ही. व्हरे, संकेत पवार यांनी काम पाहिले.



# एका महिन्यात खरसोळीतील पाच व्यक्तींना सर्पदंश; एकाचा मृत्यू

### वाढत्या घटनांमुळे खरसोळीत चिंतेचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. १९ ऑगस्ट-**

पंढरपूर तालुक्यातील खरसोळी येथील महिन्यात पाच व्यक्तीना सर्पदंश झाला आहे. आनंद सौदागर असबे वय ३५ वर्ष असे सर्पदंशाने मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. आनंदा असबे शेतमजूर म्हणून काम करत होते. रविवारी १० ऑगस्ट रोजी ११ वाजता फवारणीचे काम करून शेतातून घरी येत असताना सामाजिक वनीकरणाजवळ रस्त्याच्या कडेला लघुशंकेसाठी उभे असता त्यांच्या पायाला घोणस जातीच्या विषारी सापाने जावा घेतला. आनंदा असबे यांना उपचारासाठी पंढरपूर येथील जिल्हा उपरुग्णालयात दाखल करण्यात आले होते.



त्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी सोलापूर येथील सिव्हिल रुग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. तीन दिवसाच्या उपचारादरम्यान बुधवारी १३ ऑगस्ट रोजी आनंदा असबे यांचा मृत्यू झाला असल्याचे त्यांचे भाऊ संतोष असबे यांनी सांगीतले आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी व भाऊ असा परिवार आहे.

त्याचबरोबर शेतात कामानिमित्त गेले असताना उदय पवार ३८, शरद भोसले ४०, दीपक गायकवाड ३० यांना सर्पदंश झाल्याने त्यांच्यावर वेळेत रुग्णालयात उपचार मिळाल्याने बरे झाले आहेत. सागर कसबे वय ३४ या युवकाला सर्पदंश झाला असून त्यांच्यावर पंढरपूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**वेळेत रुग्णालयात दाखल करावे**

सापाच्या अनेक जाती आहेत मात्र पिलांना जन्म देणाऱ्या घोणस व मण्यार या दोन प्रमुख जाती आहेत. घोणस हा साप एका वेळेस ३३ ते ३४ पिलांना जन्म देतो त्यामुळे घोणस जातीच्या सापाचे प्रमाणात वाढ होत आहे. घोणस जातीच्या सापाची कातडी जाड असल्यामुळे तो उसाच्या शेतात राहतो. सध्या पावसाचे दिवस असल्यामुळे बिळात पाणी साचल्यामुळे निवाऱ्यासाठी दगडाखाली व इतर ठिकाणी साप बाहेर पडतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी संध्याकाळच्या वेळी शेतात जाताना हातात बॅटरी, पायात गुडघ्यापर्यंत बूट वापरावे व हाताने काम करत असताना पुढे निरीक्षण करून शेतातील कामे करावे. त्याचबरोबर सर्पदंश झाल्यानंतर भीती न बाळगता वेळेत रुग्णालयात दाखल करावे. **-नानासाहेब साळुंखे, सर्परक्षक फुलचिंचोली.**

खरसोळी गावाच्या शेजारी सामाजिक वनीकरणाचे मोठे क्षेत्र असल्यामुळे वनीकरणांमध्ये गवत, झाडे असून वनीकरणात सापाना राहण्यासाठी पोषक असे वातावरण असल्यामुळे व त्याचबरोबर आसपासच्या गावातील नागरिक सर्प पकडून आणून वनीकरणात सोडल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सापाची संख्या झाली आहे. त्याचबरोबर वनीकरणा शेजारी शेती असल्यामुळे साप शेतात दिसू लागले आहे. शेतात कामानिमित्त गेल्यानंतर नजरचुकीने सापाला धक्का लागल्यास सर्पदंश करतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी व नागरिकांनी शेतात गेल्यानंतर योग्य ती काळजी घेऊन शेतातील कामे करावी असे आवाहन सरपंच प्रज्ञा कसबे यांनी केले आहे.

## महत्वाचे...



### ए.जी. पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बनवले विंड टनेल

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

ए. जी. पाटील इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी एक अभिनव व कमी खर्चिक कॉम्पॅक्ट विंड टनेल विकसित केली आहे. वाहनांच्या एअरडायनॅमिक चाचणीसाठी ही यंत्रणा वापरता येणार असून, ही संपूर्ण प्रणाली arduino आधारित सेन्सर्सच्या मदतीने कार्य करते. विनय व्हनकोरे, सिद्राम क्यार, अजय जाधव आणि राहुल कुंभार या विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी तयार केलेल्या या यंत्रणेचा उपयोग वाहनांच्या ड्रॅग फोर्स आणि Coefficient of Drag (Cd) यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या मापदंडांची मोजणी करण्यात होतो. या प्रणालीमधून वाहनाच्या मॉडेलवर पडणाऱ्या हवेच्या दबावामुळे तयार होणारा ड्रॅग फोर्स अचूक मोजता येतो. याशिवाय, विद्यार्थ्यांनी सेन्सर कॅलिब्रेशन, डेटा निरीक्षण व प्रकाश झोताच्या साहाय्याने हवेचा प्रवाह कसा होतो याचे थेट निरीक्षण शक्य केले आहे. प्रा. एस. ए. देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प पूर्ण केला असून, विभागप्रमुख डॉ. एस. बी. गडवाल आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले. विभागप्रमुख डॉ. एस.बी. गदवाल, प्राचार्य डॉ.व्ही. व्ही. पोतदार, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम.ए. चौगुले, संस्थेचे ट्रस्टी एस. एस. पाटील व संस्थेचे अध्यक्ष एस.ए. पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले.



### पापरी शाळेचे काम पूर्णत्वाकडे सीईओ कुलदीप जंगम यांच्याकडून पाहणी

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

मोहोळ तालुक्यातील पापरी येथे दोन कोटी रूपये खर्चून सुरू असलेले १२ वर्ग खोल्याचे काम पुर्णत्वास येत आहे. समग्र शिक्षा अभियानातील वर्ग खोल्यांची पाहणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केली. या प्रसंगी समग्र शिक्षा अभियानचे कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, मुख्याध्यापक आबा टेकाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, उपाध्यक्ष नितीन भोसले, शिक्षण प्रेमी पद्माकर भोसले, माजी सरपंच सौदागर खडके उपस्थित होते. मोहोळ तालुक्यातील पापरी येथे जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियानातून १२ शाळा खोल्यांचे बांधकाम सुरू आहे. जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार घेतल्या नंतर सिईओ कुलदीप जंगम यांनी या शाळेच्या पायाभरणीची पाहणी केली होती. ते काम आज पुर्णत्वाकडे जात असलेले पाहून सिईओंनी समाधान व्यक्त केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची कामे वेळेत पुर्ण करा. अशा सुचना सिईओ कुलदीप जंगम यांनी ठेकेदार व मुख्याध्यापक यांना दिल्या. कामा बरोबर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे देखील लक्ष द्या अशा सूचना सिईओंनी केल्या.

### मोबाईलच्या हट्टासाठी मुलाने प्राशन केले विषारी औषध

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

मोबाईलचा हट्ट आता जीवघेणा होत चालला आहे. मोबाईल घेऊन दे म्हणून सोळा वर्षाच्या मुलाने विषारी औषध प्राशन केल्याची घटना घडली. हा प्रकार तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथे घडली. वैभव गोविंद राठोड (वय १६) असे मुलाचे नाव आहे. अणदूर शिवारात वैभवच्या मामाचे शेत आहे. रविवारी तो तेथे गेला होता. तेथे असताना त्याने त्याला मोबाईल घेऊन देण्याचा हट्ट केला. त्याच रागाच्या भरात त्याने सोयाबीनला मारायचे औषध प्राशन केले. नळदुर्ग येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून गणपती पवार यांनी सोमवारी रात्री ११.१० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### विजापूर वेसेत बघण्यातून तरुणांना बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

विजापूर वेस येथील हॉटेलात चहा पिताना बघण्याच्या कारणावरून दोघांना बेदम मारहाण करण्यात आली. ही मारहाण मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास झाली. मोहम्मद अली मदिनसाब लोकापल्ली (वय ३४) व खाजा मदिनसाब लोकापल्ली (वय ३१, दोघे रा. बाराईमाम चौक, सोलापूर) अशी मारहाण झालेल्याची नावे आहेत. मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास यातील जखमी हे विजापूर वेसेतील हॉटेलवर चहा पित होते. त्यावेळी उमर बेंद्रे व जखमी यांनी एकमेकांना पाहिले. त्यावेळी काय बघतो आम्हाला असे म्हणून उमर बेंद्रे व इतर तीन जणांनी लोखंडी रॉडने मारले. यात मोहम्मद अलीच्या डोक्याला जखम झाली आहे तर खाजाच्या सर्वांगास मुकामार लागला आहे. सकाळी ११.४० वाजता ते दोघे स्वत; शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# स्वस्तातील वाहनांची भुरळ

## दोघांची अकरा लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**




फायनान्स कंपनीने जप्त केलेल्या चारचाकी गाड्या कमी किमतीत घेऊन देण्याच्या आमिषाने दोघा तरुणांची दहा लाख ८५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी गोंदिया जिल्ह्यातील एकाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार जून ते जुलै २०२५ या काळात घडला.

याबाबत अक्षय संजय गायकवाड (वय ३१, रा. शहा नगर, वांगी रोड, सोलापूर) याने दिलेल्या तक्रारीवरून कुणाल मुरलीधर बडोले ( रा. सौदंड जि गोंदिया) विरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी हा वंसत विहार परिसरातील स्वराज्य नगरात भाडयाने राहण्यास होता. तेथे फिर्यादी आणि त्याच्या मित्र मयूर म्हेत्रेची त्याच्याबरोबर ओळख झाली. आरोपीने तो श्रीराम फायनान्स कंपनीत कामाला असल्याचे सांगितले. तसेच कंपनीने जप्त केलेल्या गाड्या या हैद्राबाद तसेच निजामाबाद येथील कार्यालयात जमा आहेत. त्या गाड्याचा आरटीओ नोंदणी नंबर सांगून त्याने त्या स्वस्तात घेऊन देण्याचे आमिष तरुणांना दाखविले. मात्र त्यासाठी आगाऊ रक्कम द्यावी लागेल अशी अट घातली. पैसे दिल्यानंतर तुम्हाला त्या गाड्या पाहता येतील असेही आरोपीने फिर्यादी आणि त्याचा मित्र म्हेत्रे यांना सांगितले होते. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने सहा लाख ९० हजार तर म्हेत्रे याने तीन लाख ९५ हजार असे एकून दहा लाख ८५ हजार इतकी रक्कम आरोपीला युपीआव्दारे दिले. परंतु आरोपीने गाड्या न देता तरुणांच्या फसवणूक केल्याचे लक्षात आले. त्यांनी पोलिसात त्याच्याविरूध्द गुनहा दाखल केला असून तपास सपोनि पाटील करत आहेत.

# नूमवि शाळेत श्रावण सोहळा व हरित दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**



नू. म. वि. मराठी शाळेत श्रावण सणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे म्हणून श्रावण सोहळा व हरित दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्या सौ. आशा गोचडे मॅडम (श्री. डान्स क्लासेसच्या संचालिका) व प्रभारी मुख्याध्यापिका सौ. स्मिता माळवदकर मॅडम यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने झाली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. नर्मदा कनकी मॅडम यांनी करून दिला. तसेच प्रभारी मुख्याध्यापिका सौ .स्मिता माळवदकर मॅडम यांच्या हस्ते भेट वस्तू देऊन पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या प्रास्ताविकेतून प्रभारी मुख्याध्यापिका सौ. स्मिता माळवदकर मॅडम यांनी श्रावण सोहळ्याचे अध्यात्मिक व धार्मिक महत्त्व कथन केले. तसेच श्रावण महिन्यात निसर्गाची हिरवळ पाहून हरित दिन ही साजरा करत आहोत असे सांगून झाडे लावण्याच्या सूचना दिल्या. यानंतर इ. ४थी इ च्या विद्यार्थीनीनी हासरा नाचरा... श्रावण आला हे गीत, इ. १ ली अ च्या विद्यार्थीनीनी चला वारुळाला जाऊ या हे कन्नड गीत, इ. २ री उ च्या विद्यार्थ्यांनी जन्माचे बंधन हे रक्षाबंधनाचे गीत तर इ. ३ री उ च्या विद्यार्थ्यांनी गोविंदा आला रे आला हे दहीहंडीचे गीत असे श्रावणातल्या सणावर आधारीत विविध नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. या विद्यार्थ्यांना सौ. आळसंदे मॅडम, सौ. बिज्जरगी मॅडम, सौ. म्हेत्रे मॅडम, सौ. हिरेमठ मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे मातापालिकांचे मंगळागौरीचे विविध खेळ हे होय. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोपांना इ. ३ री आ च्या विद्यार्थ्यांनी बनवलेली राखी बांधून पर्यावरण पूरक रक्षाबंधन साजरे करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून श्रावणाच्या शुभेच्छा दिल्या. सर्व कार्यक्रम पाहून मंत्रमुग्ध झाले आणि बालपणीची आठवण झाली असे सांगितले. असेच सदाबहार कार्यक्रम करत राहण्याच्याही शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कनकी मॅडम यांनी केले तर आभार सौ. आळसंदे मॅडम यांनी मानले. प्रभारी मुख्याध्यापिका सौ. स्मिता माळवदकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.



सोलापूर : सार्वजनिक मध्यवर्ती श्री गणेशोत्सव मंडळाचे नूतन उत्सव अध्यक्ष सोमनाथ मेंडके, कार्याध्यक्ष गौरव जक्कापुरे, प्रसिद्धीप्रमुख शिवानंद येरटे, प्रसाद क्षीरसागर यांनी दै. 'तरुण भारत' कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी अध्यक्ष मेंडके यांनी सांगितजले की, यंदा डॉल्बीला मध्यवर्ती मंडळाचा विरोध असून आम्ही पारंपारिक वाद्यच वाजवतो. डॉल्बीचे दुष्परिणाम पाहता इतर सर्व मंडळांनी डॉल्बीऐवजी पारंपारिक वाद्यांचा वापर करावा.

# दिप्ती वाळुजकर हिचे एमपीएससी परीक्षेमध्ये यश

## पोलीस महासंचालक जिल्हा संवर्ग पदी वर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

दिप्ती दिनेश वाळुजकर हिने एमपीएससी मध्ये यश संपादन केल्याबद्दल श्रीकृष्ण जन्मोत्सव तरुण मंडळ उत्तर कसबा सवार गल्ली, पत्रा तालीमच्या वतीने सत्कार करण्यात आला.

प्रारंभी दिप्ती वाळुजकर हिच्या हस्ते श्रीकृष्णाची महाआरती करण्यात आली. यावेळी माजी नगरसेविका शांताबाई दुधाळ यांच्या हस्ते दिप्ती वाळुजकर हिचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राध्यापिका रोहिणी सुनिल वाईरकर, रेखा फंड, वनिता वाळुजकर, उत्सव अध्यक्ष ओंकार माने, उपाध्यक्ष ओम दुधाळ, आकाश सुरवसे, वैभव देवकते, रमण जाधव, पै.आभिजीत दुधाळ, धनंजय काळे, नितीन सस्ते, कुणाल दुधाळ, रितेश देवकते, विजय पालकृतवार, पवन पाटील, गणेश कदम, अशोक सुरवसे, प्रकाश गायकवाड, सनी दुधाळ



तसेच श्रीकृष्ण जन्मोत्सव महिला भजनी मंडळातील आदि महिला भक्त गण उपस्थित होते.

# आदिला नदी परिसरप्रश्नी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी करावी

## बहुजन विकास आघाडीची आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

बाळे येथील आदिला नदी पात्र आणि नदी सीमा परिसरात नियमबाह्य बांधकाम परवाने, ले-आऊट मंजूरी व तत्सम परवानगी देणारे महानगरपालिकेचे नगर अभियंता कार्यालय आणि सहाय्यक संचालक, नगररचना विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावे, अशी मागणी बहुजन विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रवीण सोनवणे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, धाराशिव जिल्ह्यातील धालोट या गावापासून उगम पावलेल्या आदिला नदीवर ब्रिटिशांनी हिप्परगा तलाव बांधला. त्याच हिप्परगा तलावामधून ४०० क्यूसेस पाण्याचा विसर्ग आदिला नदीमध्ये येतो. आदिला नदी पात्रात नदीच्या सीमेवर अतिक्रमण झाल्याने नदी पात्राचा संकोच होऊन नदी पात्र अरूंद होऊन पाण्याचा प्रवाह वाढल्याने शहरातील रहिवाशी नगरामध्ये लोकांच्या घरांमध्ये उंबरठ्यापर्यंत पाणी शिरून मानवी जीवितास धोका निर्माण झाला आहे. आदिला नदी काठावरील सार्वजनिक व पर्यावरणीय जागा, नैसर्गिक संसाधनांची जागा बेकायदेशीररित्या खाजगी उपयोगात आणली जात आहे. नदीचे प्रदूषण आणि मानवी हस्तक्षेपामुळे आदिला नदीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे आदिला नदीचे संवर्धन आणि पुनरूज्जीवन करणे आवश्यक आहे. आदिला नदीचे मुळ पात्र आणि तिच्या सीमा शोधून त्या निश्चित करण्यात याव्यात.

आदिला नदीचा -हास आणि विलुप्त होण्यापासून बचाव करण्यात यावा. आदिला नदीचा नैसर्गिक प्रवाह मोकळा करणे अत्यावश्यक आहे. जल अधिनियम आणि महाराष्ट्र जल संपत्ती नियमन प्राधिकरण कायद्यान्वये नद्या आणि त्याच्या पाणलोट क्षेत्रात बेकायदेशीर बांधकामे आणि अतिक्रमणे करण्यास मनाई असताना आदिला नदी काठावर बांधकाम परवाने आणि तत्सम परवानग्या देऊन कायद्याचे उल्लंघन केलेले आहे. सोलापूर महानगरपालिकेने आदीला नदी पात्र आणि नदी सीमेवर अतिक्रमण करणारे, लॅण्ड प्लॉटीग करणारे, डेव्हलपर्स, बिल्डर्स यांना नदी पात्राच्या निश्चित सीमा न सोडता बांधकाम परवाने, ले-आऊट मंजूरी व तत्सम परवानगी दिले आहेत.




सोलापूर : शहरात पावसाने रिमझिम हजेरी लावल्यामुळे शाळेचे मैदान चिखलमय झाले त्यातून मार्ग काढताना पालक व विद्यार्थी यांचे टिपलेले छायाचित्र.

# मनोरमा बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

## सभासदांना 10 टक्के लाभांश जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

मनोरमा को ऑप. बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बेन्नूरनगर येथील मुख्य कार्यालयातील म नोरमा भवनात उत्साहात पार पडली.

प्रारंभी ज्येष्ठ सभासद वसंतराव विधाते, चंद्रकांत माने, आदिनाथ सगरे, आर. पी. पाटील, मच्छिंद्र पाटील, माधवराव गव्हाणे, चंद्रकांत माने, श्रीहरी माने, महेंद्र कुलकर्णी, अतुल कुलकर्णी, विश्वासराव मोहिते, विजयकुमार फताटे, विजय शाबादी यांच्या हस्ते दीप्रप्रज्वलन करण्यात आले. सभेच्या सुरुवातीस डॉ. ऋचा मोरे-पाटील यांनी प्रास्ताविक करत सभेला सुरुवात केली. त्यानंतर सीईओ शिल्पा कुलकर्णी-मोहिते यांनी क्रमवार विषय वाचन केले. यावेळी चेअरमन श्रीकांत मोरे यांनी अध्यक्ष स्थान स्वीकारत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सभासद, ठेवीदारांशी संवाद साधत ग्राहकांच्या ठेव सुरक्षेला प्राधान्य हेच मनोरमा बँकेचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन केले. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचे काम मनोरमा बँक करत आहे. अवघ्या ७२ तासातच ५० टक्के कर्जे ही लघु उद्योगाला देण्याचे ठरवण्यात आले आहे.



आरबीआयच्या बँकिंग रेग्युलेशन ॲक्टनुसार कामकाज करणारी आपली बँक असून, आजही मनोरमा बँकेने सलग ७ वर्षे 0% राखले असल्याचे त्यांनी सांगितले. बँकेच्या अहवाल सालातील आर्थिक प्रगतीचा आलेख मांडला. बँकेचे वसूल भागभांडवल १५.८० कोटी असून राखीव व इतर निधी १४.८८ कोटी आहे. ठेवी ६५३.०५ कोटी असून कर्जे ४०६.०८ कोटी आहे. एकूण गुंतवणूक १८९.१९ कोटी असून मिश्र व्यवसाय आजपर्यंत १०६०.00 कोटी झाल्याचे सांगून सभासदांना १०% लाभांश देत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना सम र्पक उत्तरे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी दिली. व्यासपीठावर मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे, व्हा. चेअरमन संतोष सुरवसे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड, संचालक डॉ. सुमित मोरे, डॉ. मिताली मोरे, डॉ. ऋचा मोरे -पाटील , बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड, गणपत कदम, शुभांगी भोसले, सीए मैनुद्दिन नदाफ, सीए ऋषिकेश शहा, सुहास भोसले, विकास सक्री, दत्तात्रय मुळे, प्रशांत शहापूरकर, प्रा. बब्रुवाहन रोंगे, डॉ. सत्यजित वाघचवरे, गजेंद्र साळुंके, डॉ. सत्यवान वाघचवरे, संतोष मोटे, कविता कुलकर्णी, सीईओ शिल्पा कुलकर्णी-मोहिते आदी उपस्थित होते. प्रसंगी सीए ऋषिकेश शहा, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड यांचा सत्कार डॉ. सुमित मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संचालक मंडळासह सभासद, खातेदार, अधिकारी, कर्मचारी, मनोरमा परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. आभार व्हा.चेअरमन संतोष सुरवसे यांनी मानले.

# गणेश मंडळांना महावितरणकडून घरगुती दराने वीजजोडणी

## विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

महावितरणकडून सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपात व त्वरित वीजजोडणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या जोडणीसाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहेत. तरी सार्वजनिक गणेश मंडळांनी अधिकृत वीज जोडणी घ्यावी. भाविक भक्तांच्या सुरक्षेसाठी मंडप, विद्युत रोषणाई व देखाव्यांची उभारणी करताना विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे महावितरणचे आवाहन आहे.

सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपातील वीजजोडणीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेची मंडप परवानगी, पोलिस स्थानकाचा परवाना, विद्युत निरिक्षक यांचे वीजसंच सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र, वीज जोडणी मागणी अर्ज, वीजसंच मांडणीचा चाचणी अहवाल व राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुकाची छायांकित प्रत इ. कागदपत्रे आवश्यक आहेत. गणेश मंडळांनी आवश्यक कागदपत्रासह नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. गणेशोत्सव काळात वीज अपघात होऊ नये यासाठी मंडप, विद्युत रोषणाई व देखाव्यांची उभारणी करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी. लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिन्या, वितरण रोहित्रे इ. विद्युत यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे. मंडपातील वीजसंच मांडणी मान्यताप्राप्त विद्युत कंत्राटदारांकडून करून घेण्यात यावी. आपत्कालीन स्थितीकरिता मंडलस्तरीय नियंत्रण कक्षांचे ७८७५७६८०७४ (बारामती), ९०२९१६८५५४ (सातारा),९०२९१४०४५५ (सोलापूर) तसेच मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्राचे टोल फ्री क्रमांक १८००-२१२-३४३५, १८००-२३३-३४३५, १९१२ हे वीजसेवा विषयक तक्रारी व माहितीसाठी ग्राहकांच्या सेवेत उपलब्ध आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महासिद्ध देवस्थानतर्फे मूर्ती पुनःप्राणप्रतिष्ठापनानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

रेल्वे लाईन, डफरिन चौक येथील श्री महासिद्ध, श्री अमोगसिद्ध तरुण मंडळाच्यावतीने श्री महासिद्ध देवस्थानमधील मूर्तींची पुनःप्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार असून यानिमित्त दि. १९ ऑगस्ट पासून विविध कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे.

हे कार्यक्रम २५ ऑगस्टपर्यंत चालणार आहेत. या देवस्थानमधील श्री अमोगसिध्द आणि श्री महासिध्द गौरादेवी यांच्या मूर्तींची पुनः प्राणप्रतिष्ठापना व भंडारा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री निजगुण सिध्दलिंगय्या वडीयार (एसजीएम, वडीयार मठ, गुरुकुल आश्रम, म्हैसूर, कर्नाटक) आणि प.पू. श्री सोमलिंग महाराज (जैनापुर, शिरवळ, सोलापूर) यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. विविध कार्यक्रमांतर्गत १९ ऑगस्ट रोजी ध्वजारोहन, गुरुप्रार्थना, ग्रामदेवता श्री सिध्देश्वर प्रार्थना, गणपती पूजन, गंगा पूजन, यागसाल प्रवेश, पुण्यावाचन, महा संकल्प, वास्तुशांती होम, राक्षोघ्ना होम, अगोरात्री होम, दिक्पालका होम, पुर्णाहुती, महामंगळारती, तीर्थप्रसाद वाटप आदी कार्यक्रम पार पडले. बुधवार दिनांक दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत वेदपारायण, वैदिक अर्चना, कळस स्थापना, द्रपारायण, विविध होम (महागणपती, नवग्रह, मृत्युंजय, नक्षत्र) तसेच जलाधीवासा, क्षीराधीवासा, पुर्णाहुती, मंगळारती, तीर्थप्रसाद, सायंकाळी ५ पाच ते १० यावेळी रुद्रचर्चा, वस्त्र, पुष्प, फलादिवासा, दुर्गा होम, शिव सहस्रनाम होम, कळस प्रतिष्ठा हे कार्यक्रम होणार आहेत. भक्तगणांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन अशी माहिती ट्रस्ट अध्यक्ष संतोष पुजारी आणि मोहित पुजारी यांनी केले आहे.



### महत्वाचे...

### महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी घाले

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळाचे मार्गदर्शक मळसिध्द मुगळे यांच्या उपस्थितीत नवीन पदाधिकारी निवड करण्यात आली. यावेळी मंडळाच्या अध्यक्षपदी म्हाळाप्पा घाले तर उपाध्यक्षपदी सोमनिंग लच्याणे व दयानंद धनशेट्टी यांची निवड करण्यात आली. सचिव संतोष नंदुरे, खजिनदार विनायक लच्याणे, मिरवणूक प्रमुख मिथुन मुगळे, रवीकुमार कालदे, निंगु ख्याडे, राजू नंदुरे, दयानंद ख्याडे, सिद्धू मुगळे, प्रवीण ख्याडे, गोविंद पाचवे, गेनसिद्ध कुंभारी, शिवराज कालदे, शिवराज मुगळे.



### वृद्धास धडक देणाऱ्या वाहन चालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

रस्ता ओलांडणाऱ्या वृद्धास धडक देऊन गंभीर जखमी केल्याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कनिष्क वसंत तुपारे वय ४१ राहणार न्यू लक्ष्मी चाळ देगाव रोड दमानी नगर सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे वसंत तुपारे वय ७५ असे जखमी चे नाव आहे १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास रिलायन्स मॉल समोरील रस्ता ओलांडून वसंत तुपारे हे घरी येत होते त्यावेळी एका अज्ञात वाहन चालकाने वाहन निष्काळजीपणाने व हाईगाईने चालवून सुपारी यांना जोरदार धडक दिली अपघातानंतर वाहनचालक न थांबता पुढे तसाच निघून गेला म्हणून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत

### योगायोग तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी पवन दोरकर

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

योगायोग बहउद्देशीय तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी पवन दोरकर तर उपाध्यक्षपदी साईराज छत्रबंद यांची निवड करण्यात आली. खजिनदार शुभम गिराम, श्रीकांत खबुले, ज्ञानेश्वर कारभारी. मिरवणूक प्रमुख बन्नी कोळी, रमेश घाटगे, गिरीष मठपती, किशोर छत्रबंद. कार्याध्यक्षपदी नरेश छत्रबंद, दत्ता वाघमोडे, आधारस्तंभ परमेश्वर कारभारी, अनिल छत्रबंद, लेझीम प्रमुख योगेश सलगर, शुभम फाळके यांची निवड करण्यात आली.



### रासायनिक खत विक्रीसाठी बायोमेट्रिक मशीन अनिवार्य

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

डीबीटी प्रकल्पांतर्गत प्रणालीवर नोंदणीकृत अनुदानित रासायनिक खत विक्रेत्यांनी नवीन एल-१ बायोमेट्रिक मशिन बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत कार्यान्वित करणे बंधनकारक असल्याचे आवाहन कृषि विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. केंद्रिय खत विभागाच्या निर्देश नुसारच्या मानकांनुसार अधिक सुरक्षित एल-१ मशिनचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. विद्यमान सुरक्षा प्रमाणपत्र असलेल्या फिंगरप्रिंट स्कॅनरच्या जागी एल-१ प्रमाणित मशिन वापरण्याचे आदेश मुख्य खत पुरवठादार व इतर कंपन्यांना देण्यात आले आहेत. वितरण व कार्यान्वयन कृषि आयुक्तालयाने जिल्हानिहाय विक्रेत्यांची यादी तयार करून उत्पादक कंपन्यांना एल-१ मशिन पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या विक्रेत्यांनी अद्याप नवीन मशिन प्राप्त केलेली नाही, त्यांनी ती तात्काळ घेऊन २० ऑगस्टपूर्वी कार्यान्वित करावी. अन्यथा, जुनी मशिन वापरणाऱ्या विक्रेत्यांना खत खरेदी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी. मशिन मोफत उपलब्ध नवीन एल-१ मशिन खत कंपन्यांकडून मोफत दिली जाणार असून, खत विक्रीची नोंद प्रणालीमध्ये रिअल टाइममध्ये होणे आवश्यक असून, ई-पॉसवरील साठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळल्यास परवाना रद्द करण्याची कारवाई होऊ शकते. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालय किंवा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




# मघा नक्षत्राच्या पावसाचीही दमदार एन्ट्री



- उजनीसह जिल्ह्यातील मोठे, मध्यम प्रकल्पही ओव्हरफ्लो
- आजतागायत २७६ मिलीमीटर पावसाची नोंद
- उत्तर अन् दक्षिणमध्ये सर्वाधिक पाऊस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, १९ ऑगस्ट-**

मुंबई पुण्यासह राज्यातील बहुतांश जिल्ह्यात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे. पश्चिम बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. सोलापुरातही गेल्या आठवड्यापासून पाऊस चालू असल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. आश्लेषानंतर मघा नक्षत्राच्या पावसाचीही जिल्ह्यात दमदार इन्ट्री झाली असून, पावसामुळे उजनी धरणासह जिल्ह्यातील मोठे आणि मध्यम प्रकल्पही ओव्हरफ्लो झाले आहेत.

जिल्ह्यात आजतागायत २७६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, उत्तर आणि दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात सर्वाधीक पाऊस नोंदला गेला आहे. कधी नाही तो यंदा मे महिन्यात अवकाळीचा तब्बल २२० मिलीमीटर इतका पाऊस झाला होता. मे च्या दमदार पावसावरच शेतकरी बांधवांनी खरिपाची पेरणी करून घेतली. पेरणी झाल्यावर पिकांची उगवणही चांगली झाली मात्र पुन्हा जून-जुलैच्या ४ नक्षत्रातील पाऊस अत्यल्पच झाल्याने खरिपातील पिकांनी दुपार धरली होती. यामुळे शेतकरीदादा पुन्हा धास्तावला होता. मात्र ऑगस्ट महिना उजाडल्यावर आश्लेषाच्या पावसाचे पुनरागमन झाले आणि आश्लेषा आणि मघा नक्षत्राच्या पावसाने अक्षरशः जिल्ह्याला झोडपून काढले. जिल्ह्याच्या काही भागातील मंडलात अतिवृष्टी झाल्याने पिकांचे मोठे नुकसानही झाले आहे. यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंचनामे करण्याचे आदेशही दिले आहेत. राज्याच्या काही भागात पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास जातो की काय? अशी भीती जाणकार शेतकरी बोलून दाखवित आहेत. पश्चिम बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यामुळे राज्यात दोन दिवस मुसळधार पाऊस कायम असणार आहे आणि त्यानंतर पावसाचा जोर काहीसा कमी होईल, असा सुद्धा अंदाज यावेळी वर्तवण्यात आलाय. यामुळे सोलापूर जिल्ह्यातही पाऊस असाच कोसळत राहतो की काय? अशीही भीती शेतकरी बांधवांना वाटू लागली आहे.

### सोलापुरात दिवसभर पावसाची रिपरिप

मंगळवार, दि. १९ ऑगस्ट रोजी सोलापूर शहरातही पावसाची रिपरिप दिवसभर चालू होती. यामुळे शहरवासियांचे जनजीवन विस्कळीत झाले. सकाळीच पावसाने सुरूवात केल्याने नोकरदार वर्ग आणि शालेय विद्यार्थ्यांना भिजतच आपली ठिकाणे गाठावी लागली. सायंकाळी ५ च्या सुमारास काही काळ पावसाने उघडीप दिल्याने किमान घरी न भिजता जाता आले. मात्र पुन्हा सायंकाळी पावसाच्या सरीवर सरी पडतच होत्या. या काळात वाहनचालकांचेही हाल झाले. सायंकाळीही पावसाची पुन्हा रिपरिप सुरू झाली आणि रात्री उशिरापर्यंत संततधार सुरूच होती.

### मुख्यमंत्र्यांकडून राज्यभरातील पूरस्थितीचा आढावा

राज्यभरात कोसळणाऱ्या पावसाची माहिती घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपत्ती व्यवस्थापन विभागामध्ये दाखल झाल आणि त्यांनी राज्यभरातील पूरस्थिती आणि पावसाचा आढावा घेतला. पुढील ४८ तास महत्त्वाचे असून, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यातही मुसळधार पाऊस सुरूच आहे. आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये पाऊस मानाची सद्यस्थिती, ऑरेंज आणि रेड अलर्ट जारी केलेल्या ठिकाणांची माहिती घेवून आपत्ती विभागाला सज्ज राहण्याच्या सुचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

### जून ते आजतागायत तालुकानिहाय नोंदलेला पाऊस असा

जून ते आजतागायत उत्तर सोलापूर ४०६.७ मिमी इतका पाऊस नोंदला आहे तर दक्षिण सोलापूर ४४८.१, बार्शी ३३१.९, अक्कलकोट ३८२.४, मोहोळ २७३.६, माढा २५७.१, करमाळा २४७.०, पंढरपूर १९७.०, सांगोला २३४.४, माळशिरस २०५.६, मंगळवेढा २३२.७ असा जिल्हाभरात सरासरी २७६.२ मिमी इतका पाऊस नोंदला गेला आहे. दरम्यान, उत्तर अन् दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला असून, या भागातील ८ मंडलात अतिवृष्टी झाल्याने त्या भागातील नुकसानीचे पंचनामे सुरू झाले आहेत.


### उजनी, वीर धरणातून वाढला विसर्ग

वीर धरण आणि उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पर्जन्यमान वाढल्याने आज दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी वीर धरणातून नीरा नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग वाढला असून, ३३ हजार ४६३ क्यूसेक्स इतका विसर्ग सुरू आहे. उजनी धरणाच्या सांडव्यावरून भीमा नदी पात्रात पूर नियंत्रणासाठी सोडण्यात आलेल्या विसर्गा मध्ये वाढ करून आज दि. १९ रोजी सायंकाळी ५:०० वाजता २५ हजार क्यूसेक्स एवढा विसर्ग सोडण्यात आला आहे. सदर विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदीपात्रात तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. अशा नागरिकांना सूचना देण्यात आल्या असून, सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# सोलापुरात संविधान भवन बांधण्यास
## मंत्री मंगलप्रभात लोढा यांची मंजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यामागील नॉर्थकोट हायस्कूल येथील एक एकर जागेवर संविधान भवन बांधण्यासाठी राज्य सरकारने मंगळवारी मंजुरी दिली. नियमांच्या कचाट्यात अडकलेल्या संविधान भवन उभारणीच्या कामाला परवानगी मिळण्याकरिता पालकमंत्री जयकुमार गोरे यांची शिष्टाई यशस्वी झाली आहे.




विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या मागील बाजूस असणारी महाराष्ट्र राज्य तांत्रिक प्रशाला तथा औद्योगिक शाळा येथील सुमारे एक एकर जागा सोलापूर महानगरपालिकेकडे विनाशुल्क हस्तांतरित करण्यात आली आहे. या जागेवर संविधान भवन बांधण्याचा प्रस्ताव होता. परंतु ही जागा संविधान भवन बांधकामासाठी उपलब्ध करून दिल्यास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अखत्यारीतील इतर जागेची मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि जागा हस्तांतरित केल्यास औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या भविष्यातील विस्तारासाठी स्वमालकीची जागा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे जून २०२३ रोजी च्या शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेऊन कौशल्य विकास विभागाच्या अखत्यारीतील ही जागा संविधान भवनाकरिता देणे उचित होणार नाही, अशी भूमिका प्रशासनाने घेतली होती. तसा शेरादेखील प्रशासनातील संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रस्तावावर मारला होता.

आमदार कोठे यांनी यानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून कौशल्य विकास विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्याकडे या नियमात सूट देऊन संविधान भवन बांधण्याकरिता परवानगी द्यावी, अशी मागणी केली होती. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासनाकडे याबाबत आग्रह धरला होता. शासन निर्णयामधील अनुक्रमांक सहा, सात आणि नऊ हे नियम अटीमध्ये अंशतः बदल करून या नियमांना शिथिल करून त्याच जागेवर संविधान भवन बांधण्यासाठी परवानगी मिळावी, अशी मागणी येथील आमदारांनी केली होती. कौशल्य, विकास, रोजगार व संशोधन मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या सोलापूर दौरा वेळी झालेल्या बैठकीत एक महिन्याच्या आत हा प्रश्न सोडवला जाईल, असे आश्वासन मंत्री श्री. लोढा यांनी दिले होते. यानंतर कौशल्य, विकास, रोजगार व संशोधन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी संविधान भवन बांधकामास मंजुरी देत भीमप्रेमींना दिलासा दिला आहे.



### आनंद चंदनशिवे यांनी मानले मंत्री लोढा यांचे आभार!

सोलापूर शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या मागील एक एकर जागेवर संविधान भवन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संविधान भवन निर्मितीसाठी शासनाने घातलेल्या नियम अटी शिथिल करण्यात पुढाकार घेतला. मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे सर्व समाज बांधव व भीमसैनिकांच्या वतीने राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी आभार मानले आहेत.



**प्रतिबिंब...** सोलापूर : गणेशोत्सवानिमित्त होम मैदानावर ढोल वाजविण्याचा सराव ज्ञानप्रबोधिनीचे विद्यार्थी करीत आहेत. रिमझिम पावसामुळे साचलेल्या पाण्यात ढोल वाजविणाऱ्या वादकांचे उमटलेले प्रतिबिंब. (छायाचित्र : केवल तिवारी)

### शहरासह जुळे सोलापूर भागात रस्ते चिखलमय; वाहतुकीवर परिणाम

**सोलापूर, दि.१९ ऑगस्ट-**

मघा नक्षत्राच्या पावसाने दमदार हजेरी लावल्याने सोलापूर शहरासह जुळे सोलापूर भादॉगातील सर्व रस्ते चिखलमय झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला आहे.

शहर व परिसरात गेल्या १३ दिवसांपासून पावसाची संततधार आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा व सध्या मघा नक्षत्रात पावसाने हजेरी लावली आहे. अनेक रस्त्यावर पाणी साचले आहे. अनेक बोळातील रस्त्यावर चिखल व राडारोडा झाला आहे. जुळे सोलापूर भागातील ओम गर्जना चौकात तर पाण्याचे तळे झाले होते. येथील ड्रेनेजचे झाकण उघडून पाण्याला वाट करून दिल्यानंतर पाण्याच निचरा झाला. असे चित्र शहराता सर्वच रस्त्यावर होते.

# उजनीतून भीमानदीत २५ हजार क्युसेकने विसर्ग
## भीमा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा; दमदार पावसाचा परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१९ ऑगस्ट -**

पुणे जिल्ह्यात पावसाची दमदार हजेरी सुरु आहे. त्यामुळे जिल्ह्याची वरदायनी उजनी धरणातून मंगळवारी दुपारी पाचच्या सुमारास भीमा नदी मध्ये २५ हजार क्युसेक एवढा विसर्ग सोडण्यात येत असल्याची माहिती भीमानगर येथील उजनी धरण व्यवस्थापन विभागाचे कार्यकारी अभियंता स.शि. मुन्नोळी यांनी दिली.

गेल्या दोन दिवसांपासून राज्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडत आहे. पुणे जिल्ह्यात देखील पावसाने दमदार हजेरी लावलेली आहे. पुणे जिल्ह्यातील धरणांमधून देखील मोठ्या प्रमाणावर पाणीसाठा झालेला आहे. त्यामुळे सध्या सुरु असलेल्या दमदार पावसामुळे धरणात येणाऱ्या पावसाच्या पाण्याला सामावुन घेण्यासाठी धरणातून मोठ्या प्रमाणावर नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आलेला आहे. पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्याबरोबरच भीमा नदीच्या खोऱ्यात देखील दमदार पाऊस पडत आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील भीमा नदीवरील असलेल्या धरणांमधून देखील भीमा नदी मध्ये पाणी सोडण्यास सुरुवात झालेली आहे. भीमा नदीतून सोडलेले पाणी येथील उजनी धरणात सामावुन घेण्यासाठी उजनी धरणातून देखील भीमा नदीच्या पात्रामध्ये मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु करण्यात आलेला आहे. उजनी धरणातून मंगळवारी दुपारी १२ वाजता पाच हजार क्युसेस्क इतका विसर्ग सुरु करण्यात आला होता. त्यानंतर दुपारी दोन वाजता त्या मध्ये वाढ करुन तो विसर्ग दहा हजार क्युसेक्स इतका करण्यात आला. दरम्यान मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास हा विसर्ग वाढवून तो १५ हजार क्युसेक्स इतका झाला. सायंकाळी पाचच्या सुमारास त्या मध्ये तब्बल दहा हजार क्युसेक्सची वाढ होवून उजनी धरणातून विसर्ग २५ हजार क्युसेक्स इतका करण्यात आला असल्याची माहिती कार्यकारी अभियंता मुन्नोळी यांनी दिली. त्यामुळे भीमा नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे. दरम्यान उजनी धरणातून सोडलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे पंढरपूर येथील चंद्रभागेच्या पाणी पातळीत देखील वाढ होत आहे. त्यामुळे पंढरपूर शहरातील तसेच भीमा नदीच्या काठावरील गावांमधील नागरिकांना देखील सतर्कता बाळगावी असा इशारा येथील स्थानिक प्रशासनाकडून देण्यात आलेला आहे.

### निरा नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी

या बरोबरच वीर धरण पाणलोट क्षेत्रात पर्जन्यमान वाढल्यामुळे वीर धरणातून देखील मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास नीरा नदीच्या पात्रात सुरु असलेल्या विसर्गात वाढ करुन तो ३३ हजार ४६३ क्युसेक्स इतका करण्यात आला आहे. त्यामुळे निरा नदीच्या दोन्ही तिरावरील नागरिकांनी सतर्कता बाळगावी असा इशारा निरा उजवा कालवा विभाग फलटणचे कार्यकारी अभियंता यांनी दिला आहे.



### आजाराला कंटाळून भांड्याच्या रॅकला वृध्दाचा गळफास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

आजाराला कंटाळून वृध्दाने घरातील भांडी ठेवण्याच्या रॅकला ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार मंगळवारी दुपारी १२.३० वाजता उघडकीस आला. राजेंद्रकुमार अमिचंद मेहता (वय ६४, रा. शाहिर वस्ती, भवानी पेठ) असे वृध्दाचे नाव आहे. राजेंद्र कुमार हे मागील काही दिवसांपासून आजाराने त्रस्त होते.

उपचार घेऊनही त्यात सुधारणा होत नसल्याने ते मानसिक तणावात होते. त्यांनी मंगळवारी दुपारी साडेबाराच्या सुमारास आजाराला कंटाळून घरातील भांडे ठेवण्याच्या रॅकला ओढणीने गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात आली. त्यांनी याबाबत जोडभावी पोलिसांना माहिती दिली. एएसआय शेख यांनी नातेवाईकांच्या मदतीने त्यांना खाली उतरवले. त्यानंतर बेशुध्द अवस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रिक्षा पलटी झाल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

पंढरपूर येथून सोलापूरच्या दिशेने येत असताना, मोहोळ येथील टोल नाक्याजवळ ट्रकचा कट लागून रिक्षा पलटी झाली. यात दोघे जखमी झाले. हे दोघे पंढरपूरातील गोपाळपूर येथील रहिवाशी आहेत. गोपीनाथ राजाराम खोत (वय २२) व विशाल सांडगे (वय १९, रा. गोपाळपूर ता पंढरपूर) अशी जखमींची नावे आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# श्रीकृष्णाला आकर्षित करणारी एकमेव भक्ती होय : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ ऑगस्ट-**

कर्म, ज्ञान व भक्ती या मार्गांमध्ये इतर सर्व मार्ग भक्ताला देवापर्यंत घेऊन जातात; परंतु भक्तीमार्गाचे वैशिष्ट्य असे की, यात स्वतः परमेश्वरच भक्तांकडे प्रेमपूर्वक धावून येतो, असे प्रतिपादन श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावरील निरुपणाच्या २५ व्या सत्रात केले.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - २५

राजा परीक्षिताने शुकाचार्यांना सृष्टीरचनेविषयी प्रश्न विचारला असता, शुकाचार्यांनी त्यास विदुर आणि मैत्रेय यांचा संवाद ऐकण्याचा सल्ला दिला. यावेळी डॉ. जयवंत महाराजांनी श्रोत्यांसमोर विदुर काकांचे भावस्पर्शी चरित्र प्रभावीपणे उलगडले.

श्रीकृष्ण परमात्मा जेव्हा विदुरजींच्या घरी येतात, तेव्हा विदुर काका घरात नसतात; पण काकींना श्रीकृष्णाचे दर्शन होताच त्यांचा देहभाव लयाला जातो. त्या अनवधानानेच अद्भुत भक्तिभावाने श्रीकृष्णाचे स्वागत करतात. चौरंग बसण्यासाठी देतात, पण स्वतःच त्यावर बसतात; केळी द्यायला जातात तेव्हा गाभा स्वतः खातात आणि श्रीकृष्ण परमात्मा मात्र अपार प्रेमाने केळीच्या साली खातात. या प्रसंगात भक्त व भगवान यांच्यातील भेद नाहीसा होतो आणि भक्तीमाधुर्याची अद्वितीय अनुभूती प्रकट होते. डॉ.जयवंत महाराज भक्तीची सहा वैशिष्ट्ये यावेळी सांगतात- १) क्लेशनाशिनी (संसारातील दुःखांचा नाश करणारी), २) शुभदायिनी (कल्याणकारी), ३) सुदुर्लभा (सहज न मिळणारी), ४) मोक्षलघुताकृत (मोक्षालाही तुच्छ मानणारी), ५) आनंदरूपता (स्वतः आनंदस्वरूप असणारी), आणि ६) श्रीकृष्ण-आकर्षिणी (स्वतः भगवंतालाही आकर्षून घेणारी). अशी ही भक्तीच खऱ्या अर्थाने देव-भक्त एकात्म अनुभवाची दारं उघडणारी आहे. 'न हि कृतकृत्या भजतो मुकुन्दम अर्थात ज्याने भगवंताची भक्तिभावाने सेवा केली त्याला इतर कोणतेही प्रयत्न, साधना वा साध्य शिल्लक राहत नाहीत. कारण भक्तीमुळेच सर्व साधने परिपूर्ण होतात. याच भावनेने विदुर काकांनी धृतराष्ट्राला केलेला उपदेश 'विदुरनीती' म्हणून ख्यात झाला. जीवनशास्त्राचे गूढ व मानवधर्माचे सार त्यात प्रकट होते. पुढे विदुरांनी केलेल्या तीर्थयात्रेतील प्रसंग महाराजांनी भावपूर्णपणे उलगडले. विशेषतः, यमुनातटावर उद्धवांशी झालेल्या त्यांच्या संवादाचे चिंतन करताना, भक्तियोगाचे महत्त्व, श्रीकृष्णस्मरणाचे सामर्थ्य व वैराग्याची श्रेष्ठता हे विचार मार्मिक रीतीने उलगडले. अशा प्रकारे, विदुरकाकांचे जीवनचरित्र केवळ चरित्र न राहता भक्तीयोगाचे द्योतक ठरते. भक्तीच्या माधुर्यामुळे श्रीकृष्ण स्वतःहून विदुरांच्या घरी येतात, हा प्रसंग जणू भक्तीच्या अद्वितीय सामर्थ्याचा जिवंत पुरावा आहे. असे मार्मिक चिंतन डॉ जयवंत महाराज आजच्या सत्रात प्रकट करतात.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. २० ऑगस्ट २०२५ | संत सेना महाराज पुण्यतिथी |
| विक्रम संवत् २०८२ | प्रदोष, पर्युषण पर्वारंभ |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वादशी (१३.५८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुनर्वसु (२४.२६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्दी (१८.१३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (२२५.१८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |



# सर्व परिवहन संवर्गातील वाहनांना थकीत ई-चलन सरसकट माफ करा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

वाहतूक शाखेतर्फे झालेल्या कारवाईतून मोठ्या प्रमाणावर सोलापूर शहर व जिल्ह्यात ई-चलन व दंड प्रलंबित आहे. रिक्षा चालक, हलके मालवाहतूक वाहन चालक, तसेच सर्व परिवहन संवर्गातील वाहनधारकांवर यामुळे प्रचंड आर्थिक भार आला आहे. अनेक चालक कर्जबाजारी झाले असून, याच आर्थिक ओझ्यामुळे एका रिक्षा चालकाने आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडलेली आहे. यामुळे सर्व परिवहन संवर्गातील वाहनांना थकीत ई-चलन सरसकट माफ करण्यात यावी अशी मागणी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ शासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यामध्ये सर्व चालकांचे थकीत ई-चलन व दंड सरसकट माफ करावे. यापुढे ई चलन व दंड भरण्यास प्रक्रिया सोपी व ऑनलाइन स्वरूपात ठेवावी. ही सवलत मिळाल्यास हजारो वाहनधारकांना दिलासा मिळेल आणि त्यांच्यावरील मानसिक ताण कमी होण्यास मदत होईल.यावेळी प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद, सचिव प्रदीप शिंगे, सदस्य महबूब शेख आदी उपस्थित होते.

# शिवरंजनी कलागौरव पुरस्काराचे शनिवारी वितरण

## इनामदार आणि साळुंखे यंदाचे मानकरी

## प्रख्यात संगीतकार अवधुत गुप्ते यांची विशेष उपस्थिती



मा.अवधूत गुप्ते | पं.अजितकुमार कडकडे | श्री.अविनाश इनामदार | श्री.विजयदादा साळुंखे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

शिवरंजनी या प्रख्यात वाद्यवृंदाच्या वतीने शिवरंजनी कलागौरव पुरस्कार सांगली येथील सिंथेसाईजर वादक आणि संगीतकार अविनाश इनामदार यांना यंदाचा शिवरंजनी कलागौरव तर सोलापुरातील नाट्य व्यवस्थापक, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखा सोलापूरचे अध्यक्ष विजय साळुंखे यांना शिवरंजनी संगीतसेवा सन्मान पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती शिवरंजनीचे निर्माता समीर जैन (रणदिवे) आणि माधव देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शनिवार दि. २३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६.३० वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. सुप्रसिद्ध गायक, संगीतकार अवधूत गुप्ते यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ गायक पंडित अजितकुमार कडकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. शिवरंजनीच्या १० व्या वर्धापन दिनापासून संगीतक्षेत्रात अत्यंत निस्पृहपणे कार्य करणाऱ्या कलासाधकाला दरवर्षी शिवरंजनी कलागौरव पुरस्कार देऊन गौरव केला जातो. पुरस्काराचं यंदाचं १७ वे वर्ष आहे. २१ हजार रुपये, मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अविनाश इनामदार यांना संगीताचे प्राथमिक धडे त्यांचे गुरू प्रमोद गोखले यांच्याकडून मिळाले तर सुगम संगीताच्या मंचीय कार्यक्रम ाबाबत शरद शहा यांच्याकडून मार्गदर्शन लाभले. गेली ३० वर्षे ते या क्षेत्रात कार्य करत आहेत. शिवरंजनी संगीतसेवा सन्मान पुरस्कार हा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या उपनगरीय शाखेचे अध्यक्ष विजयकुमार साळुंखे यांना प्रदान केला जाणार आहे. ११ हजार रूपये, मानपत्र, शाल श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कार्यक्रमासाठी मोफत प्रवेशिका एस.के. कॉम्प्युटर्स, प्रीती केटरर्स आणि चंदुकाका सराफ ज्वेलर्स येथे उपलब्ध आहेत. या पत्रकार परिषदेस उमेश मोहोळकर , मिलिंद गोरटे, विश्वास शाईवाले आदी उपस्थित होते.

### पंचम स्वर : आर.डी. बर्मन यांच्या गाण्यांची भन्नाट मैफील

संगीतकार आर डी बर्मन यांच्या गाण्यांवर आधारित पंचम स्वर हा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. यात आर डी बर्मन यांच्या कालातीत, चिरंजीव आणि गाजलेली गाणी शिवरंजनीचे कलाकार सादर करतील. या कार्यक्रमाची संकल्पना उमेश मोहोळकर आणि विश्वास शाईवाले यांची असून दिग्दर्शन उन्मेष शहाणे यांचं तर संगीत संयोजन समीर जैन (रणदिवे) यांनी केलं आहे. कार्यक्रमाचं निवेदन माधव देशपांडे यांचं असून व्यवस्थात्मक जबाबदारी नागेश शेंडगे, मिलिंद गोरटे, एस. के. कॉम्पुटर्स परिवार आणि तसेच संपूर्ण शिवरंजनी परिवाराने घेतलेली आहे.



# रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीला सदस्यवाढीबद्दल जिल्हास्तरीय गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटीला अकलूज येथे झालेल्या जिल्हा सदस्यता सेमिनारमध्ये सदस्यवाढीसाठी सन्मान प्रदान करण्यात आला.

यावेळी क्लबचे अध्यक्ष रोटे. अकबर नदाफ, सदस्य रोटे. भारत कदम, रोटे. तौफिक काझी, रोटे. महेश साळुंके तसेच जिल्हा सचिव राजगोपाल तापडिया, वीरेंद्र फुंडीपल्ले व जिल्हा सदस्यता संचालक सीए नितीन कुदळे उपस्थित होते. हा सन्मान सर्व सदस्यांच्या एकत्रित परिश्रमांचे फलित आहे. या यशामुळे आम्हाला पुढील काळात समाजसेवा, मैत्रीभाव आणि नेतृत्व विकासासाठी अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे, असे अध्यक्ष रोट. अकबर नदाफ सांगितले.

# वृद्ध कारखानदाराची आत्महत्या

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी कारखानदारावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

व्याजाने घेतलेल्या पैशापोटी गहाण ठेवलेला टॉवेलचा माल परस्पर विकून आणखी मुद्दलचे पैसे बाकी असल्याचे सांगून नोटीस पाठवून कारखानदारास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी दुसऱ्या कारखानदाराविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

प्रकाश तुळजाराम एक्कलदेवी वय ५७ राहणार शास्त्रीनगर सोलापूर असे आत्महत्या केलेल्या कारखानदाराचे नाव आहे तर युवराज प्रकाश एक्कलदेवी वय २० राहणार शास्त्रीनगर सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीकांत मदनलाल बलदवा राहणार सोलापूर यांच्याविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

मयत प्रकाश एक्कलदेवी यांचे भवानी एंटरप्राइजेस या नावाने टॉवेल कारखाना आहे तर श्रीकांत बलदवा यांचा श्री स्नेह इंटरप्राईजेस नावाने कारखाना आहे सन २०२२ ते जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये प्रकाश एक्कलदेवी यांनी त्यांच्या भवानी एंटरप्राइजेस कर्मचा गोडाऊनला जमा असलेल्या टॉवेलच्या मालापैकी एकूण २५ लाख रुपयांचा माल वेळोवेळी श्रीकांत बलदवा यांच्या श्री स्नेह एंटरप्राइजेस यांच्याकडे तारण म्हणून ठेवला होता या तारणावर एक्कलदेवी यांनी बलदवा यांच्याकडून दहा लाख रुपये चार टक्के व्याजाने वेळोवेळी घेतले होते सदर घेतलेली मुद्दल व व्याज जानेवारी २०२५ पर्यंत एक्कलदेवी यांनी बलदवा यांना रोख स्वरूपात परत करून त्यांना जून २०२५ पर्यंतच्या शेवटच्या आठवड्या पर्यंत सर्व मुद्दल व व्याज देऊन तारण ठेवलेला २५ लाख रुपयांचा माल आणण्यासाठी एक्कलदेवी हे बलदवा यांच्याकडे गेले होते त्यावेळी बलदवा यांनी एक्कलदेवी यांना हाकलून देऊन माल परत केला नाही तसेच तो तारण ठेवलेला टॉवेलचा माल बेकायदेशीर रित्या कोणाला तरी विकून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला तसेच एकलदेवी यांना तुम्हीच मला व्याजाचे आणखी दहा लाख रुपये देणे आहे ते पैसे आणून द्या नाहीतर तुम्हाला तुमचा माल मिळणार नाही असे बोलून वकिलामार्फत चार लाख ९५ हजार ८९४ रुपये मुद्दल देणे बाकी आहे असे नोटीस पाठवून दिली त्यामुळे प्रकाश एकलदेवी यांना मानसिक त्रास होऊन त्यांनी ७ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला त्यामुळे त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले असता १५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांचा मृत्यू झाला. प्रकाश एकलदेवी यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी बलदवा याच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस उपनिरीक्षक बनसोडे पुढील तपास करीत आहेत

### वीरशैव गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी ओंकार कोले

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

कंदलगाव येथील वीरशैव गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी ओंकार कोले यांची तर सचिवपदी प्रशांत कोरे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष सिद्धेश्वर नानाजे, सचिन भिमदे, खजिनदार श्रीशैल कोले, रोहन नानाजे, सचिव गगाधंर कोरे, नितीन कोरे, सूरज कडते, सदस्य दयानंद कोले, संतोष कोरे, कैलास कडते, अप्पू कोरे, सचिन कोरे, भीमराव कोरे, संतोष कडते, सचिन कोरे, संतोष कोले, सागर भिमदे, चेतन भिमदे, सोमनाथ भिमदे, सुरेश नानाजे, संतोष कडते, शिवराज कोले, शिवराज कोरे, गुंडू कोले, महेश स्वामी, विजयकुमार कोले, केदार नानाजे, विजय ऐरशिंगे, अतुल कोले, सजंय नानाजे, समर्थ कोरे, समर्थ कोरे, शिवानंद कोले, केदार कोरे, श्रीकांत कोले, लक्ष्मण कोरे, भाग्येश कोरे,अभिषेक कोरे, सौरभ कोले, निलेश बिराजदार, निलेश नानाजे यांची निवड करण्यात आली.





# नुकसानग्रस्त पिकांची भरपाई द्या; अखिल भारतीय किसान सभेचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने मागील काही दिवसांपासून सतत पडणाऱ्या संततधार पावसामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे काढणीस आलेल्या सोयाबीन, मूग, लिंबू, कांदा, उडिद, तुर, बाजरी, भाजीपाला, भुईमूग व फुलशेती या पिकांचे ३० हजार हेक्टरवरील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

या नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना एकरी ३० ते ४० हजार रुपये नुकसानभरपाई देण्यात यावे या मागण्यांचे निवेदन अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने मंद्रूपचे तहसीलदार सुजित नरहरे यांना देण्यात आले. यावेळी किसान सभेचे तालुकाध्यक्ष जावेद आवटे , मंद्रूप शहराध्यक्ष सिकंदर मकानदार, खजिनदार पैगंबर नदाफ, हारून मकानदार, मल्लिकार्जुन कांबळे, सुरेश जोडमोटे, इक्बाल आवटे, यासीन मकानदार, भीमराव गायकवाड, श्रीशैल मुंजे उपस्थित होते.

# मागील भांडणाचा राग धरून तरुणास लाकडी वाशाने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

मागील भांडणाचा राग मनात धरून तरुणास लाकडीवाशाने मारहाण करणाऱ्या दोघांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे




याबाबत रोहित राम कांबळे वय १८ राहणार महाराणा प्रताप नगर कुमठा नाका सोलापूर याने दिलेल्या फिर्यादीवरून अजय तुळजाराम चौधरी आणि लखन तुळजाराम चौधरी राहणार महाराणा प्रताप नगर झोपडपट्टी कुमठा नाका सोलापूर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे रोहित कांबळे हा १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी प्रताप नगर येथील मोकळ्या मैदानात त्याचा मित्र किरण कला वाले यांच्यासोबत गप्पा मारत थांबला होता त्यावेळी मागील भांडणाचा राग मनात धरून अजय चौधरी व लखन चौधरी या दोघांनी कांबळे यास हाताने लाथा बुक्क्यांनी बेल्टने लाकडीवाशाने मारहाण करून शिवेगाळ केली व दमदाटी केली म्हणून विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे पोलीस हवालदार सांगळे पुढील तपास करीत आहेत

# मेहता प्राथमिक शाळेत दहीहंडी उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

कै. वि. मो.मेहता प्राथमिक शाळेत गोकुळाष्टमीनिमित्त दहीहंडीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी शुभेच्छा दिल्या. प्रथम श्रुती कुलकर्णी यांनी मधुर आवाजात आज बाळकृष्ण जन्मला हे गीत सादर केले. शीतल जालिमिंचे यांनी गोकुळाष्टमी निमित्त माहिती सांगितली. यानिमित्ताने इ. १ ली च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी राधाकृष्णाची वेशभूषा केली होती. गोविंदा आला रे आला म्हणत बाळगोपाळांनी पुस्तक रुपी दहीहंडी फोडली. सूत्रसंचालन व आभार सुजाता यादव यांनी मानले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात टीचिंग एक्सलन्स डे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये दरवर्षी 'टीचिंग एक्सलन्स डे' हा १५ ऑगस्ट रोजी शिक्षण व शिक्षणपद्धतीतील नाविन्याचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. यावेळी आयोजित कार्यक्रमात बदलत्या काळात शिक्षण अधिक परिणामकारक, सर्जनशील आणि परिवर्तनकारी कसे होऊ शकते यावरती विशेष भर देण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या प्रेरणादायी संदेशात अध्यापन क्षेत्राबद्दल कृतज्ञता व्यक्त करत प्राध्यापकांच्या योगदानाचे कौतुक केले. यावेळी त्यांनी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या प्रेरणादायी प्रवासाचा आढावा घेतला. अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सुरुवात करून, आत्मविश्वास व दृढ निश्चियाच्या जोरावर वयाच्या ४३व्या वर्षी एमआयटी संस्थेची स्थापना कशी केली याचे हृदयस्पर्शी वर्णन त्यांनी केले. त्या म्हणाल्या, अध्यापन हे केवळ व्यवसायापुरते मर्यादित नसून, समाजपरिवर्तनासाठी आवश्यक दृष्टिकोन व उद्दिष्ट असलेली पिढी घडवण्याची ताकद त्यात आहे. यावेळी त्यांच्या हस्ते प्राध्यापकांच्या अध्यापन आणि शिक्षणातील नवोपक्रमांच्या संग्रहाचे अनावरण करण्यात आले.



कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून के.जे. सोमय्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या प्रा. शुभा पंडित उपस्थित होत्या. अभियांत्रिकी, संगणक व व्यवसाय या क्षेत्रांवरील सत्रांमध्ये प्रा. शुभा पंडित, प्रा. रमेश जी., आणि प्रा. चंद्रशेखर जी.आर. यांनी शैक्षणिक तज्ज्ञ म्हणून आपले विचार मांडले. तर प्रा. विद्या निरंजन, प्रा. प्रणेश मुर्नाळ आणि प्रा. प्रभा कासलीवाल यांनी सत्र अध्यक्ष म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. यावेळी १७ प्राध्यापकांनी विविध विषयांवरील १२ शोध निबंध सादर केले. सर्व विभागांच्या प्राध्यापकांनी सक्रिय सहभाग नोंदवून अध्यापनातील सर्वोत्तम पद्धती आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची देवाणघेवाण केली. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी यांनी प्राध्यापकांच्या नवोपक्रमांचे कौतुक करताना म्हणाले, विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळातील प्रत्येक पाऊल हे भविष्यातील पायाभरणी ठरते. त्याचबरोबर 'सातत्यपूर्ण सुधारणा, संघभावनेची जपणूक आणि नवोपक्रमांचा स्वीकार हेच विद्यापीठाच्या प्रगतीचे गमक आहे,' असे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक प्रा. टी. जोसेफ सहाय आनंद यांनी सर्वांचे आभार मानले.

# सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी सोमनाथ मेंडके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

सार्वजनिक मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्षपदी सोमनाथ मेंडके यांची निवड करण्यात आली. सर्वसाधारण सभा शिवानुभव मंगल कार्यालय येथे पार पडली.



या बैठकीत उत्सव कार्यवाहपदी आकाश हारकुड यांची निवड करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे होते. यामध्ये उपाध्यक्षपदी प्रविण कोनापुरे, महेश मेंगजी, आनंद तालीकोटी, मल्लिनाथ सोलापूरे, गोवर्धन दायमा, दिलीप पाटील, किसन गर्जे, कार्याध्यक्ष गौरव जक्कापुरे, सहकार्यवाह संतोष आकुडे, समर्थ बंडे, कोषाध्यक्ष सोमनाथ शरणार्थी, कार्यालय प्रमुख संतोष खंडेराव, सहकार्यालयप्रमुख संतोष फताटे, विनायक घंटे, प्रसिद्धीप्रमुख शिवानंद येरटे, सांस्कृतिक विभाग प्रमुख रवींद्र आमणे, विरेश सक्करगी, मिरवणूक प्रमुख भारत गोटे, श्रीकांत चितारी, आशिष उपाध्ये, आशिष देशेट्टी, अक्षय बिद्री, अनिल शहापूरकर, गिरीश शहाणे, विशेष महिला प्रतिनिधी सुमन मुदलियार, हेमा चिंचोळकर, लता फुटाणे, अंजली मंगोडेकर, वर्षा अतनुरे, कायदेशीर सल्लागार मंगला जोशी चिंचोळकर, बसवराज हिंगमिरे, प्रमुख सल्लागार विनायक महिंद्रकर, हिशोब तपासणीस जी.जी.बोरगांवकर यांची निवड करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### लोकसेवा शाळेत स्वातंत्र्यदिन साजरा

**सोलापूर दि. १९ ऑगस्ट-**

मंद्रुप येथील लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने मंद्रुप पोलिस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष शिवशरण पाटील होते. यावेळी संस्थेचे सचिव गुरुसिद्ध म्हेत्रे, सहसचिव पिरप्पा म्हेत्रे, संचालक वर्ग आणि प्राचार्य बसप्पा कुमठेकर पर्यवेक्षक. मदगोंडा मलकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन धानप्पा बगले यांनी तर आभार प्रा. अडवितोटे यांनी मानले.



### संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राजर्षी स्टडी सर्कल अभ्यासिका

**वैराग, दि. १९ ऑगस्ट-**


मानेगाव येथील संकल्प बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सोमवारी राजर्षी स्टडी सर्कल अभ्यासिकेचे उद्‌घाटन तसेच गरीब ,निराधार व भटक्या समाजातील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. मानेगाव येथे राजर्षी स्टडी सर्कल या सार्वजनिक अभ्यासिकेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य सेवा परीक्षेतून नव नियुक्त सहाय्यक महापालिका आयुक्त किरण डाके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. प्रवीण मासाळ,नगरसेवक श्रीशैल भालशंकर, आरपीआय तालुका अध्यक्ष दत्तात्रय क्षीरसागर, श्री कोचिंग क्लासेसचे अमोल माने, एसपी कोचिंग क्लासेसचे लहू शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रवीण भालेराव, राहुल दळवी, राहुल भालशंकर, प्रवीण लोंढे, सिद्धेश्वर लोखंडे, दिपक जेटीथोर यांनी परिश्रम घेतले. कालिदास देवकते यांनी सूत्रसंचालन केले तर आभार संस्थेचे अध्यक्ष बलभीम लोखंडे यांनी मानले.



### वैशाली इंगोले-देशमुख यांचा राजमाता अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन सन्मान

**वेळापूर, दि.१९ ऑगस्ट-**

वेळापूर येथील उमेदच्या व्यवस्थापिका वैशाली इंगोले देशमुख यांचा महिला बचत गटाच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल, महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विभागामार्फत देण्यात येणारा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. हा सन्मान १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त आमदार उत्तमराव जानकर व वेळापूर गावचे सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते संपन्न झाला. वेळापूरसह तब्बल १६ गावांमध्ये जवळ जवळ साडेतीन ते चार हजार महिलांचे एक मजबूत जाळे त्यांच्या प्रयत्नातून उभे राहिले आहे. गावपातळीवर महत्त्वाचे निर्णय घेणे, गरज पडल्यास परस्परांना मदत करणे, समाजोपयोगी उपक्रम राबवणे हे सर्व इंगोले यांच्या प्रेरणेतून घडले आहे. आज त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून मिळालेला हा पुरस्कार म्हणजे केवळ त्यांचा सन्मान नसून, हजारो महिलांच्या कष्टांना व प्रयत्नांना मिळालेली दाद आहे. असे प्रतिपादन आमदार जानकर यांनी यावेळी केले.




### स्विमिंग ग्रुप सदस्यांचा सार्वजनिक क्षेत्रात विविध पदांवर निवड झाल्याबद्दल सत्कार

**अक्कलकोट, दि.१९ ऑगस्ट-**

येथील स्विमिंग ग्रुप सदस्यांचा सार्वजनिक क्षेत्रात विविध पदांवर निवड झाल्याप्रित्यर्थ विविध पदांवर निवड झालेल्या सदस्यांचा सन्मान करण्यात आला. येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा स्विमींग ग्रुपचे संस्थापक महेश इंगळे- प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते स्विमींग ग्रुपच्या वतीने हा सन्मान सोहळा संपन्न झाला. या सन्मान सोहळ्यात नवभारत तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी शैलेश राठोर, श्री वरदविनायक गणेशोत्सव मंडळच्या अध्यक्षपदी आदीत्य गवंडी यांची निवड झाल्याबद्दल, तसेच नागणसूर येथील सेवानिवृत्त शिक्षक विद्याधर गुरव यांच्या सेवानिवृत्ती प्रित्यर्थ, हसापूर येथील आरोग्य सेवा निवृत्तीप्रित्यर्थ रामलिंगया स्वामी, अशोक कलशेट्टी यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ या सर्वांचा सन्मान सोहळा संपन्न झाला. यावेळी स्विमींग ग्रुपचे सदस्य संतोष पराणे, श्रीकांत झिपरे, अरविंद पाटील, बाबा सुरवसे, सुनिल पवार, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, शिवशरण अचलेर, अमर पाटील, राजू एकबोटे, सचिन किरनळ्ळी, रमेश शिंदे, काका सुतार, ओंकार उटगे, राजू एकबोटे, धनराज स्वामी, दर्शन घाटगे, महांतेश स्वामी, मल्लिनाथ माळी शेखर आडवीतोटे, ज्ञानेश्वर भोसले, स्वामीनाथ गवळी, तन्मय इचगे, कामाठी सरपंच, गौरीशंकर स्वामी, माजी सरपंच, गुरशात पाटील, जयवंत चव्हाण मालक, शितपती कामाठी, राजेंद्र कामाठी, गणेश गोंडाळ, तुषार पाटील, विश्वेश्वरय्या स्वामी, महान्तेश्वरय्या स्वामी, मधुकर सदाफुले उपस्थित होते.

# अक्कलकोट बसस्थानक परिसरात चिखलाचे साम्राज्य

## अबालवृद्ध प्रवाशांचे अतोनात हाल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ ऑगस्ट-**

अक्कलकोट बसस्थानक परिसरात पावसामुळे चिखलाचे साम्राज्य पसरले असून अबालवृद्ध प्रवाशांचे अतोनात हाल होत आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रशासनाचे अक्कलकोट बसस्थानकातील सोयी सुविधांकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांसह नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.



अक्कलकोट नगरी ही अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थांची नगरी म्हणून ओळखली जाते. श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक भक्त हे अक्कलकोट तीर्थक्षेत्री बसद्वारे येत असतात. तसेच स्थानिक प्रवासी, ग्रामीण भागातील प्रवासी, शालेय विद्यार्थी, वयोवृद्ध प्रवासी हे अक्कलकोट बस स्थानकातून एसटी बस द्वारे प्रवास करत असतात. हजारो प्रवासी वर्गाचे वर्दळ असणारे अक्कलकोट बसस्थानकात सलग नऊ, दहा दिवसांपासून पाऊस पडत असल्याने सर्वत्र चिखल चिखल साचले आहे. बसस्थानकाच्या परिसरात चिखलाचे साम्राज्य पसरले असून या चिखलातूनच अबालवृद्ध प्रवाशांना मार्ग काढावा लागत आहे. अक्कलकोट बस आगार प्रमुखांना प्रवासांचे होणारे हाल दिसत नाहीत का? हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अक्कलकोट बसस्थानक परिसरातून लहान मुले, महिला, वयोवृद्ध प्रवासी, अपंग प्रवासी यांना चालताच येत नाही. इतकी भीषण परिस्थिती असताना एसटी बस स्थानकातील अधिकारी काय करत आहेत हेच कळत नाही. वास्तविक पाहता अक्कलकोट बसस्थानक परिसरात मुरूम, खडी टाकून खड्डे बुजून प्रवाशांना रस्ता करून देणे अपेक्षित आहे. पण साधे मुरूम टाकून बस स्थानक परिसर व्यवस्थित करण्याचे का टाळले जात आहे. प्रवाशांना मुद्दाम त्रास देण्यात येत आहे का याची चौकशी होणे गरजेचे आहे. अक्कलकोट नगरीत स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी येणारे परगावचे भाविक हे बसस्थानकातील परिसर पाहून कपाळावर हात मारून घेत आहेत. आपण नेमके तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत आहोत का? असा सवाल उपस्थित करत आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ प्रशासनाने अक्कलकोट बस स्थानक परिसरातील चिखलावर कायमचे उपाययोजना करावी अशी मागणी परगावच्या व स्थानिक प्रवासी वर्गातून केली जात आहे.




## सुस्ते येथील झेडपी शाळेत शालेय साहित्य व खाऊ वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. १९ ऑगस्ट-**

पंढरपूर तालुक्यातील सुस्ते येथील जिल्हा परिषद शाळा शाळेतील विद्यार्थ्यांना माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय बोबडे यांच्या वाढदिवसानिमित्त अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

यावेळी सरपंच विशाल कसबे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय बोबडे, बालाजी नागटिळक, सोसायटीचे चेअरमन संभाजी चव्हाण, विजय चव्हाण, आरपीआयचे तालुका उपाध्यक्ष भैया फडतरे, अभिजीत घाडगे, राजेंद्र चव्हाण, दत्तात्रय वायदंडे, मतीन शेख, शुभम पवार, मुख्याध्यापक विजय वाघमारे, दिनकर खांडेकर, प्रेमल मस्के आदी उपस्थित होते.

## सेंट जॉन्स स्कूलमध्ये कृष्णजन्माष्टमी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १९ ऑगस्ट-**

येथील सेंट जॉन्स इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. संस्थापक सोमी जॉन व मुख्याध्यापिका मिस शीजी जॉर्ज यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी नृत्य, नाटके, देशभक्तीपर गीते, कवायत, परेड याचे सादरीकरण केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल बक्षीस देऊन त्यांचे गौरव करण्यात आले.



दि. १६ ऑगस्ट रोजी कृष्णजन्माष्टमी, गोपाळकाला निमित्त शाळेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता नर्सरी एल.के.जी., यु.के.जीच्या विद्यार्थ्यांनी राधा कृष्णाची वेशभूषा परिधान केली होती. शाळेचे संस्थापक सोमी जॉन व मुख्याध्यापिकांनी शीजी जॉर्ज यांनी सर्व चिमुकल्यांसह गोपाळकाला या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन केले. तसेच या सर्व बालकांनी राधा-कृष्णाच्या गाण्यावरती नृत्याचे सादरीकरण केले. याप्रसंगी दहीहंडीचाही कार्यक्रम शाळेमध्ये आयोजित करण्यात आला. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी उत्कृष्ट मनोरे रचत दहीहंडीचा फोडण्याचा आस्वाद घेतला.

# पिलीव परिसरात लंपीचा कहर

## अनेक जनावरांना लंपीची लागण

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १९ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीवसह आसपासच्या गावात सध्या जनावरांना मोठ्या प्रमाणात लंपीची लागण झाली आहे तसेच दररोज जनवारांना लागण होत आहे. तर अनेक जनावरे वेळेत उपचार मिळत नसल्याने दगावली आहेत. तसेच वरचेवर जनावरे दगावणे सुरूच आहे. यामुळे पशुपालकामध्ये सध्या प्रचंड भितीचे वातावरण असून यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थीक नुकसान होत आहे. अश्या विदारक परिस्थितीत पिलीव येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारीच नाहीत .याठीकाणची जागा रिक्तच आहे. यामुळे पिलीव पशुवैद्यकीय दवाखान्या अंतर्गत येणाऱ्या पिलीव, झिंजेवस्ती व सुळेवाडी या तिन्ही गावात शासकीय पशुवैद्यकीय सेवा मिळतच नाही. या तिन्ही गावात पशुधन मोठ्या प्रमाणात आहे. या तिन्ही गावात सध्या लंपीचा कहर आहे आणी येथे पशुवैद्यकीय अधिकारीच नाहीत. याठिकाणचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर शेंडगे यांची बदली झाल्यानंतर याठिकाणची जागा रिक्तच आहे. ऐन लंपीचा कहर असताना स्वतंत्र पशुवैद्यकीय अधिकारी नसणे हे खरेतर पशुपालकावर प्रशासनाने एक प्रकारे केलेला अन्यायच आहे. यामुळे सध्या पशुपालकामधून नाराजी व्यक्त केली जात आहे. याठिकाणी शिंगोर्णी येथील पशुवैद्यकीय अधिकारी वरकुटे यांना तात्पुरता पदभार दिलेला आहे पण त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावात पशुवैद्यकीय सेवा देऊन पिलीव भागात सेवा देणे त्यांना शक्य होत नाही यामुळे त्यांना दोन पशुवैद्यकीय दवाखान्या अंतर्गत येणाऱ्या गावात सेवा देणे खुपच अवघड जात आहे. याठिकाणी पूर्वी असणारे डॉक्टर ठवरे यांना पुन्हा पिलीव येथे पदभार दयावा अशी मागणी पिलीव परीसरातील पशुपालकामधुन होत आहे. प्रशासनाने ताबडतोब याठिकाणी त्यांची नियुक्ती करावी व लंपीच्या काळात होणारे पशुपालकांचे नुकसान टाळावे अशी जोरदार मागणी पशुपालकांमधून होत आहे.

> पिलीव परीसरातील अनेक जनावरे लंपीमुळे दगावली आहेत पण शासनाना मोफत लसीकरण करीत नाही ना मृत्यूमुखी पडलेल्या जनावरांना २०२२ प्रमाणे मदत सुदधा करीत नाही. शासनाने मृत्यू मुखी पडलेल्या जनावरांना मदत करावी अशी पशुपालकांमधून शासनाकडे केली जात आहे.

> याबाबत माळशिरस तालुक्याचे तालुका पशुवैद्यकीय अधिकारी यांना विचारले असता बदली प्रक्रियेत पिलीवची जागा रिक्त राहीली आहे. यामुळे याठिकाणचा तात्पुरता पदभार शिंगोर्णी येथील पशुवैद्यकीय अधिकारी वरकुटे यांना देणयात आला असल्याचे सांगितले.

## मंद्रुपच्या सकळेश्वरला धान्याची पूजा

### भक्तांकडून पूजा बांधण्याची अनेक वर्षांची परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १९ ऑगस्ट-**

मंद्रुपचे ग्रामदैवत श्री सकळेश्वर देवस्थान येथे श्रावण महिन्यात दर सोमवारी भक्तांकडून अकीपूजा (तांदूळ) व पानपूजा बांधली जाते. अनेक वर्षांपासून मंद्रुपमधील भक्तांकडून प्राचीन काळातील सकळेश्वर देवाची पूजा बांधण्याची परंपरा आहे. अक्की, धान्य व पानपूजा बांधताना सातू तांदूळ, गहू, हरभरा, दाळ व मसूरदाळ ही पाच धान्य पाण्यात भिजवून श्रीच्या मूर्तीवर दोरीच्या सहाय्याने पूजा बांधण्यात येते.



दर सोमवारी श्रीस अभिषेक करून पूजा बांधण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे.

मंद्रुपमधील सकळेश्वर मंदिर पुरातन आहे. मंद्रुपच्या पश्चिम दिशेला सकळेश्वर मंदिर आहे. या मंदिरात सकळेश्वर देवाशिवाय कुलगुरू तीर्थाचार्य यांची समाधी आहे. डाव्या बाजूस श्री सर्वमंगळागौरी माता शक्तीदेवता आहे. याशिवाय विष्णूदेवता, अष्टभुजादेवी, नागोबा, गणपती, हनुमान अशा देवतांच्या मूर्ती आहेत. मंदिरासमोर प्रशस्त मैदान आहे. मंदिराच्या शेजारीच श्री शिवयोगेश्वर देवस्थान व मठ आहे. येथे दररोज भक्तांकडून भजन व शिवआराधना केली जाते. श्रावण समाप्ती अमावस्या दिवशी रात्रभर भजन व शिवआराधना करून जागरण करण्यात येते. मंद्रुपच्या मुख्य रस्त्यांवरून श्रीच्या मूर्तीची सवाद्य मिरवणूक काढण्यात येते. महाप्रसाद वाटप करून श्रवण समाप्त व महिन्याच्या पूजेचा समारोप करण्यात येतो.

> ग्रामदैवत सकळेश्वर मंदिराची अक्कीपूजा व पानपूजा बांधण्याची परंपरा अनेक वर्षांपासून सुरू आहे. पूजा बांधल्यामुळे इच्छा पूर्ण होते, अशी भक्तांची धारणा आहे. यामुळे श्रावण सोमवारी धान्यपूजा व पानपूजा बांधली जाते. भक्तांकडून श्रावण समाप्तीला श्रींची मिरवणूक काढण्यात येते.
> **- सकळेश्वर पुजारी, मंद्रुप**

> ग्रामदैवत सकळेश्वर मंदिर पुरातन असून येथील भक्तांकडून श्रावण सोमवारनिमित्त अक्कीपूजा बांधली जाते. अनेक वर्षांपासून विविध धान्याची पूजा करण्याची प्रथा आहे. श्रावणमध्ये दर्शनासाठी भक्तांची गर्दी असते. **- सुरेश जोडमोटे, निवृत्त मंडलअधिकारी, मंद्रुप**

# उद्योग व व्यापार विभागाला नवी दिशा व नवे बळ देऊ

## उद्योग व व्यापारी विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ ऑगस्ट -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाची बैठक प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस भवनात पार पडली.



या बैठकीत आ. रोहित पवार यांनी केवळ विभागाचा आढावा घेतला. यावेळी उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने व्यापाऱ्यांशी व उद्योजकांशी थेट संवाद साधला. उद्योग व व्यापार विभागाला नवी दिशा व नवे बळ देऊ अशी ठाम ग्वाही दिली.

या बैठकीत प्रदेश सरचिटणीस रवींद्र पवार, प्रदेश प्रवक्ते रविकांत वर्पे, उदगीरचे माजी आमदार सुधाकर भालेराव, राज्य कार्यकारिणी, पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, शहराध्यक्ष इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली. प्रदेश कार्यकारिणी सदस्य विजय काळे यांनी आभार मानले. उद्योजकांच्या स्वप्नांना आकार देण्याचा आणि व्यापारी वर्गाला न्याय मिळवून देण्याचा नवा प्रवास असल्याचे मत फाटे यांनी व्यक्त केले.

# काँग्रेसकडून जिल्ह्यातील मतदार यादी पडताळणी सुरू

## बूथनिहाय होणार तपासणी, जिल्हा दौऱ्यास कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट-**

विधानसभा निवडणुकीत मतदार यादीत घोळ केल्याचा दावा काँग्रेसचे राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेद्वारे केला. यात मतदार यादीतील अनेक घोटाळे पुढे आणले आहेत. त्यामुळे जिल्हा काँग्रेसकडून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात बूथनिहाय मतदार यादीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची सुरुवात पंढरपूर, सांगोला, माळशिरस व मोहोळ येथून करण्यात आली.

जिल्हाध्यक्ष पदाचा पदभार घेतल्यानंतर सातलिंग शटगार यांनी प्रथमच जिल्हा दौऱ्याला सुरुवात केली आहे. मतदार यादीत दुबार नावे, मतदार यादीतून वगळलेली नावे, मृत्यू झालेल्या मतदारांची नावे कमी केली आहेत का ? अशा विविध गोष्टींची तपासणी, पडताळणी करावी, असे आदेश काँग्रेसच्या बैठकीत दिले आहेत. त्यानुसार तालुका, गावपातळीवरील नेते, कार्यकर्ते यांच्याकडून बूथनिहाय मतदार यादीची पुनर्तपासणी करण्यास सुरुवात करण्यात आली असून ३७ लाख मतदारांची पडताळणी करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष शटगार यांनी सांगितले.

जिल्हाध्यक्षपदाची धुरा हाती घेतल्यानंतर मुंबई येथे तीन दिवस जिल्हाध्यक्षांची शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी पक्षवाढीसाठी जिल्हाध्यक्षांची भूमिका या विषयावर प्रदेश काँग्रेसकडून मार्गदर्शन करण्यात आले. त्यानुसार जिल्ह्यात काँग्रेस पक्षाच्या वाढीसाठी ९ ऑगस्टपासून जिल्हा दौरा सुरू केला आहे. प्रत्येक तालुक्यात पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन जुन्या व नव्यांचा मेळ घालण्यात येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीसाठी बूथ कमिट्या व बूथ एजंट सक्षमीकरणासाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. जुन्या व नव्या पदाधिकाऱ्यांचा मेळ घालून पक्षवाढीसाठी प्रयत्न करणार आहे. त्यासाठी क्रियाशील पदाधिकारी ठेवून क्रीयाशील नसणाऱ्यांना बदलण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. नविन पदाधिकारी निवडताना तरूणांना संधी देण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काँग्रेस सर्व ताकदीनिशी निवडणूक लढविणार आहे. त्यासाठीची तयारी सुरू आहे. जिल्ह्यातील तालुकानिहाय बैठकातून याबाबत कार्यकर्ते व पदाधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यात येणार आहे. जिल्ह्यात काँग्रेसची ताकद पुन्हा सिध्द करण्यासाठी स्थानिक स्वराज्यसंस्था निवडणूक महत्वाची आहे. त्यामुळे या निवडणूकीच्या तयारीत कसूर ठेवणार नसल्याचे त्यांनी सांगितले.



> मतचोरी करून भाजपाने सत्ता कशी आणली आहे, हे राहुल गांधी यांनी पुराव्यानिशी दाखविले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत हा धोका पुन्हा होऊ नये, यासाठी जिल्ह्यातील सर्व गावातील मतदार याद्यांची बूथनिहाय पडताळणी करण्यास सुरुवात केली आहे.
> **- सातलिंग शटगार,** जिल्हाध्यक्ष काँग्रेस , सोलापूर

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## करकंब येथे उमलले दुर्मीळ ब्रम्हकमळ

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १९ ऑगस्ट-**

प्रतिनिधी: सूर्यफुलाच्या कुळातील वर्षातून एकदाच उमलणारे ब्रम्हकमळ करकंब (ता. पंढरपूर) येथील दत्तात्रय काळे यांच्या अंगणामध्ये उमलले आहे. वर्षातून एकदाच उमलणारे हे ब्रम्हकमळ पाहण्यासाठी अनेकजण उत्सुकतेपोटी त्यांच्या घरी भेट देत आहेत.जुलै ते ऑगस्टमध्ये या ब्रम्हकमळाचा बहर असतो.फुलांच्या दरीत (व्हॅली ऑफ फ्लॉवर्स) व उत्तराखंडमधील हेमकुंडसाहेब येथे हे ब्रम्हकमळ जूनच्या शेवटच्या



आठवड्यात हजेरी लावते.या फुलाचे वरचे टोक जांभळ्या रंगाचे असून पाकळ्या हिरव्या,पिवळ्या कागदी प्रदलमंडळात गुंडाळल्यासारख्या दिसतात.हिमवृष्टीतही मुख्य फुलाच्या आतील तीन, चार फुलांचे संरक्षण व्हावे यासाठी ही रचना आहे.हे ब्रम्हकमळ एकटेदुकटे नसते. ते तीन, चार फुलांच्या गटांमध्येच आढळते. हे फूल हिमालयातील उत्तराखंड राज्याचे राज्यपुष्प आहे. बद्रिकेदार व केदारनाथ मंदिरातील देवांना ब्रम्हकमळ वाहण्याची परंपरा आहे. त्यामुळेच याला देवपुष्प असेही म्हणतात. सध्या दुर्मिळ होत चाललेले हे फुल वाचविण्यासाठी या ब्रम्हकमळाच्या रोपाला संरक्षित रोपाचा दर्जा देण्यात आला आहे.



### महत्त्वाचे



## कासेगाव येथे महिला आरोग्य शिबिर संपन्न

**कासेगांव,दि.१९ ऑगस्ट -**

माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त कासेगाव (ता.पंढरपूर) येथे महिला आरोग्य शिबीर घेण्यात आले.या आरोग्य शिबीरामध्ये स्त्री रोग तपासणी व नेत्र तपासणी याबरोबरच मानसोपचार तज्ञांकडून स्त्रीयांच्या जीवनशैली विषयी मार्गदर्शन ही करण्यात आले. येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रशांतभैय्या देशमुख युवा मंच कासेगांव यांच्या वतीने शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास युटोपियन शुगसचे चेअरमन उमेश परिचारक, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, पंचायत समितीचे माजी सदस्य प्रशांत देशमुख, सुरेश देशमुख, स्त्रीरोग तज्ञ डॉ.गाडगे मॅडम,मानसोपचार तज्ञ डॉ. ठेंगले व प्राथमिक आरोग्य केंद्र कासेगांव येथील सर्व कर्मचारी तसेच कासेगाव ग्रामपंचायतीचे आजी माजी सदस्य आणि मान्यवर मंडळी उपस्थित होते.



## जातीचा दाखला काढून देणारी देगावची जिल्हा परिषद शाळा

**सुस्ते, दि.१९ ऑगस्ट-**

शैक्षणिक प्रवासात कोणताही विद्यार्थी शासनाच्या लाभाच्या योजनांपासून वंचित राहू नये, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देगाव येथे एक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना लागणारे जातीचे दाखले शाळेच्या माध्यमातून काढून देण्यात आले. मुख्याध्यापिका सुमन वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. शिवाजी शिंदे, विजय बंगाळे, सुजाता गुरसाळकर, खंडू वायदंडे, गुरुप्रसाद पाटोळे, हनुमंत माने, हरी भोई आदीने परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांचे कागदपत्र जामा करून, फॉर्म भरणे, सत्यापन आणि शासन कार्यालयाशी समन्वय सर्व टप्पे काटेकोरपणे पूर्ण करण्यात आले. पालकांनी ह्या उपक्रमाला प्रतिसाद दिल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे दाखले मिळाले आहेत. उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शालेय साहित्य योजना, प्रवास भत्ता, व इतर शासकीय लाभ घेण्यासाठी सुलभता मिळाली आहे. पालकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, शाळेचा हा पुढाकार इतर संस्थांसाठीही आदर्श ठरेल, अशा प्रतिक्रिया दिल्या.



## निरोगी राहण्यासाठी व्यसनापासून दूर रहा : डॉ. संदीप तांबारे

**बार्शी, दि.१९ ऑगस्ट-**

युवकांनी आपल्यामधील ऊर्जेचा वापर सकारात्मक गोष्टीसाठी खर्च केला पाहिजे. तसेच आपले आरोग्य निरोगी राहण्यासाठी व्यसनापासून दूर राहिले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. संदीप तांबारे यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि आयुष व्यसन मुक्त केंद्र जामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त कार्यक्रमात प्रमुख पाहुणे ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख होते. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, प्रा. मनोज चिकराम, प्रा. समाधान लोंढे, मृणालिनी मोरे आदी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शेख यांनी समाज उपयोगी उपक्रमात सहभाग घेऊन समाजाचे ऋण फेडण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. दामाजी भिसे यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. आसावरी फरताडे यांनी तर आभार प्रा. समाधान लोंढे यांनी मानले.

## प्रा. मिनाक्षी जगदाळे (अंधारे) यांना पीएच.डी.



**टेंभूर्णी, दि.१९ ऑगस्ट-**

शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात सातत्यपूर्ण कार्य करत असलेल्या प्रा. मिनाक्षी जगदाळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर (बामू) येथून आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. या यशामुळे शिक्षण व संशोधन क्षेत्रात त्यांच्या कार्याचा गौरव होत आहे. डॉ. ज्ञानदेव मोरे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. जगदाळे यांनी आपल्या संशोधनात भारतीय कृषी निर्यातीचा अभ्यास करताना त्यातील स्पर्धात्मक घटकांचे सखोल विश्लेषण केले आहे. अकरा पदव्या त्यांनी मिळवल्या आहेत. अनेक सामाजिक, शैक्षणिक पुरस्कार, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना मिळाला आहे. त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# जवळगाव मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो; २६ गावांचा पाणीप्रश्न मिटला

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १९ ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यातील २६ गावांसाठी जवळगाव मध्यम प्रकल्प वरदान ठरला आहे. दरम्यान पावसाचे घटते प्रमाण आणि धरण पाणीअधिग्रहण क्षेत्रात झालेले लहानमोठे प्रकल्प यामुळे हे धरण पूर्ण क्षमतेने भरणे अपवादच बनले आहे. मात्र यंदा पाऊसाचे प्रमाण चांगले राहील्याने गेल्या ३६ वर्षात आठव्यांदा धरण भरुन वाहू लागले आहे.



बार्शी तालुक्यात तीन मध्यम प्रकल्प आहेत. मात्र पावसाच्या अनिश्चिततेमुळे दरवर्षी पाण्यासाठी जनतेला त्रास होत होता. त्यातल्या त्यात जवळगाव मध्यम प्रकल्पाची अवस्था सर्वात जास्त बिकट असून दरवर्षी हे धरण भरण्यास अनेक अडचणी येतात. नागझरी नदीवर उभारण्यात आलेले हे धरण भौगोलिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचे आहे. मात्र लागून असलेल्या धाराशीव जिल्ह्यात पाटबंधारे विभागाची कामे मोठ्या प्रमाणावर झाली आहेत. त्यामुळे नागझरी नदीवर ठिकठिकाणी पाणी अडवण्यात आले आहे. परिणामी जवळगाव मध्यम प्रकल्पात पाणी पोहचू शकत नाही. त्यात पावसाचेही प्रमाण घटल्याने हे धरण निर्माण झाल्यापासून आत्तापर्यतच्या काळात फक्त आठ वेळाच भरले आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने धरण भरण्याबाबत हे धरण विश्वासू नाही. यंदा मात्र मे महिन्यापासून पडणाऱ्या पावसामुळे पाणी साठण्यास सुरुवात झाली होती. सध्या गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून पाऊस पडत असल्यामुळे जवळगाव धरणाच्या अधिग्रहण क्षेत्रातच पावसाने जोरदार हजेरी लावल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरुन वाहू लागले आहे. १९७२-१९७३ साली जवळगाव मध्यम प्रकल्पाचे काम सुरू झाले होते. पण प्रत्यक्षात १९८९ साली पाणी अडवण्यात आले. त्यानंतर चक्क एकोणीस वर्षानंतर २००८ साली पूर्ण क्षमतेने हे धरण भरले. नंतर २०१० साली देखील भरले. पण त्यानंतर पुन्हा सहा वर्षाच्या प्रदीर्घ काळ न भरताच ओलांडला. त्यानंतर २०१६ साली भरले. पुन्हा चार वर्ष अनेक कारणांनी धरण भरले नाही. पुन्हा २०२०, २०२२, २०२४ आणि सध्या २०२५ मध्ये धरण भरले असून ते वाहू लागले आहे. त्यामुळे जवळगावसह आसपासची सव्वीस गावे आनंदीत आहेत. या धरणामुळे ५ हजार ३४० हेक्टर क्षेत्रावरील जमीन ओलीताखाली आली आहे. या धरणाची क्षमता १ हजार २३३ दशलक्ष घनफूट पाणी साठवण्याची असून ९३१ दशलक्ष घनफूट पाणी उपयूक्त आहे. या धरणामुळे ज्योतीबाची वाडी, अंबाबाईची वाडी, सारोळे, भांडेगाव, कासारी, भालगाव, मिर्झनपूर, गौडगांव, रुई, आंबेगाव, काटी, हत्तीज, हिंगणी, धामणगाव, राळेरास, कौठाळी या गावांना अधिक फायदा झाला आहे.

गेल्या ३६ वर्षात केवळ आठ वेळा भरलेल्या या धरणाने २७ वर्ष शेतकऱ्यांना नाराज केले असले तरी या वर्षी चांगलेच खुश केले आहे. यंदा सुरुवातीलाच पाऊस दमदार हजेरी लावत गेल्याने धरण भरू लागले होते. वीस दिवसापासून पडणाऱ्या पावसामुळे सध्या धरण ओसंडून वाहू लागले आहे. या जलाशयावरून तेरा गावे आणि कालव्यावरून तेरा गावे अशी सव्वीस गावे सिंचनाखाली आली आहेत. त्यामुळे यंदा खऱ्या अर्थाने जवळगाव मध्यम प्रकल्प वरदान ठरत आहे. आता यापुढे मोठे पाऊस असून नदीकाठच्या गावांनी सावध रहावे असे आवाहन ही संबंधीत विभागाकडून करण्यात आले आहे.

दरवर्षी सिंचन सोडाच पण उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत होता. त्यात मानवनिर्मित धोके आणि निसर्गाचा लहरीपणा याचा त्रास सर्वसामान्यांना अधिक होत होता. यंदा धरण भरल्यामुळे त्रास कमी होणार असून शेतीचे उत्पन्न वाढीसही मदत होणार आहे. - नितीन कापसे, जवळगाव.

## पंढरपुरात डॉल्बीने घेतला एकाचा बळी

### दहीहंडीवेळी डॉल्बीच्या दणदणाटामुळे आली भोवळ; उपचारापूर्वीच झाला मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१९ ऑगस्ट -**

दरवर्षीप्रमाणे यंदाही दहीहंडी उत्साहात झाली मात्र पंढरपूर येथे या उत्सवाला यंदा गालबोट लागले. शिवाजी चौकात सोमवारी (ता.१८) डॉल्बीच्या दणदणाट गोविंदा पथकांनी थरावर थर लाऊन हंडी फोडली. मात्र, या डॉल्बीच्या आवाजामुळे एका नागरिकाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

दहीहंडी पाहण्यासाठी आलेली ही व्यक्ती अचानक चक्कर येऊन खाली पडली. हे फारसं कुणाच्या लक्षात आलं नाही. मात्र तिथेच उपस्थित गोविंदा आणि स्थानिकांनी या व्यक्तीला जवळून पाहिलं असता ती बेशुद्ध असल्याचं लक्षात आलं. त्यानंतर तातडीने घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. घटनास्थळी रुग्णवाहिका बोलावण्यात आली. जखमी अवस्थेतील या व्यक्तीला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं. पण, डॉक्टरांनी तपासून या व्यक्तीला मृत घोषित केलं.

अद्यापही या व्यक्तीची ओळख पटलेली नाही. डॉल्बीच्या आवाजामुळे या व्यक्तीचा मृत्यू झाला असावा असा अंदाज वर्तवला जात आहे. घटनेची माहिती पोलिसांना मिळाली असून अधिक तपास केला जात आहे. सध्या या व्यक्तीची ओळख पटविण्याचा पोलिसांकडून कसोशीने प्रयत्न केला जात आहे. डॉल्बीच्या आवाजामुळे राज्यात यापूर्वी देखील काही नागरिकांचे मृत्यू किंवा नागरिक जखमी झाल्याच्या घटना नवीन नाहीत.

एवढंच नाहीतर डॉल्बी बरोबरच वापरण्यात येत असलेल्या लेजर लायटिंगमुळेही अनेकांनी आपली दृष्टी गमावल्याच्या देखील घटना घडल्या आहेत. त्यामुळे डॉल्बीवर आणि लेझर लाइटिंगवर शासनाने बंदी आणावी अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांनी केली आहे.

## तालुकास्तरीय कराटे स्पर्धेत वेळापूरच्या मुहम्मद शेख यास सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१९ ऑगस्ट-**

गिरझणी येथे झालेल्या तालुकास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेज वेळापूरचा विद्यार्थी मुहम्मद मुस्तफा शेख याने ५० किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवत सुवर्णपदकाची कमाई केली. या यशासह मुहम्मदची जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

तसेच ३८ किलो वजन गटात सृष्टी माळी हिने कांस्यपदक पटकावून शाळेचा मान उंचावला. या दोन्ही खेळाडूंना सत्यजीत बारुंगुळे, भास्कर बागल, शिवाजी जाधव तसेच क्रीडा विभाग प्रमुख सतीश कदम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम, संचालिका डॉ. सौ. मीनाक्षी कदम, सचिवा डॉ. सौ. प्रियदर्शनी महाडिक, संचालिका सौ. तेजस्विनी कदम, शाळा समिती चेअरमन प्रतापराव पाटील, प्राचार्य आर. बी. पवार, उपमुख्याध्यापक पठान शिवशरण, पर्यवेक्षक बी. एस. सावळे, शिक्षक पालक संघ उपाध्यक्ष अमोल मंडलीक, व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप जगदाळे, उपाध्यक्ष प्रियंका पोरे यांच्यासह सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, ग्रामस्थ व माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

## अतिवृष्टीबाबत राष्ट्रवादीच्या खासदारांनी घेतली गृहमंत्र्यांची भेट



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१९ ऑगस्ट-**

महाराष्ट्रात सध्या झालेल्या अतिवृष्टीमुळे ग्रामीण भागातील शेती, पिके आणि पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहेत. तसेच शहरी भागातही या अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्याध्यक्षा खा.सुप्रिया सुळे यांच्या समवेत खा.धैर्यशील मोहिते पाटील, खा. बजरंग सोनावणे, खा.बाळ्यामामा म्हात्रे यांनी भेट घेतली.

या भेटीदरम्यान अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना आणि नागरिकांना केंद्र शासनाकडून तातडीने आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय, महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था राखणाऱ्या पोलीस बांधवांवर गुंड प्रवृत्तींकडून होणाऱ्या वारंवारच्या हल्लयांवर चिंता व्यक्त करत, या घटनांना आळा घालण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणीही या शिष्टमंडळाने केली. यावेळेस खासदार मोहिते-पाटील यांनी सहकार क्षेत्रात दीर्घकालीन आणि उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यासाठी सहकार मंत्रालयामार्फत विशेष केंद्रीय पुरस्कार सुरू करण्याची महत्त्वपूर्ण मागणी केंद्रीय सहकार तथा गृहमंत्री शाह यांच्याकडे केली.



## दत्तनगर-खंडाळी येथे सायकल व शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१९ ऑगस्ट-**

श्रीदत्त बहुउद्देशीय संस्था दत्तनगर व धर्मवीर संभाजी राजे ग्रुप दत्तनगर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून दत्तनगर येथे १३ सायकल व ५१ दप्तरांचे वाटप करण्यात आले.

यावेळी भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य के. के. पाटील, भाजप जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब सरगर, तालुकाध्यक्ष बलभीम जाधव, शिवसेना (शिंदे गट) माळशिरस तालुक्याचे उपाध्यक्ष रणजितदादा गायकवाड, मारुतीतात्या दोलत्तडे, भाजपा डॉ. सेलचे अध्यक्ष प्रवीणसिंह पताळे, युवा मोर्चा उपाध्यक्ष युवराज वाघमोडे, पोलीस पाटील सचिन गोसावी, पत्रकार महादेव जाधव, सुनील पताळे, अमोल पताळे उपस्थित होते. भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस विनोद थिटे यांनी प्रास्ताविक केले. लोकविकासचे मुख्याध्यापक सुनील पताळे तसेच सेवानिवृत्त सुमन पवार व जिल्हास्तरीय अहिल्यादेवी होळकर पुरस्कार मिळाल्याबद्दल आशा शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. केशरकाकी पवार यांनी आयोजक विनोद थिटे यांचा सत्कार केला. यावेळी के. के. पाटील, बाळासाहेब सरगर, बलभीम जाधव व डॉ. प्रवीणसिंह पताळे यांनीही विचार व्यक्त केले. यावेळी शरद पवार, दत्तात्रय पवार, बाळासाहेब पवार, हरी पवार, मधुकर पवार, सतीश पवार, विलास पवार, बाबुराव पवार, बाळू कांबळे, मच्छिंद्र पवार, आबा गोसावी,विजय इंगळे, शिवाजी खुळे, अमोल पिंपळे, रणजीतदादा कदम, गणेश पवार, महेश खिलारे, रावसाहेब पिंपळे, गणेश खंडागळे, सतीश गायकवाड, उमेश पवार, विलास शिंदे, शौकत पठाण, आबा भोरे, रणजीत गायकवाड, लक्ष्मण पवार, बलभीम पवार, सोमनाथ पवार उपस्थित होते. आबासाहेब पवार, अमोल पिंपळे, वासुदेव पवार, शिवाजी खुळे, शिवाजी धनवडे, रमेश पवार, मनोज सोनवणे, विष्णू कांबळे, प्रणव जगताप, आनंद जगताप, बाळू सगट, लक्ष्मण पवार, गणेश भोरे, पापा शेख यांनी परिश्रम घेतले. गोसावी यांनी सूत्रसंचालन केले. वैशाली पवार यांनी आभार मानले.

## शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे TIT परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ ऑगस्ट-**

मे व जून महिन्यात घेण्यात आलेल्या TIT परीक्षेत येथील शंकरराव निंबाळकर विद्यालयाने घवघवीत .यश संपादन केले आहे.

२७ ते ३० मे २०२५ तसेच २ ते ५ जून २०२५ अशा दोन टप्प्यात ही परिक्षा घेण्यात आली. सदर परीक्षेचा निकाल १७ ऑगस्ट रोजी जाहीर झाला आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित, शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शीच्या खालील छात्राध्यापकांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामागे अध्यापक विद्यालयात वर्षेभरात CTET,TET परीक्षेचे प्राचार्य व अध्यापकाचार्यांनी मार्गदर्शन केले. तसेच CTET,TET, TIT परीक्षा उत्तीर्ण झालेल्या छात्राध्यापकांनी मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे UPSC व MPSC परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी अधिकाऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व प्रेरणेमुळे खालील विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केलेले आहे.

यश संपादन केलेले विद्यार्थी असे : हजरत फकिर १६८, शिवानी बांगर १५२, ज्ञानेश्वर येडवे १५१, अंकिता राऊत १४८, घाडगे संदिप १४५, गणेश ठाणेकर १४४, विद्या वाघमारे १४१, दिनेश गरड १३८, भाग्यश्री सुतार १३८, सुदिक्षा कावरे १३८, अस्मिता हाके १३८ , संकेत मोरे १३७, वैभवी डांगे १३४, सुरज गुरव १३३, गुरव एकनाथ १३३, अजय शिंदे १३०, शैलेश नेवरे १३०, अजय करळे १३०, सुदर्शन गव्हाणे १२९, अश्विनी वाघ १२९, अमोल पाटील १२८, गणेश थोरात १२८, प्रियंका बादल १२८, प्रतिक्षा थोरात १२८, कल्याणी पाटील १२८, प्रकाश राऊत १२६, संध्या खोटे १२६ , विद्या गोरे १२४, सानिका पारडे १२३, संध्या घोलप १२३, अभिषेक राऊत १२२, सुहानी नेटके १२१, प्रेमराज नाईकनवरे १२१, प्रतिज्ञा भदेकर १२१, ऋतुजा करडे १२०, मयुरी मोहिते ११९, मयुरी शिनगारे ११४, रंदवे शिवराज ११४, निकीता नरुटे ११३, राजन बरबडे ११२, अमृता निंबाळकर ११२, प्रिती मेटे ११२, ऋतीका नेटके १११, प्रतिक सातनाक १११ , सैरव गवळी माळी ११०, साक्षी जाधव १०९, नामदेव जाधवर १०८, मनिषकुमार शिंदे १०७, रितेश बगाडे १०७, प्रदिप चव्हाण १०५, सुरज जाधव १०२.

वरील सर्व विद्यार्थ्यांचे श्री.शि. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार व सांस्कृतिक विभाग प्रमुख जे. सी. शितोळे, संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य व शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे शालेय समितीचे चेअरमन डॉ.जी.एम पाटील, विद्यालयाचे प्राचार्य डी. पी. गुंड व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून तसेच पालक वर्गातून अभिनंदन होत आहे.

## 'मघा'चा जिल्ह्यात सतत पाऊस; जनजीवन विस्कळीत

**सोलापूर, दि.१९ ऑगस्ट-**

यंदा पावसाने जिल्ह्यातील बहुतांश भागात जोरदार हजेरी लावली आहे. १६ ऑगस्टला सुरू झालेल्या मघा नक्षत्राचा जिल्ह्यात सर्वदूर पाऊस झाला आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

मे महिन्यात दमदार पाऊस झाल्याने खरीपाची पेरणी यंदा लवकर झाली. त्यांनतर मात्र पाऊस लांबल्याने खरीप पिकांना पावसाची गरज होती. त्यानुसार पुनर्वसु, पुष्य आश्लेषासह मघाच्या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.